रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ४ फेब्रुवारी २०२४



# काँग्रेससाठी लोकसभेची शेवटची निवडणूक ?

आधुनिक केसरी

**काँग्रेसचे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जून खरगे यांनी भारतात ही शेवटीची निवडणूक असेल,मोदी निवडून आले तर भारतात हुकूमशाही येईल, असे विधान केले. त्यांनी मोदी विषयी एकेरी शब्दाचा वापर केला. यापूर्वी त्यांनी मोदी सत्तेत आले तर सनातन धर्माचे राज्य येईल, असे म्हणाले होते. महाराष्ट्र काँग्रेसने खरगे यांच्या वक्तव्याचा आधार घेवून पत्रक काढले आहे. भारतीय लोकशाहीत काँग्रेस पक्षाला निवडणुकीची भीती का वाटावी? याचे कारण काँग्रेस पक्षात मोदी नेतृत्वाच्या विरोधात सरळ सामना करण्याची ताकद नाही. त्यात 'इंडी'आघाडीतील घटक पक्ष बाहेर पडत आहे.त्यामुळे काँग्रेस अध्यक्ष खरगे हे बिथरले आहेत. पक्षाने निवडणुकीपूर्वी पराभव मान्य केला आहे.**

देशात स्वातंत्र्यानंतर अनेक निवडणूका झाल्या.या निवडणुकीत काँग्रेसला पाशवी बहुमत मिळाले होते. गांधी परिवाराने एकाधिकारशाही चालवली. काँग्रेसने सत्तेत असताना हुकूमशाही पध्दतीने निर्णय घेतले. पण विरोधी पक्षांनी निवडणुकीपासून पळ काढलेला नाही. लोकशाहीत राजकारणात चढ- उतार येत असतात.आज भाजपा व मोदी सत्तेत आल्यानंतर काँग्रेसची पोटदुखी वाढली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना रशीयातील पुतीन करणे व भारतात पुन्हा निवडणूक होणारच नाही,असे म्हणणे खरगे यांचे विधान बालिशपणाचे आहे. भाजपा व मोदी विरोधात भावना भडकविण्यासाठी हे नेते वाटेल बरगळत आहेत.
२०२४ ची लोकसभा निवडणूक ही मात्र काँग्रेससाठी शेवटीची राहू शकते,याची काँग्रेसला भीती वाटत असावी.ब्रिटीश राजवटीच्याविरोधात लढणारी भारतातील काँग्रेस मोठी संघटना होती स्वातंत्र्यानंतर काँग्रेस संघटना बरखास्त करावी, अशी सूचना महात्मा गांधी यांनी केली होती. परंतु या संघटनेचे पक्षात रुपांतर केले गेले.काँग्रेस पक्ष हा देशाचे शासन चालविण्यासाठी तयार झाला.काँग्रेस पक्षाने कोणतेही ठाम वैचारिक भूमिका घेण्याचे




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

टाळले व लोकशाही,राष्ट्रवाद,सार्वजनिक कल्याण हे तीन प्रमुख विषय राजकारणाचा आधार मानले. यामुळे विरोधी पक्षाला काँग्रेसशी राजकीय स्पर्धा करणे कठीण झाले.देशातील १९५१-१९५२ पहिल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने ३६४ जागा जिंकल्या.तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला १६ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला.त्यावेळी आचार्य देव,जयप्रकाश नारायण, डॉ.लोहियांच्या समाजवादी पक्षाला १२ जागा, किसान मजदूर प्रजा पार्टीला ९ तर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जनसंघाला केवळ दोन जागा मिळाल्या. त्यावेळी पंडित नेहरू हे स्टार प्रचारक होते.तेंव्हा भारतात प्रातिनिधीक लोकशाहीला सुरुवात झाली,असे म्हंटले गेले. त्यावेळीदेशात विरोधी पक्ष कमजोर असतानाही त्यांनी निवडणुकीच्या विरोधात आक्रोश केलेला नाही. स्वातंत्र्यानंतर मुस्लिम लिग व हिंदू महासभा दोन मोठ्या शक्ती संपुष्टात आल्या.१९५२ ते१९६७ पर्यत काँग्रेस पक्षाला केंद्रात बुहमत मिळाले.तत्कालिन संरक्षणमंत्री व्ही.के कृष्ण मेनन मायकेल ब्रेशरशी बोलताना म्हणाले, काँग्रेस पक्षात मोठे सामर्थ्य यात आहे की, पक्षाचे जनतेच्या र्‍हदयात स्थान आहे.त्याची जागा कोणताही राजकीय पक्ष घेवू शकत नाही.तेव्हा काँग्रेस पक्षाची दर्पोक्ती नाही काय? काँग्रेस पक्षाला जनतेने डोक्यावर घेतले होते! पंडितनेहरू यांचा प्रभावा होता.तरीही विरोधी पक्ष कसा- बसा टिकला.१९५७ मध्ये काँग्रेसपक्षाने ३७१ जागेवर विजय मिळविला. नेहरू यांनी१९५९ मध्ये कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांची काँग्रेस अध्यक्षपदी निवड केली. नेहरूंवर घराणेशाहीचा आरोप झाला. नेहरूंनी काँग्रेस पक्षात घराणेशाही जन्म दिला. ती परंपरा पक्षात आजही चालू आहे.पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खरगे हे गांधी परिवाराच्या समंतीशिवाय निर्णय घेण्याचे धाडस करू शकणार नाहीत.त्यांनी जर गांधी परिवाराला नाराज केले तर,त्यांची गच्छंती अटळ आहे,हे त्यांनाही माहित आहे.पण ते वाघाचे कातडे घालून मोदी विरोधात डरकोळ्या फोडत आहेत.पण खरगे नेतृत्वाखाली पक्षाने तीन मोठे राज्य गमावले आहेत.नेहरूंनी श्रीमती गांधी यांच्या दवाबाखाली केरळमध्ये निवडून आलेले कम्युनिस्ट सरकार बरखास्त केले.काँग्रेस सरकारने शंभर वेळा चुका केल्या आहेत. शिशुपालप्रमाणे काँग्रेसच्या पापाचा घडा भरला त्यामुळे जनता त्यांना नाकारते आहे.काँग्रेसने १९६२ मध्ये ३६१ जागा जिंकल्या होत्या. यानंतरच्या निवडणुकीत राजकारणाला वेगळे वळण लागले. त्याचवेळी भारत - चीन युध्द झाले. नेहरुंचे चिनी- हिंदी भाई,भाई जे स्पप्न होते ते धुळीला मिळाले. नेहरुंच्या निधनानंतर गुलजारीलाल नंदा यांचेनंतर लालबहादूर शास्त्री हे पंतप्रधान झाले. काँग्रेस पक्षात शास्त्रीजी सारखा स्वच्छ चारित्राचा नेता झालेला नाही.शास्त्रीजींच्या निधनानंतर १९६५ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधानपद झाल्या. पण १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला धक्का बसला २८३ जागा मिळाल्या. यावेळी उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश व दिल्लीत जनसंघाचा प्रभाव वाढला. त्यावेळी जनसंघाला३५ जागा, स्वतंत्रपार्टीला ४४,भाकपा२३ माकपाला -१९ जागेवर विजय मिळविला. तामीळनाडूमध्ये द्रमुकचे२५ उमेदवार निवडून आले. या निवडणुकीत प्रादेशिक पक्षाचे ४३ उमेदवार निवडून आले. त्यावेळी डॉ.लोहिया यांनी गैरकाँग्रेस सरकारचा नारा दिला होता. त्याचा परिणाम झाला.प. बंगाल,बिहार,पंजाब,व ओरिसा या राज्यात सयुंक्त आघाडीचे सरकार स्थापन झाले.आज लोहिया विचाराचा उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष परिवाराचा पक्ष बनला आहे.पक्षाचे नेते अखिलेश यादव हे काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसत आहेत. काँग्रेस पक्षात श्रीमती गांधी यांची एकाधिकारशाही सुरु झाली.त्यामुळे १९६९ मध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी वेगवेगळे पक्ष स्थापन केले.काँग्रेसचे विभाजन झाले.१९७१ च्या निवडणुकीत काँग्रेस विरूध्द इंदिरा गांधी विरोधक एकत्र आले. त्यांनी इंदिरा हटाव'चा नारा दिला पण त्या डगमगल्या नाहीत. विरोधकांचा मुकाबला केला.यावेळी श्रीमती गांधी यांनी ३५२ जागेवर विजय मिळविला.संघटना काँग्रेसला केवळ १६ जागेवर विजय मिळविता आला.तेंव्हा पक्षातील ज्येष्ठ नेते मोरारजी देसाई वगळता काँग्रेसचे सर्व नेते पराभूत झाले.याचवेळी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या निवडीला उच्च न्यायालयात दिले गेले. १९७५ मध्ये इलाहाबाद उच्च न्यायालयाने श्रीमती गांधी यांचीच निवडणूक रद्द केली व त्यांना अपात्र ठरविले.या निकालानंतर श्रीमती गांधी यांनी चिडून १९७५ देशावर आणीबाणी लादली. यावेळी मूलभूत हक्क वृत्तपत्र स्वातंत्र्य,बंधने घातली गेली. श्रीमती गांधी आपले पंतप्रधानपद टिकविण्यासाठी ३९ वी घटना दुरुस्ती केली.दि,७ ऑगस्ट रोजी लोकसभेत विधेयक आणले व संमत केले.दि.८ ऑगस्ट रोजी राज्यसभेत पास झाले.दि.९ऑगस्टला १७ राज्याच्या विधानसभेची संमती मिळवली.दि.१० ऑगस्टला रविवार होता.त्याच दिवशी राष्ट्रपती फकरूद्दीन अली अहमद यांची सहीझाली लगेच धिसूचना काढली गेली.यात घटना दुरुस्तीत पंतप्रधानांच्या निवडीला न्यायालयात आव्हान देता येणार नाही,अशी तरतूद आहे. काँग्रेस पक्ष नेहमी मोदी सरकारच्या काळात घटनेची पायमल्ली होत असल्याचे आरोप करत असते.खर तर !गांधी परिवाचा कार्यकाळ हा तरहुकुमशाही पध्धतीचा होता. गांधी परिवाराने सत्तेचा दुरुपयोग करुन घटना दुरुस्ती व कायदे आणले.शेवटी मतदारांनी त्यांना घरी बसवले. तेंव्हा भारतीय घटनेत व लोकशाहीत एवढी ताकद आहे.काँग्रेस पक्षाने भारतीय घटनेला व लोकशाही कमजोर समजून नये! म्हणून१९७७ मध्ये १५४ जागा मिळाल्या.यातकाँग्रेसचे दुसऱ्यांदा विभाजन झाले. श्रीमती गांधी ह्या खरगेप्रमाणे रडत बसल्या नाहीत. त्या एकट्या विरोधी पक्षाच्या विरोधात खंबीरपणे उभ्या राहिल्या व जनतेचे समर्थन मिळविले. १९८० मध्ये इंदिरा काँग्रेसने ३५३ जागा जिंकल्या व केंद्रात बहुमत मिळविले. पण खडगे तर पुरूष असूनही दुबळेपणाचे प्रदर्शन करत आहेत. देशात २०१४ मध्ये राजकीय परिवर्तन घडले आहे.प्रथम केंद्रात विरोधी पक्ष असलेला भाजपाला बहुमत मिळाले,तो सत्तेत आला. २०१९ मध्ये जनतेचे भाजपाला पुन्हा समर्थन मिळाले. आज भाजपा व मोदी सरकार जनतेला दिलेली वचनाची पूर्तता करत आहे. देशात काँग्रेस पक्ष सत्तेत राहावा,ही मक्तेदारी आहे काय?भाजपा सत्तेत आला म्हणून भारतीय लोकशाही,घटना धोक्यात आले,हेच म्हणणे मूर्खपणाचे लक्षण आहे. काँग्रेस आजही पराभव स्विकारण्यास तयार नाही.याच काँग्रेस सरकारने राज्यातील विरोधी पक्षांचे सरकारे बरखास्त करून त्यांचे खच्चीकरण करण्याची कोणती कसर ठेवलेली नाही,हा इतिहास आहे. वातंत्र्यानंतर भाकपा हा काँग्रेस धोरणाच्या विरोधात रस्त्यावर लढत होता. तो काँग्रेसच्या ओटीत जाऊन बसलेला आहे.देशात काँग्रेस सर्वात मोठा भ्रष्ट पक्ष असल्याच्या टीका करणारे आम आदमी पक्षाचे नेते केजरीवाल यांनी सत्तेसाठी मैत्री करत आहे, देशातील राजकारण भ्रष्टाचार मुक्त करु असे म्हणणाऱ्या आम आदमी पक्षही भ्रष्टाचारात बुडालेला आहे.या पक्षाने दिल्लीत काँग्रेस पक्षाबरोबर समझौता केला आहे. चंदीगडच्या महापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेस व आम आदमी पक्ष एकत्र आला. तरीही भाजपाचा उमेदवार निवडून आला.या पराभवानंतर कांगावा सुरू केला आहे.इंडी आघाडीत काँग्रेस पक्षाने मुख्यमंत्री नीतीशकुमार यांचा पत्ता काढण्यासाठी डाव खेळला. यात ममता बॅनर्जी व केजरीवाल यांनी सर्वपक्षीय संमती न घेता खरगे यांची संयोजक म्हणून निवड केली.तर दुसरीकडे लालूप्रसाद यादव हे पूत्र तेजस्वी यांना मुख्यमंत्री करण्याच्या उद्देशाने नीतीशकुमार यांचा "जदयू' हा पक्ष फोडण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे नीतीशकुमार यांनी त्यांची साथ सोडली,असे पक्षाचे प्रवक्ते व ज्येष्ठ नेते के.सी त्यागी यांनी स्पष्ट केले.तर राहुल गांधी म्हणतात, 'आम्हाला त्यांची गरज ना' गांधी यांचे पक्षातील अनेक मित्र पक्ष सोडून गेले,पक्षातील सर्वच नेते गेले तरीचालेल,पक्षात गांधी परिवार राहिला पाहिजे. ही काँग्रेसची नेत्यांची मानसिकता आहे काँग्रेस व मोदी विरोधक नीतीशकुमार यांना 'पलटूराम'व सरडा म्हंटले गेले.यात राम शब्द वापरुन विरोकांनी प्रभूरामांचा अवमान केला आहे. हिंदू देव - देवतांची टिंगल सनातनी धर्माचा विरोधकांची मज्जल गेलेली आहे. घटनेत राजकीय पक्षाबाबत 'नैतिकता'चा उल्लेख आहे काय? मुख्यमंत्री नीतीशकुमारने तर पक्षातंर केलेले नाही. राजकीय पक्षात घराणेशाही व भ्रष्टाचार हे शब्द नैतिकतेत बसतात की नाही ?यात भ्रष्टाचारी व घराणेशाही पोसणाऱ्या काँग्रेस व लालूप्रसाद यादव यांना नीतीशकुमारने का पोसावे? या पक्षातील नेत्यांपेक्षा त्यांची प्रतिमा आजही स्वच्छच आहे.त्यांचेवर भ्रष्टाचाराचा एकही डाग नाही.जेंव्हा नीतीशकुमार यांनी भाजपाशी मैत्री करुन निवडणूक लढविली होती व नंतर भाजपाची साथ सोडली, तेंव्हा काँग्रेसने पलटी मारणारा नेता म्हंटले नाही! राजकारणात आणि खेळात जिंकायचे असेल डावपेच करणे, यात गैर नाही. काँग्रेसने तर भारतीय राजकारणात भाजपा अस्पृश्य ठरवत केंद्रात व राज्यात सत्तेपासून दूर ठेवण्याचे राजकारण केले आहे.आजही मोदी व भाजपा सत्तेत येवू नये म्हणून का मतभिन्नता असलेल्या पक्षाची मोट बांधली गेली. काँग्रेस प्रादेशिक पक्षाचे उबंरवठे झिजवत आहे. नितीशकुमार यांनी भाजपाची साथ घेतली,त्यात काय चुकले?यात भाजपा व नीतीशकुमार यांच्या पक्षाचे मुळीच नुकसान होणार नाही "इंडी' आघाडीतील नीतीशकुमार प्रमूख नेते होते.त्यांनी साथ सोडल्याने आघाडीला मोठा झटका बसला आहे.बिहारमध्ये आरजेडीने एम.आय.एम. चे पाच आमदार पक्षाने गिळंकृत केले.राजस्थानमध्ये काँग्रेसने बहुजन समाजवादी पक्षाचे आमदार फोडले.कर्नाटक व महाराष्ट्र राज्यात भाजपा सत्तेत येवू नये, त्यावेळी राज्यात तिसऱ्या क्रमाकावर



जनता पक्ष सेक्युलर पक्षाचे नेते कुमारस्वामी मुख्यमंत्री बनविले. तसेच महाराष्ट्रात शिवसेना नेते उध्दव ठाकरेंना भाजपापासून तोडले.पवार व ठाकरे हे 'पलटू' नेते नाहीत काय? यांच्या पक्षाची वैचारिक भूमिका कोणती आहे?नुकतेच उध्दवजी ठाकरे यांनी भाजपावर टीका करताना श्यामाप्रसाद मुखर्जी यांनीमुस्लिम लिगशी मैत्री केली होती,असे विधान केले.याला म्हणतात, 'आपले ठेवायाचे झाकून अन दुसऱ्यांचे बघायचे झाकून'या शिवसेनेचा राजकीय इतिहास पाहिलातर २२ वेळा विविध पक्षाबरोबर मैत्री केली आहे.यात काँग्रेस, कम्युनिस्ट दलित पँथर,तसेच समाजवादी पक्ष यांचेसह १९७९ मध्ये मुस्लिम लिगशी मैत्री केली होती.तेंव्हा बाळासाहेब ठाकरे यांनी मुस्लिम लिगचे उमेदवार बनातवाला यांचेसाठी एकत्रित सभा घेतली होती. महाराष्ट्रातील नेते शरद पवार यांनी काँग्रेस नेतृत्वाच्या विरोधात बंड करुन नवीन पक्ष काढला.पण आज पवारांचा पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधला गेला. लोकशाहीत राजकीय पक्ष वंशपरंपरानुसार एका परिवारांकडे असणे,याला घराणेशाही म्हणतात.देशात सर्व राजकीय पक्ष एकाच कुटुंबाकडे आहेत.मुख्यमंत्री केजरीवाल हे दारू घोटाळ्याच्या ईडीच्या चौकशीला समोरे जाण्याचे धाडस करत नाहीत.झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या मुख्यमंत्री कार्यकाळात 'मनरेगा' योजनेत करोडाचा घाटोळा झाला.तेंव्हा एका आय. एस.अधिकारी पूजा सिंघल यांचेकडे१९ कोटी ३१ लाख नोटांचे घबाड सापडले. ईडीने तीस ठिकाणी छापे मारले यातून खाण घोटाळा,जमीन घोटाळा यातून पुढे आला.या भ्रष्टाचाराचे धागेदारे सोरेनपर्यंत पोहचले,त्यांना अटक झाली.झारखंड मध्ये भ्रष्टाचारात 'बाप से बेटा सवाई" निघालेला आहे,मुख्यमंत्री केजरीवाल लालूप्रसाद यादव, पूत्र तेजस्वी यादव,माजी मुख्यमंत्री भूपेंद्र हुड्डा व माजी मुख्यमंत्री गहिलोत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचे नातू रोहित पवार यांनी चेलेल्या भ्रष्टाचाराची ईडीमार्फत चौकशी चालू आहे.या भ्रष्ट नेत्याची पाठराखण केली जात आहे.हे राजकीय नेते निर्दोष आहेत,कोणी ठरवायचे? भ्रष्टाचारी नेत्यांनी विजयोत्सव साजरा करावा,याची खंत वाटते.ते चौकशीनंतर 'व्हिक्ट्री' म्हणून हाताची मधील दोन बोटे व्ही' करून दाखविली जात आहेत.
१९४१ मध्ये दुसऱ्या महायुध्दात व्हिक्टर लॅव्हली यांनी प्रथम 'व्ही' हे विजयाचे चिन्ह प्रतिक म्हणून वापरले.पण भारतातील राजकीय नेते भ्रष्टाचारासाठी 'व्ही' चिन्हाचा वापर करत आहेत,काँग्रेस नेते व गांधी परिवारसुध्दा भ्रष्टाचार प्रकरणात जामीनावर आहे.यादव परिवाराने नोकरीच्या बदल्यात जमीन घेतली,असा आरोप आहे. राजकारणात येण्यापूर्वी यादव परिवार हा झोपडीत राहत होता,तो परिवार आज करोडपती आहे. महाराष्ट्रत तर राजकीय नेत्यांना "करोडपती बनविण्याची काँग्रेस व शरद पवारांची एक शाळा आहे. यात' मिले सूर, मेरा तुम्हारा' सर्व नेते भ्रष्टाचार प्रकरणी एकमेकाला साथ देत आहेत. दिवंगत नेते कर्पूरी ठाकूर बिहार राज्याचे दोन वेळेस मुख्यमंत्री होते.ते जेंव्हा सत्तेवरुन गेले तेँव्हा स्वतः चे घर नव्हते.मोदी सरकारने ठाकूर यांना भारतरत्न पुरस्कार दिला आहे.बिहारी जनतेने लालूंचा आदर्श घ्यायवयाचा काय? काँग्रेस नेते जयाराम रमेश यांनी ईडी व सी.बी.आय.हे भाजपाने दोन भाऊ आहेत, असे म्हंटले. वास्तविक पहाता,दोन्ही संस्था काँग्रेस पक्षाचे जन्मदाते पूत्र आहेत. मोदींना शिव्या घालणे,आरोप करणे,बेताल बोलणे,हा काँग्रेस नेत्यांच्या सवयीचा भाग बनलेला आहे.याची त्यांना लाज सुध्दा वाटत नाही.भारताचे शेजारी बांगला देशात सार्वत्रिक निवडणूक झाली.तेथे विरोधी पक्षांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला,त्यामुळे श्रीमती शेख हसीना यांचे अवामी लिग पक्षाने एकतर्फी निवडून आला,असे वृत्त आहे.त्या देशाच्या पाचव्यांदा पंतप्रधान झालेल्या आहेत.बांगला देशाचे निर्माते शेख मुजीब रहेमान परिवारातील सर्वांची १९७५ मध्ये हत्या झाली तेंव्हा त्यावेळी शेख हसीना बहिण शेख रहेना विदेशात होत्या म्हणून वाचल्या. नंतर शेख हसीना १९८५ मध्ये मायदेशी परतल्या व त्यांनी पक्षाचे नेतृत्व स्विकारले.त्या पंतप्रधान झालेल्या आहेत. पाकिस्तानमध्ये फेब्रुवारी महिन्यात सार्वत्रिक निवडणूक होत आहेत.माजी पंतप्रधान इम्रानखान व पत्नी बुशरा बेगम हिला तोशाखान्यातील भेट वस्तूच्या भ्रष्टाचार प्रकरणी न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे.भारतात लोकशाही पध्दतीने निवडणूका होत असतात.त्याला काँग्रेस पक्ष समोरे न जाता बहाणा करत आहे.यात गांधी परिवाराचे नेतृत्व कमी पडत आहे.पश्चिम बंगालच्या नेत्या ममता बँनर्जी यांनी येत्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला चाळीस तरी जागा मिळतील काय? असा सवाल केला आहे, यामुळे काँग्रेसचे अध्यक्ष खरगे भारतील शेवटीची निवडणूक असल्याचे रडगाणे गात आहेत.काँग्रेस पक्षाचा भारतीय लोकशाही! घटना,न्याय व्वस्था आणि निवडणूक यंत्रणेवर विश्वास नसेल तर बांगला देशाच्या विरोधी पक्षाप्रमाणे निवडणुकीवर बहिष्कार टाकावा.यात केंद्रांत १९८९ ते २००९ पर्यंत ११ वेळा आघाडी सरकारचा प्रयोग झालेला आहे.तेंव्हा आघाडीमध्ये सरकारची मजबूरी असते, तेंव्हा असे माजी पंतप्रधान मनमोहनसिंघ म्हणाले होते. भाजपाची पक्षाची स्थापना १९८० मध्ये झाली.पक्षाचे प्रारंभी दोन खासदार निवडून आले त्यानंतर भाजपाच्या सदस्यांचा आलेख वाढत गेला.तो २०१९ मध्ये ३०३ वर पोहचला आहे. तर काँग्रेस चारशेवरुन ५२ वर आला आहे.काँग्रेस पक्षाने प्रथम या पराभवाचे आत्मपरिक्षण करावे.काँग्रेस पक्ष 'इंडी' आघाडीच्या माध्यमातून केंद्रात सत्तेत येण्याचे स्वप्न पहात आहे.काँग्रेस आघाडीत फसला आहे.पक्षाला जागेसाठी प्रादेशिक पक्षाकडे भीक मागावी लागत आहे.यात प.बंगालमध्ये ममता बॅनर्जीचा तृणमूल काँग्रेस सर्व जागा लढणार आहे.तो काँग्रेसला जागा सोडण्यास तयार नाही.तर उत्तर प्रदेशमध्ये स.पा.नेते अखिलेश यादव हे काँग्रेसला आधी दोन आता उदारमनाने ११ जागा देण्याची घोषणा केली.यामुळे केंद्रात काँग्रेस पक्षाला बहुमत मिळणार नाही, हे स्पष्टआहे.त्यामुळे काँग्रेस देशात अस्थीर सरकार आणण्याचे डाव खेळत आहे.काँग्रेसचे सदस्य डी. के. सुरेश यांनी दक्षिणेतील स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली.स्वातंत्र्यापासून काँग्रेसची देश विभाजनाची नीती राहिलेली आहे.इकडे राहुल गांधी भारत जोडो' यात्रा काढत आहेत तर पक्षाचे खासदार मात्र भारत तोडण्याची भाषा करत आहेत,यावर गांधी परिवार मूग गिळून बसला आहे. पक्ष त्यांचेवर कारवाई करत नाही.देशातील सर्व घटनांनाभाजपा व मोदी जबाबदार आहे,असे काँग्रेसला त्यासाठी न्याय पाहिजे असेल तर त्यांनी न्यायालयात अथवा निवडणूक माध्यमातून जनतेच्या दरबारात जाण्याचा एकमेव मार्ग आहे.




## सारे जहाँ से अच्छा...

आधुनिक केसरी

कुसुमाग्रजांचं 'गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार हे गीत अनेकांना प्रेरणा देणारं ठरलं. देशभक्तीचा सुगंध आसमंतात दरवळत होता. हा सुगंध देता देता स्वातंत्र्ययज्ञरूपी कुंडात अनेकांच्या प्राणांची आहुती पडली, या आहुतीने यज्ञदेवता प्रसन्न झाली. या देवतेने प्रकट होऊन 'स्वातंत्र्याचा मंगल कलश आपल्या हाती दिला. दीर्घकाळाच्या परकीय सत्तेनंतर भारत स्वतंत्र झाला. हे स्वातंत्र्य आम्हाला सुखासुखी मिळालं नाही, याचं भान आम्ही ठेवणं आवश्यक आहे.
३ एप्रिल १९८४. भारताचा अंतराळवीर राकेश शर्मा अवकाशात होता. त्याच्याशी संपर्क साधण्यात आला. इंदिरा गांधी तेव्हा भारताच्या पंतप्रधान होत्या. त्यांनी राकेश शर्माला विचारलं, 'आपको अंतराल से हमारा भारत देश कैसा दिखाई दे रहा है? राकेश शर्माने तत्काळ फार सुंदर उत्तर दिलं. 'सारे जहां से अच्छा हिंदोस्तां हमारा. किती सुंदर आणि मन भरून यावं असं हे उत्तर! असा हा 'सारे जहाँ से अच्छा असलेला आमचा देश आज प्रजासत्ताक दिन साजरा करतो आहे. स्वातंत्र्यासाठी सारे देशभक्त, क्रांतिकारक एक होऊन लढले. जातिधर्माची पर्वा न करता. 'अवघा रंग एक झाला. पण आज त्याच देशाला जातिपातीने, धर्मभेदाने, भाषाभेदाने विभागलं गेलं आहे. संतांची, महापुरुषांची, नेत्यांची जातीपातींत वाटणी झाली आहे. क्षुल्लक कारणांवरून दंगली पेटत आहेत. लोक एकमेकांच्या जीवावर उठले आहेत. जाळपोळ, लुटालूट, अन्याय, अत्याचार होत आहेत. आपल्या सगळ्या देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी याचसाठी अट्टाहास केला होता का? 'हेचि फळ काय मम तपाला' असं तर त्यांचे आत्मे म्हणत नसतील? म्हणूनच देशभक्ती म्हणजे फक्त १५ ऑगस्टला किंवा २६ जानेवारीला ध्वजवंदन करणं नव्हे. वर्षभर असं वागलं पाहिजे की, आपण जी जी कृती करू, ती देशहिताच्या दृष्टीने महत्त्वाची असली पाहिजे. कोणतीही कृती करताना, निर्णय घेताना ही कृती माझ्या देशाच्या दृष्टीने हिताची आहे ना, याचा विचार केला पाहिजे. या देशाचा धर्म एकच. तो म्हणजे राष्ट्रधर्म! आणि तोच आपल्या सगळ्यांचा धर्म असला पाहिजे.स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लाल किल्ल्यावर लता मंगेशकर यांनी कवी प्रदीप यांचं गीत गायलं. ते गीत ऐकून पं नेहरूंच्या डोळ्यांतही अश्रू आले. आज त्याच गीताची आठवण करून लेखाचा शेवट करू या. ऐ मेरे वतन के लोगो, जरा आँख मे भरलो पानी जो शहीद हुऐ है उनकी जरा याद करो कुर्बानी.' जयहिंद.






## आनंदी पहाट

### घर हे केवळ चार भिंतींचेच नसते

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## आयुष्य...

आधुनिक केसरी

आयुष्य हे नेहमीच गुलाबी असावे असे सगळ्यांनाच वाटते. पण मला असं वाटतं आयुष्यात सगळ्या रंगाचा समावेश असावा. म्हणजे कसं आयुष्य रंगीबेरंगी होतं. आणि आयुष्याची खरी रंगत तेव्हाच येते जेव्हा ते रंगीबेरंगी असते. आयुष्यात दुःख कोणालाच नको असतं. सदा सुख असावे असं वाटतं.
पण दुःख असल्याशिवाय सुखाचा आनंद घेता येत नाही. सतत दुःखही नको आणि सतत सुखही नको." सुखात आणि दुःखात ही आनंद शोधता आला पाहिजे". कोणी म्हणेल सुखात ठीक आहे. पण दुःखात आनंद कसा शोधायचा? तर दुःखाला आनंदानेच सामोरे जायचं. रडल्याने दुःख कमी होत नाही. त्यापेक्षा आलेल्या दुःखाला हसत हसत सामोर जाऊया. दुःखात सुद्धा आनंद सापडेल. एखाद्या दुःखातून आपण बाहेर पडल्यावर त्याचं वर्णन आनंदाने इतरांना सांगत असतो. मग त्या दुःखाचा सामना करताना सुद्धा आनंदाने केला तर चिडचिड कमी होईल. वड्याचे तेल वांग्यावर निघणार नाही. सगळ्यांनी एकत्र येऊन दुःखाचा सामना केला तर दुःख लवकर संपेल. त्या दुःखात सुद्धा आनंद सापडेल.यालाच तर आयुष्य म्हणतात. आयुष्य हे सरळ कधीच नसावं. सरळ आयुष्य हे अळणी, सपक असते. आयुष्य ही नेहमी वळणावळणाचं, टप्प्याटप्प्याचं, खाचखळग्याचं,सुखदुःखाचं, आनंदाचं, खडतर, भेगाळलेलं, भिजलेलं, हलकफुलक,जड, चेतन, धावपळीचं , मजेत, कुतूहलाचं, गमतीचं , उत्साहाचं ,प्रेमाचं ,रंगीबेरंगी असावं.. आयुष्य हे हवेसारखं सगळ्या दिशांना पळणार असावं. रंगीबेरंगी फुलांसारखं मोहक, सुवासिक असावं. आयुष्य हे वाहत्या पाण्यासारखं नितळ, स्वच्छ असावं .खळखळ वाहत असलं तरी एक सुंदर नाद मधुर संगीत त्यातून ऐकू यायला हवं. आयुष्याचा एक सुंदर वटवृक्ष व्हावा. आयुष्य हे डबक्यासारखे साचलेले नसावे,सतत दुर्गंधीत. आयुष्य हे आपल्या कार्याने सुगंधित व्हावे. आपल्या वागण्या, बोलण्याने प्रेमळ व्हावे. आयुष्यात इतर काही नाही कमावले तरी चालेल. पण प्रेमळ नाती नक्कीच कमवू या.. त्यासाठी कुठलीही आर्थिक गुंतवणूक नको आहे. मग कसं आयुष्य छान गुलाबी गुलाबी होईल....

संस्कारधन

सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.34




## निरुपण

आधुनिक केसरी

जो तापत्रैं पोळला ।तो संतसंगें निवाला ।
आर्तभूत तोषला ।पदार्थ जेवी ॥२॥
क्षुधाक्रांतास मिळे अन्न ।तृषाक्रांतास जीवन ।
बंदीं पडिल्याचें बंधन- ।तोडिनां, सुख ॥३॥
माहापुरें जाजावला ।तो पैलतीरास नेला ।
कां तो स्वप्नींचा चेइला ।स्वप्नदुःखी ॥४॥

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

इन्द्रि अश्व अरु मन रजू,
बुद्धि सारथी जान ।
आत्मरथी रथ देह है, त्रिगुण भाव पथ ज्ञान ।।०९।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/०९
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
इंद्रियगण घोडे आहेत, मन लगाम आहे तर बुद्धि सारथी आहे, देह रथ आहे आणि आत्मा या शरीर रूपी रथाचा स्वामी आहे जो प्रकृतीच्या त्रिगुण भावांनुसार सर्व कार्य करतो.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## जाणपणनिरूपण

आधुनिक केसरी


प्रपंच आहे आणि तो विवेकाने केला पाहिजे.श्री, समर्थ आपल्याला सतत ज्ञानाच्या मार्गाची दिशा दाखवतात. साधूसंत व प्रापंचिक माणसाला कर्म हे करावेच लागते. कर्म हे नेहमी जाणते पणाने करावे. एखादा खूप धनाढ्य माणूस तुमच्या कडे आला आहे,घरी आलेल्या अतिथीचें स्वागत करणे हा आपला धर्म आहे. आपण तो खूप धनवान आहे म्हणून त्याच्या पुढे पंचपक्वानाचें ताट ठेवले तर त्याला त्याची काहीच किंमत नसेल. पण याच्या उलट एखादा गरजू सज्जन जर तुमच्या कडे अतिथी म्हणून आला तर त्याला त्या पंचपक्वानाचें ताट लाख मोलाचं वाटेल. या समासात समर्थांना सांगायचे आहे की कर्म नेहमी समजून उमजून करा. जिथे खरी गरज आहे अशा गुणी व गरजवंताला मदत करा. **छांद्योग्य उपनिषदात सांगितले आहे की, "नाना तु विद्या च अविद्या| यदेव विद्यया करोति ....तदेव वीर्यवत्तर भवति!!! मित्रांनो समर्थ आपल्याला ह्या श्लोकाचा उदाहरण देऊन असे सांगतात की, विद्या व अविद्या तसेच ज्ञान व अज्ञान हे दोन्ही वेगवेगळे प्रकार आहेत. जो समजून उमजून कर्म करतो त्याचे कर्म सामर्थ्यवान असते. त्यामुळे त्यांचे फळं पण उत्तमोत्तम मिळते. समर्थ सांगतात की आपल्या जीवनात भाग्य निर्माण करणं आपल्या हातात आहे. सतत चांगले कर्म करत राहिल्यास भाग्य आपले जीवन सुखी करते.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## लोभाच्या चित्तीं धन । तैसें राखावें अनुसंधान ॥

आधुनिक केसरी

मंगलांत मंगल, शुद्धांत शुद्ध जाण ।एक परमात्म्याचें अनुसंधान ॥ हें बीज लावलें ज्यांनीं ।धन्य धन्य झाले जनीं ॥ अचूक प्रयत्न तोच जाण ।ज्या प्रयत्नांत न चुकतें अनुसंधान ॥ सत्य करावें भगवंताचें अनुसंधान ।जेणें दूर होईल मीपण ॥ ' मी माझें ' म्हणून सर्व कांहीं करीत जावें ।परि भगवंतापासून चित्त दूर न करावें ॥ मारुतिरायाचें घ्यावें दर्शन ।त्याच्याच कृपेनें राखावें अनुसंधान ॥ लोभ्याचे चित्तीं धन ।तैसें राखावें अनुसंधान ॥ दूर गेला प्राणी ।परत येण्याची वेळ ठेवी मनीं ।तैसें राहणें आहे जगांत ।मी परमात्म्याचा होण्याचा ठेवावा हेत ॥ म्हणून न सोडावें अनुसंधान ।कशापेक्षांही जास्ती करावें जतन ॥ कोणाचेंच न दुखवावे अंतःकरण ।व्यवहार करीत असावा जतन ।व्यवहारांतील मानअपमान ।हे टाकावे गिळून ॥ अखंड राखावें रामाचें अनुसंधान ।जेणें सदाचरणाकडे लागेल वळण ॥
माझें नातेंगोतें राम ।हा भाव ठेवून जावें रामास शरण ॥ हें ऐका माझें वचन ।मनानें व्हावें रामार्पण॥ अनन्य व्हावें भगवंतीं ।जो कृपेची साक्षात् मूर्ती ॥ आपले कर्तेपण टाकावें ।म्हणजे शरण जातां येतें ॥ ज्यानें धरले भगवंताचे पाय ।तोच त्याला झाला उपाय ॥ मी आतां झालों रामाचा ।त्याला अर्पावी सर्व चिंता ॥ मी ज्याचा झालों त्याला माझी काळजी ।हा ठेवावा भाव चित्तीं॥ माझें हित तो जाणे ।हें जाणून स्वस्थचि राहणें ॥ विषयवासना सुटण्यास उपाय जाण ।आपण जावें रामास शरण ।जें जें करणें आपले हातीं ।तें करून न झाली शांती ।आतां शरण जावें रघुपति ॥ जावें रघुनाथास शरण ।तोच दुःख करील निवारण ॥ एक राम माझा धनी ।त्याहून दुजें आपले न आणी मनीं ॥ अभिमानरहित जावें रामाला शरण ।त्यानेंच राम होईल आपला जाण ॥ आतां जगांत माझें नाहीं कोणी ।एका प्रभु रामावांचुनी ।निर्धार ठेवा मनीं ।शरण जावें राघवचरणीं।जें जें केलें आजवर आपण ।तें तें रामास करावें अर्पण ॥ जें जें होतें तें राम करी ।तें स्वभावें होय हितकारी ।म्हणून जी स्थिति रामानें दिली ।ती मानावी आपण भली ॥ गंगेच्या प्रवाहांत पडलें ।गंगा नेईल तिकडे गेलें ॥ गंगा जाते योग्य ठिकाणीं ।याचें जाणें सहजासहजीं ॥ तैसें असावें भगवंताचे स्मरणात ।राम ठेवील त्यांत मानावें हित ॥ सर्व जगत् ज्यानें जाणलें मिथ्या ।हें जाणून शरण जावें रघुनाथा ॥ कारण परमात्म्याला जाणें शरण ।याहून दुजा मार्ग न उरला जाण ॥ धन्य तो व्यावहारिक जाण ।जेणें केलें रामास स्वतःला अर्पण ॥ **३३५. रामापरतें सत्य नाही ।श्रुतिस्मृति सांगतात हेंच पाही ॥ रामसत्तेविण न हाले पान ।हें सर्व जाणती थोर लहान ॥**



## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

परमेश्वराची आर्त व्याकूळ विनवणी करत असलेला तिचा आवाज सर्वत्र भरून राहिला. आपल्या उत्कट भक्तीने चराचर चैतन्याशी ती जोडली गेली आणि अखेर त्या चैतन्याशी एकरूप झाली. आपल्या विठ्ठलाच्या पायाशी तिने देह ठेवला. एक आख्यायिका अशी आहे की, त्यावेळी चंदभागेला प्रचंड महापूर आला. सारं यवन सैन्य वाहून गेलं. विठ्ठल मंदिरही जलमय झालं. चंदभागेतल्या एका खडकाळ जागी आधी तिचं शरीर अडकलं. मग ते महासागराच्या खोल तळाकडे चंदभागेने वाहून नेलं. दुसऱ्या दिवशी पूर ओसरल्यावर तिचा मृतदेह ज्या खडकाळ जागी काही काळ पडला होता तिथे एक तरटी वृक्षाचं रोप उगवल्याचं आढळलं.

रविवार, ४ फेब्रुवारी २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १६८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 4 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-168 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05

# भारतरत्न लालकृष्ण आडवाणी

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली पुरस्काराची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स खात्यावरून ही माहिती दिली. मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. मी त्यांच्याशी संवाद साधला असून या पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. आमच्या काळातील सर्वांत प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या आडवाणी यांचं भारताच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे मोदी यांनी म्हटले आहे.**



पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, संघटनेच्या तळापासून त्यांनी कामाला सुरुवात केली आणि उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारत देशाची सेवा करण्याचे काम केले. केंद्रीय गृहमंत्री आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी संसदेत उपस्थित केलेले मुद्दे, त्यांची भाषणे आमच्यासाठी दिशादर्शक आणि समृद्ध असा अनुभव देणारी ठरली आहेत. गेल्या काही वर्षांपासून लालकृष्ण आडवाणी सक्रिय राजकारणातून अलिप्त राहिले होते. जानेवारी महिन्यात राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. राम मंदिराच्या उभारणीसाठी लालकृष्ण आडवाणी यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात प्रचंड मोठी चळवळ उभारली. बाबरी मशीदीच्या विवादित जागेवर राम मंदिर व्हावे म्हणून त्यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळे प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने आडवाणी पुन्हा एकदा चर्चेत आले होते. सुरुवातीला त्यांच्या प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना निमंत्रण नाकारण्यात आले होते. यावरून प्रचंड गदारोळ झाला. अखेर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी कृष्ण गोपाल, राम लाल आणि विहिंपचे आलोक कुमार यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या घरी जाऊन प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी आमंत्रित केले होते. परंतु, प्राणप्रतिष्ठा दिनी अयोध्येत तापमान घसरले होते. थंडी वाढली होती, त्यामुळे लालकृष्ण आडवाणी यांनी तिथे जाणे टाळले.

**२०१५ साली मिळाला होता पद्मविभूषण पुरस्कार** :२०१५ मध्ये आडवाणी यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते . त्याच वर्षी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला . तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी स्वत : त्यांच्या घरी भेट दिली आणि त्यांना हा सन्मान दिला होता . त्यावेळी वाजपेयी ९० वर्षांचे होते आणि ते आजारी होते . मुखर्जी यांनी प्रोटोकॉल मोडून माजी पंतप्रधानांना त्यांच्या कृष्ण मेनन मार्गावरील निवासस्थानी हा पुरस्कार प्रदान केला .

### महत्त्वाची बातमी

## मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा: नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात कायद्याचे राज्य राहिलेले नाही, कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले आहेत. सत्ताधारी पक्षाचे आमदार पोलीस स्टेशनमध्येच गोळीबार करत आहेत यावरून महाराष्ट्रात जंगलराज आल्याचे स्पष्ट होत आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री यांचा पोलीसांवर प्रचंड दबाव असून कायद्याने काम करु दिले जात नाही. आमदार गणपत गायकवाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत, त्यामुळे त्यांच्यात थोडीशी नैतिकता शिल्लक असेल तर त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. उल्हासनगर पोलीस स्टेशनमध्ये सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने गोळीबार केल्याप्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारचा खरपूस समाचार घेतला. नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना पटोले पुढे म्हणाले की, उल्हासनगरमधील झालेल्या घटनेचा काँग्रेस पक्ष तीव्र निषेध करत आहे. भाजपा आमदार गणपत गायकवाड प्रकरणात शिंदे-भाजपा सरकार काय कारवाई करते ते आम्ही पाहत आहोत परंतु या प्रकरणाने भाजपाचा बुरखा फाडला गेला आहे. पोलीस स्टेशमध्येच गोळीबार करण्याची हिम्मत ही सत्तेचा माज दाखवते, हे कसले रामराज्य? पोलिसांवर सत्ताधाऱ्यांकडून प्रचंड दबाव आहे, वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये दहशत आहे, सत्ताधारी आमदाराचे ऐकले नाही तर लगेच बदली केली जाते. कायद्याने काम करु नये म्हणून त्यांच्यावर दबाव आणला जातो. महाराष्ट्रात अशी परिस्थिती कधीच नव्हती.

# आ. नरेंद्र दराडे यांच्या निधीअंतर्गत कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** आ.नरेंद्र दराडे यांचे निधीअंतर्गत मौजे शिरवाडे वाकद येथील शिरवाडे फाटा येथे निवारागृह कामाचे भूमिपूजन व दशक्रिया विधी शेड समोरील फेवर ब्लॉक बसवण्याच्या कामाचा लोकार्पण सोहळा मा.नरेंद्र दराडे यांच्या शुभहस्ते व शिवसेना जिल्हाप्रमुख मा.कुणाल दराडे, डॉ.विलास कांगणे, डॉ.श्रीकांत आवारे, संचालक कृ.ऊ.बा.स. लासलगाव यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यාप्रसंगी गोरख शिंदे, मा.सरपंच बाळासाहेब आवारे व बाबासाहेब चिताळकर, किसनराव आवारे, निशिकांत चिताळकर, सजन चिताळकर, शिवाजी आवारे, दत्तू आवारे, गोरख निकम, विश्वनाथ आवारे, ज्ञानेश्वर आवारे, दत्तू शिंदे, माधव चिंचोळे, प्रल्हाद शिंदे, सागर आवारे, चंद्रकांत काकड, गोरख धनराव, किशोर चिताळकर, ग्रामसेवक सुनील शिंदे, मधुकर ठोंबरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



# बाजार समितीत प्रशासक कार्यकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार

## चौकशी अहवालातून स्पष्ट : सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

वसंत पाटील

वाशिम : येथील बाजार समितीत प्रशासक कार्यकाळात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे चौकशी अहवालातून निदर्शनात आले आहे. विषेश लेखापरीक्षक वर्ग २ ( फिरते पथक ) सहकारी संस्था अकोला यांच्या चौकशी अहवालातून सदर माहिती पुढे आली आहे. या बाबत सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय सहनिबंधक अमरावती यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांना दिले आहेत. रिसोड कृषि उत्पन्न बाजार समिती अलीकडच्या काळात या ना त्या कारणाने जनसमांन्यात चर्चेचा विषय ठरत आहे. अधिकारी व कर्मचारी यांच्यातील मतभेद अनेक वेळा चव्हाट्यावर आले आहेत. अशातच तालुक्यातील रिठद येथील विठ्ठल आरू यांनी प्रशासक कार्यकाळात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याची तक्रार दि.८/६/२०२३ रोजी प्रशासनातील वरिष्ठांकडे केली होती. सदर प्रकरण चौकशीसाठी श्री. आर. एम. जोशी विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था अकोला यांच्याकडे दाखल करण्यात आले होते. तद्वतच मोप येथील श्री. रामेश्वर नरवाडे यांनी देखील उपरोक्त विषया बाबत तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने विशेष लेखा परिक्षक यांनी सदर तक्रारीची पडताळणी करुन चौकशी अहवाल सादर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता, नियमबाह्य अनेक बाबी भ्रष्टाचार झाला असल्याचे अधोरेखित करणाऱ्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अनेक बाबींचे खर्च निविदा न मागवता करण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. बहुतांश बाबी अधिकार क्षेत्राबाहेरील असूनही मंजूर केल्या असल्याचा मुद्दा स्पष्ट करण्यात आला आहे. आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, प्रशासक हे शासकीय अधिकारी असल्याने त्यांच्याकडून




नियम, कायदा, आणि परिपत्रकिय सूचनांचे उल्लंघन होणे अपेक्षित नसते. परंतू ते झाले असल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे चौकशी अधिकारी यांच्या चौकशी अहवालातील निष्कर्ष आपण पडताळून आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची प्रत तक्रारदारास देऊन विभागीय सहनिबंधक कार्यालय अमरावती यांना अवगत करावे असे निर्देश विभागीय सहनिबंधक श्री. विनायक काहाळकर यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांना दिले आहेत.

**भ्रष्टाचार उघड होण्याच्या चर्चेला उधाण** : संचालक मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर सार्वत्रिक निवडणुक होईपर्यंत येथील बाजार समितीवर प्रशासक मंडळाची नेमणूक करण्यात आली होती . नियमानुसार सदर प्रशासक मंडळास कुठलेही धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नसतो . प्रशासक मंडळ हे केवळ निवडणूक होईपर्यंत समितीचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी नेमल्या जात असते . मात्र येथील प्रशासक आणि तत्कालीन सचिवांनी अनेक नियमबाह्य धोरणात्मक निर्णय घेतले असल्याचे तक्रारदार यांच्या निदर्शनात आल्यामुळे त्यांनी वरिष्ठ पातळीवर तक्रार दाखल केली होती . त्या अनुषंगाने सदर प्रकरण चौकशी अधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आले होते . त्याचा अहवाल विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांना प्राप्त झाला आहे . सदर चौकशीत अनेक मुद्दे भ्रष्टाचार झाल्याचे अधोरेखित करणारे आहेत .त्यामुळे बाजार समितीत आजतागायत मोठ्याप्रमानात झालेले भ्रष्टाचार आता उघड होणार असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे .

**आजी माजीचे धाबे दणाणले** बाजार समितीत झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आल्यामुळे अनेक आजी माजी सभापती,उपसभापती, व काही संचालक यांच्यासह तत्कालीन सचिवांचे सुद्धा धाबे दणाणले असल्याची चर्चा बाजार समितीच्या गोटात चांगलीच रंगली आहे . मात्र अस्वस्थ व गोंधळलेल्या कारभारात शेतकऱ्यांची परवड जी पहिले होती ती आजही कायम आहे .

# जातनिष्ठ अर्थ-सांस्कृतिकता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**समाजधारणा अनेक घटकांवर आधारित असते. त्यात प्रकर्षाने जाणवणारे आणि अंतःस्थ क्रियाशील असणारे घटक एकमेकांना कधी पूरक तर कधी व्यस्त ठरले तरी त्यांच्या संमिलनातूनच ही धारणा अधिक गडद, क्रियाशील आणि प्रवाही होण्यास मदत होते. तिच्या चांगल्या वाईट परिणामांची चिंता प्रक्रियेदरम्यान नसते तर त्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागतो. बरे हा काळ किती असावा हेही त्या त्या समाजावर आणि त्यातील संवेदनशील समाजचिंतकांवर अवलंबून असतो. विचारवंतांनीही हा प्रश्न तुलनात्मक दृष्टीने समजून घेतला तरच समजण्यासारखा. अन्यथा जे चालले आहे ते बरे चालले आहे असे म्हणण्याशिवाय प्रत्यवाय नाही.**



## क्षितिजापल्याड

भारतीय उपखंडाच्या आर्थिक संरचनेचा आपण धांडोळा घेतला तर आपल्या हाती अंतिमतः येते ती येथील जातिव्यवस्था. भारतीय जनमानसावर जातव्यवस्थेचे गारुड ठाण मांडून बसण्याइतपत त्यात काय आहे हेही तपासले पाहिजे. कारण भारतीय संस्कृतीच्या उन्नतीसाठी केले जाणारे प्रयत्न हे केवळ आर्थिक न ठरता त्याचे सामाजिक आणि राजकीय अंगाने विश्लेषण होणे आणि केवळ भारतीयच नव्हे तर एकूण मानवकल्यानासाठी तो वस्तुपाठ निर्माण होणे आवश्यक आहे. म्हणजेच केवळ बाह्यांग विकास महत्त्वाचा नसून अंतरंगातील सांस्कृतिक विकास हा महत्त्वाचा ठरणार आहे. पारंपरिक भारतीय अर्थव्यवस्था ही जातिगत अंगाने विकसित झाली. इथे प्रत्येक व्यवसायाची एक जात ठरली. जात हा कुलाचार आणि वृत्ती टिकविण्यासाठी महत्त्वाचा घटक होता. मध्ययुगात सुलतानी संकटांना न जुमानता इथली जातव्यवस्था टिकून राहण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे व्यावसायिक मक्तेदारी. राजकीय आणि धार्मिक दबावाला बळी न पडता आपापल्या जातीला चिकटून राहण्याची वृत्ती ही केवळ आपली जात किंवा धर्म टिकून रहावा यासाठी नव्हती तर आपल्यातील वृत्यंतर हे व्यवसायाच्या मुळावर येईल, ही भावना यामागे निश्चितच होती. कारण व्यवसाय हा जातीनिहाय असल्यामुळे आणि धर्मांतरित व्यक्तीला पूर्वीच्या व्यवसायाला सोडचिठ्ठी द्यावी लागत असल्याने आपल्या मूळ धंद्याला चिकटून राहण्यासाठी इथे मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाले नाही. एक गोष्ट मात्र मान्य करावी लागेल की, ज्या भारतीय संस्कृतीचा उदो उदो आज आपण करतो आहोत ती नेमकी कोणती संस्कृती आहे? कारण या ठिकाणी दोन संस्कृती समांतरपणे चालत होत्या. एक ब्राह्मण संस्कृती व दुसरी श्रमण संस्कृती. एक द्विजांची भेदाभेदाला खतपाणी घालणारी आणि मनुष्यत्व नाकारणारी संस्कृती तर दुसरी शूद्र संस्कृती. ज्यात येथील दोन तृतीयांश समाज येत होता. हे असे असले तरी मध्य युरोपियन राष्ट्रे, आफ्रिकन देश, पश्चिम आशियातील देश ज्या गतीने धर्मांतरीत झाले, त्या झपाट्याने भारतात धर्मांतर होऊ शकले नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे येथील व्यावसायिक जाती हेच होय. हिंदू धर्म किंवा ज्याला अलीकडे सनातन धर्म म्हटले जाऊ लागले आहे, असा काही प्रकार प्राचीन काळापासून ते मध्ययुगापर्यंत भारतात अस्तित्वात नव्हता. आजच्या घडीला आपल्या जातीचे मूळ राजस्थानात शोधण्याचा जो प्रकार सर्वत्र चालू आहे त्याच नरश्रेष्ठ राजपुतांना देखील भारत म्हणून एकत्र येणे अथवा इतरांना एकत्र आणणे जमले नाही हेही ऐतिहासिक सत्य आहे. एकूण भारतीयांना काहीतरी एक नाव द्यावे आणि त्याद्वारे प्रतिकार करावा असे न वाटणे हे अदूरदृष्टीचे द्योतक होते. म्हणून एकूण भारतवर्षाच्या इतिहासात शिवाजी महाराजांचे वैशिष्ट्य ठसठशीतपणे जाणवते. कारण शिवाजी महाराजांनी सर्व जातींना एकत्र करून हिंदवी स्वराज्याची स्थापना



करण्याचा चंग बांधला. इतिहासात पहिल्यांदाच हे घडत होते. समाजाची आर्थिक संरचना तशीच ठेवून किंबहुना त्याच्या जोडीला मुलूखगिरीचा जोडधंदा उभा करून सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यभान मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य इतिहासात प्रथमच होत होते. इथे कोणताही व्यवसाय इतर व्यवसायापेक्षा उच्च किंवा कनिष्ठ समजला जात नव्हता. किंबहुना याच व्यावसायिक जातींमधील झुंजारपणाचे एकसमायिक तत्त्व एकत्र करून स्वराज्याचा लढा निकराने लढला गेला. या गोष्टीचे ऐतिहासिक महत्त्व आपणास विसरून चालणार नाही. आज आपण सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत जटिल अवस्थेत आहोत. कारण सत्यनिष्ठा, अहिंसक लढा आणि समतावादी तत्त्वज्ञान हे मूल्य समाजात कसे रुजवायचे हा मोठाच पेच निर्माण झाला आहे. सर्वत्र अंधानुकरण आणि त्यातील ग्लानीअदृश्य अवस्था यामुळे संपूर्ण समाज ढवळून निघतो आहे. या आधुनिक आणि क्रांतिकारी म्हणवून घेणाऱ्या पद्धतीतील तीन दोष डॉ. लोहिया यांनी उजागर केले आहेत. त्यातील पहिली बाब म्हणजे आजच्या आधुनिक काळात स्थिर आणि शाश्वत स्वरूपाच्या मूल्यांचा आपण केलेला अधिक्षेप होय. कारण आपले नैतिक जीवनमान एवढे सापेक्ष आणि क्षणिक बनवले आहे की यापेक्षा काहीतरी वेगळे असते असे आम्हाला सांगूनही पटत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे उत्पादनपद्धती तशीच ठेवून सामाजिक बदल आपण घडवू पाहतो. किंबहुना केंद्रीय उत्पादन साधनांविषयी आपणास काहीच म्हणावयाचे नसते. आपला रोष असतो तो फक्त विनिमयाच्या अंमलबजावणीला. पण असे कधीच होत नसते हे अर्थशास्त्रीयदृष्ट्या आपणास कळून येईल. समाजाच्या केवळ सामाजिक उत्थापनासाठीच नव्हे तर सांस्कृतिक मूल्ये विकसित होण्यासाठी विकेंद्रीकरण याच तत्त्वाचे पालन करावे लागेल तरच सामाजिक उणिवा काही प्रमाणात दूर होऊ शकतील. तिसरा आणि महत्त्वाचा मुद्दा डॉ. लोहिया सांगतात तो म्हणजे सामाजिक ध्येयाच्या बाबतीत. उत्पादन साधनात बदल करणे किंवा विशिष्ट आर्थिक संरचना स्वीकारण्याने सर्वच प्रकारची सामाजिक आणि आर्थिक ध्येये आपोआप प्राप्त होतील, अशी जी काही आपली मानसिकता आपण बनवतो, तीच मुळात चुकीची आहे. आज जागतिकीकरण हा युगधर्म म्हणून आपल्यापुढे आहे. या युगधर्माला अनुसरून आर्थिक संरचनेच्या सामाजिक बाजूकडे लक्ष देणे आणि त्याचे सांस्कृतिक महत्त्व अबाधित ठेवणे अनिवार्य अनिवार्य आहे. या देशालाच नव्हे तर एकूण मानवी संस्कृतीला कोणत्याच प्रकारची एकाधिकारशाही, केंद्रीय उत्पादन पद्धती आणि आपोआपवाद परवडणारा नाही. ज्या समाजाची वाढ केवळ आर्थिक अंगाने होईल आणि सामाजिक व सांस्कृतिक बाजू दुर्लक्षित राहतील तो समाज अनागोंदीकडे मार्गक्रमण करणारा ठरेल. आपण सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रगल्भ बनू या आणि नवा भारत घडवू या. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# स्वाभिमानीची आत्मक्लेश पायी यात्रा; राजकीय नेत्यांसाठी चिंताजनक

आधुनिक केसरी

**जो इतिहास घडवतो त्याचाच ईतिहास लीहिल्या जातो.आणि इतिहास घडवणारी माणसं गरिबीचं जीनं जगत संघर्षातून मोठी झालेली असतात.गरिबीच्या झळा त्यांच्या काळजाला लागलेल्या असतात.म्हणूनच संघर्षाच्या वणव्यात जीवाची पर्वा न करता ते सतत लढत असतात.अशा लढणाऱ्या योध्यांचाच मग इतिहास लिहिल्या जातो. शेतकऱ्यांसाठी गेली अनेक वर्षे प्रशांत डिक्कर लढा देताना आपण पाहत आलेलो आहोत.त्यांनी अनेक आंदोलने केली.प्रशासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्या हक्काच्या मागण्या पाडून घेतल्या.जीवाची पर्वा न करता,कुठल्याही संकटाला सामोरं जात या योद्धाने शेतकरी कष्टकऱ्यांच्या अनेक लढाया जिंकल्या आहेत.त्यामुळेच कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी, महिलांना हा माणूस आपला वाटतो.**



सागरकुमार झनके
संपर्क क्र. 9822575244

काही दिवसांपूर्वी जळगाव जामोद येथे शेतकरी शेतमजुर व महिलांच्या प्रश्नावर स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांची १९ जानेवारीला जळगाव येथे पार पडलेली आत्मक्लेश पायी यात्रा जिल्ह्यातील राजकीय नेत्यांसाठी चिंताजनक बाब ठरली आहे. प्रशांत डिक्कर यांनी मतदार संघातील जणतेच्या मुळ प्रश्नाला हात घालत सरकार समोर मोठे आवाहन उभे केले आहे. १२५ गाव शिवारातुन ३८१ कि.मी.१६ दिवस पायी प्रवास करून यात्रा समारोपासाठी १९ जानेवारी रोजी एस डि ओ कार्यालयावर उपस्थित झालेल्या यात्रेत रेकॉर्डब्रेक गर्दि ऐतिहासिक ठरली आहे. जो पर्यंत मागण्यांची पूर्तता होत नाही तोपर्यंत सत्ताधाऱ्यांना गाव बंदी करु. असा सज्जड इशारा संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारला दिला आहे. लोकप्रतिनिधींनी अतिवृष्टीच्या नावावर मतदार संघातील रस्ते, रोड,सभागृह, बांधकामासाठी करोडो रुपयांचा निधी मंजुर करुन घेतला. परंतु शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही नुकसानग्रस्तांना अद्यापही मदत मीळाली नसल्याने शेतकरी वर्गातुन प्रचंड ओरड होत आहे. सरकारने आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना कर्ज माफ नाही. बचतगटातील महिलांसाठी सुमतिबाई सुकळीकर योजने अंतर्गत व्याजाची रक्कम परत करणार असल्याचे सागुंनही सरकारने व्याजाची रक्कम परत केली नाही. राज्यातील बचतगटातील महिलांची फसवणूक केली. शेतकरी, शेतमजूर बचतगटातील महिला नैसर्गिक आपत्तीच्या संकटात असल्याने बचतगटाचे कर्ज माफ करणे अपेक्षित असतांना या गंभिर प्रश्नावर एकही आमदार, खासदार बोलायला तयार नाही. राज्यात स्वतंत्र शेतमजूर महामंडळ स्थापन करून शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांच्या कुटुंबांना दिल्ली,मुबंई, कामगारा प्रमाणे सवलती लागु करुन दरमहा ६ हजार रुपये मानधन चालु करावे. मतदार संघातील बेरोजगारांच्या हाताला काम नसल्याने कामधंद्यासाठी वनवन फिरणाऱ्या बेरोजगारांना स्वतःचे उद्योग उभे करण्यासाठी सरकारने बिनव्याजी २५ लाख रुपयांचे कर्ज द्यावे. व इत्यादी मागण्यासाठी काढलेल्या आत्मक्लेश पायी यात्रेचा समारोपप्रसंगी मतदारसंघातील शेतकरी शेतमजुर व महिलांनी प्रचंड प्रतिसाद देत. आपल्या मागण्या घेऊन जळगाव एस डि ओ कार्यालयावर पहिल्यांदाच एवढ्या संख्येने गर्दी पहायला मीळाली असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. १५ वर्षांपासून कष्टकरी जणतेसाठी आक्रमकपणे लढणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रशांत डिक्कर यांनी सरकार विरोधात वेळोवेळी केलेल्या आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यामुळेच गावा गावात संघटनेचे जाळे विणले आहे. गाव तिथे शाखा, घर तिथे स्वाभिमानी निर्माण झाल्याने सर्वाधिक कार्यकर्त्यांची फळी उभी करून शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी सत्ताधाऱ्यांना जेरीस आणले आहे. जनसामान्यांच्या मनात लढाऊ नेतृत्व म्हणून प्रशांत डिक्कर यांचे स्थान निर्माण झाल्याने ३०/३० हजार लोकांचे मोर्चे काढण्यात प्रशांत डिक्कर पुर्णपणे यशस्वी झाले आहेत. नुकताच पार पडलेली रेकॉर्डब्रेक आत्मक्लेश पायी यात्रा राजकिय नेत्यांसाठी प्रचंड चिंताजनक बाब ठरली आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीक्षेत्र सराला बेट विकासासाठी पत्रकारांचे महत्त्वाचे योगदान

## महंत रामगिरीजी महाराज यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** श्रीक्षेत्र सराला बेट गोदाधाम विकासासाठी पत्रकार बांधवांचे महत्त्वाचे योगदान असल्याचे प्रतिपादन महंत गुरुवर्य रामगिरीजी महाराज यांनी केले आहे. श्री क्षेत्र सराला बेट या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी पत्रकासंघाचे कॅलेंडर डायरी महंत गुरुवर्य रामगिरीजी यांना कॅलेंडर डायरी देत महाराज यांच्या हस्ते प्रकाशन करून डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विविध भेट वस्तु प्रदान करत महाराजांचा सन्मान केला. तसेच श्रीक्षेत्र सराला बेट येथील माहिती अंकात प्रकाशीत झाल्याने पत्रकार राजेंद्र देसाई यांचे गुरुवर्य रामगीरीजी महाराज यांनी कौतुक करत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्रीक्षेत्र सराला बेट विश्वस्त मधुकर महाराज तसेच डॉ विश्वासराव आरोटे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर पत्रकार राजेन्द्र देसाई वांजरगाव येथील सरपंच सलिम पठाण उपसरपंच जावेद सय्यद जमशेद सय्यद तसेच मोठ्या संख्येने भक्त मंडळ सेवक वृंद उपस्थित होते. पत्रकार बांधवांसाठी शिर्डी या ठिकाणी राज्यस्तरीय अधिवेशन घेणार असून आपण आशीर्वाद व मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन डॉ विश्वासराव आरोटे यांनी केले. यावेळी महंत गुरुवर्य रामगिरीजी महाराज यांनी होकार देत आमचे आशीर्वाद व स्नेह सर्वांच्या पाठीशी असल्याचे मत व्यक्त केले. विश्वस्त मधुकर महाराज यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.





# जिंतूर महामार्ग पोलिसांकडून वाहन चालक, नागरिक, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतुर :** शनिवारी राष्ट्रीय महामार्ग क्र.752 (I) म.पो.केंद्र येथे मा.अपर महासंचालक , (वा)म.रा. मुंबई, मा.पोलीस अधीक्षक महामार्ग छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र श्रीमती जमादार मॅडम, पोलीस उप अधीक्षक डिसले ,पो. नि.पठाण ,यांचे मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान -2024 चे अनुषंगाने आरोग्य शिबीर कार्यक्रम घेतला या वेळी वाहन चालक, मोटर सायकल धारक, स्थानिक नागरी प्रवासी व म.पो.केंद्रातील अधिकारी व अंमलदार यांची नेत्र तपासणी, बीपी, शुगर व इतर व वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यावेळी जिंतूर महामार्गाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायकराव जाधव कर्मचारी गिराम, गुरसुडकर व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कुठलाही धर्म एकमेकांत दंगल घडवत नाही

## सुषमाताई अंधारे : मातृतीर्थ ते शिवतीर्थ 'मुक्तसंवाद पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांचे मातृतिर्थ ते शिवतीर्थ 'मुक्तसंवाद पदयात्रा ता.2 फेंब्रुवारीला जिल्ह्याच्या सिमेवर लोणी मार्गे मोप येथे धडकली,या प्रसंगी मोप येथिल जाहीर कॉर्नर सभेमध्ये कुठलाही धर्म एकमेकांत दंगल घडवत नाही,मग देशामध्ये दंगली होतात कशा ? आशा प्रकारे सत्ताधा-या विरोधात जोरदार प्रहार केला.

शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे ह्या एक वादळ म्हणुन उध्दव बाळासाहेब ठाकरे सेनेचा झंझावात मुक्त संवाद पदयात्रा रिसोड तालुक्यातील लोणी,मोप,चाकोली,मोरगव्हाण, भर जहागीर, मांगवाडी,रिसोड मध्ये दाखल झाली.यावेळी शिवसेना उपनेत्या सुसमाताई अंधारे यांच्या समवेत मुंबई येथिल उबाठा सेनेचे पदाधिकारी यांच्यासह,शिवसेना जिल्हाप्रमुख सुधीर कव्हर,सुरेश मापारी,शिवसेना सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप,माजी अभियंता बाळासाहेब देशमुख,प्रशांत सुर्वे उपजिल्हाप्रमुख डॉ.चंद्रशेखर देशमुख यांच्यासह तालुका प्रमुख,उपतालुका प्रमुख,सर्कल प्रमुख,शाखाप्रमुखासह,शेकडो कार्येकर्ते उपस्थित होते. यावेळी अंधारे यांनी मोप येथिल कुमारेश्वर मंदीरातील कॉर्नर



सभेला संबोधीत करतांनी अंधारे यांनी सत्ता-यांचा खरफुस समाचार घेत देशातील सुरू आसलेल्या आरजकते विषयी बोलतांनी कुठलाही धर्म एकमेकांत दंगल घडवत नाही,मग भाजपाच्या राजवटी मध्ये जर धर्माचा पाय मजबुत होत आसेल तर जातीपाती मध्ये दंगली होतात तरी कशा? तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे सत्तेत आसतांनी समाजा-समाजा मध्ये शांतता,सलोख्याचे वातावरण होते.परंतु या खोके सरकारणे राजकारणातील आराजकता शिगेला पोहचवित देश देशीधडीला पोहचविला आहे.मोप ते रिसोड दरम्यान शालेय विद्यार्थ्याशि संवाद करीत विद्यार्थ्यांचा वर्ग घेत शिक्षणा संदर्भात विचारणा केली,तर एका नेतावर जात तुर पिकाची काढणी करणाय-या मजुरांशी संवाद साधत शेतकरी वर्गाच्या व्यथा जाणुन घेत थेट सत्ताधा-यावर विविध प्रकारे आपल्या खास शैलीत प्रहार केला.तर भर जहागीर येथिल ग्रामसथांनी अंधारे यांचे जंगी स्वागत केले. आणि पुढील पदयात्रेस प्रयाण केले

# सामाजिक संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**अंबरनाथ :** उल्हासनगर - ५ मध्ये गायकवाड पाडा क्र ३ सेक्शन ३६ , समाजमंदिरात शिवराय,फुले, शाहू, आंबेडकर सामाजिक संघटनेच्या वतीने संविधानाच्या प्रस्ताविका वाटप आणि रक्तदान ही जन सामान्याची सेवा रक्तदान आहे. "रक्तदान हेच सर्वात श्रेष्ठ दान" रक्तदाणा मुळे नवीन, नवंजिवन मिळते. जीवनदान मिळते यामुळेच वाचतात अनेकांचे प्राण म्हणून भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तसेच या शिबिराचा लाभ ३५ तरुण युवकांनी घेतले तसेच मध्यवर्ती रुग्णालये चे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ मनोहर बनसोडे , डॉ विलास वाघमारे, डॉ हरिश बागडे, डॉ सतीश गंगावणे, नर्स शिंदे, यांचे विशेष सहकार्य लाभले असून या शिबिरा प्रसंगी शिवराय फुले शाहू आंबेडकर सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अजय अंकुश जाधव, गणेश आरकडे, अँड अमोल लोखंडे, सुरेश म्हस्के, यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते.



# अवैध रेती वाहतुकीला आळा घाला

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शहरातून व परिसरातून दिवस- रात्र विना नंबर वाहनातून अवैध रेती वाहतूक सुरू असून सदर वाहने हे शहरातून भरधाव वेगाने जात आहे या वाहनाने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच शासनाची चोरी करत सदर अवैध रेती वाहतूक बंद करत त्याला आळा घालण्यात यावा व महसूल पथक स्थापन करत विना नंबर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनावर कडक कारवाई करण्याचा ची मागणी भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष गजानन अंकुशराव मापारी यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना लोणार तहसीलदार गिरीश जोशी मार्फत एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद प्रमाणे मराठवाड्यातुन सुमारे ५० विनानंबर वाहणे चालु आहे. लोणार शहरातुन व तालुक्यात दिवस रात्र विना नंबर गाड्या ६ ब्रास, २ ब्रास हायवा, टिप्पर, गाड्या अवैद्यरीत्या शहरातुन भरधाव वेगान जात असुन या मुळे शहरात अपघात होण्याची दाट शक्यता आहे. अवैद्य वाहतूक सुरु आहे व या वाहतुक वेळी वाहतुकीचे सगळे नियम धाब्यावर बसून वाहतुक करत आहेत. तरी महसुल विभागाच्या अर्थपुर्ण दुर्लक्षामुळे लोणार तहसिल समोरुन व शहरातील मध्यवर्ती भागातुन विना नंबर वाहनातून अवैद्य रेती वाहतुक सुरु असून एखांदा अपघात घडल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. याला महसुल विभागाने पायबंद घालावी व महसुल पथक कार्यान्वीत करावे तसेच काही भागात महसुल प्रशासनाने जप्त केलेला रेतीसाठा काही दिवसासाठी पावत्या देत वाहतुकीला मुभा दिली आहे. त्या पावत्या सुद्धा तपासणी व्हाव्यात अन्यथा भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील. असाही इशारा निवेदनात दिला आहे. सदर निवेदन देतेवेळी भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष गजानन अंकुशराव मापारी ,उद्धव आटोळे जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया, विष्णू डोळे जिल्हा सचिव,सुरेश अंभोरे भाजपा उपाध्यक्ष,गजानन वरकड कि.मो. तालुकाध्यक्ष, सचिन डहाळके भाजपा उपाध्यक्ष,संजू डोळे सहप्रमुख,शेख जावेद अ.तालुकाध्यक्ष, दत्तात्रय नाडे अ.जा. मोर्चा तालुकाध्यक्ष,उपाध्यक्ष युवा मोर्चा.गजानन गायकवाड.प्रभाकर मोरे. सह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुलतानपूर शाळेत आनंद मेळावा उत्साहात साजरा, विद्यार्थ्यांनी केली दहा हजारांची उलाढाल

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सुलतानपूर शाळेत दि.3 फेब्रुवारी २०२४ रोजी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या आनंद सोहळ्याचा विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांनी तसेच ग्राम शिक्षण समिती अध्यक्ष व सदस्य यांनी आनंद घेतला.आनंद मेळाव्यात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने खूप छान छान चविष्ट व चटकदार खाद्यपदार्थ बनवून आणले होते. स्टॉलची मांडणी, विविध पदार्थांची विक्री, खरेदी व विविध पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला. आनंद नगरी चे उद्‌घाटन संजय मोरे, शिवाजी चव्हाण, दिलीप चव्हाण, बाळू चव्हाण, रामलाल निंभोरे, राम कृष्ण अधाने, रतन जाधव या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक सुरेश रहाणे व शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा तसेच कमवा व शिका याची जाणीव होण्यासह विविध व्यवसायाची माहिती व्हावी या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी होण्यासाठी संजय बुचुडे, मार्तंड चौधरी, हूमायून शेख,अनिस शेख, मिलिंद गिरधारी,वैशाली कंकाळ, सविता राऊत, रेखा खरात, कविता चव्हाण, पद्मा आधाने परविन बानो यांनी परिश्रम घेतले.



# नाम शिखर परिषदेची फलश्रुती



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**अलिप्त राष्टांची नूकतीच बैठक 15 ते 20 जानेवारी दरम्यायन युगांडाची राजधानी कंपाला येथे स्पेक रिसोर्ट मुनियोचो येथे संपन्न झाली. या परिषदेमध्ये जगातील 120 राष्ट्रे सहभागी झाली होती. रशिया-युक्रेन युद्ध तसेच इस्त्राइल हमासचा गाझापट्टीतील संघर्ष या पार्श्वभूमीवर या परिषदेला महत्त्व होते.गत वर्षी अझर बैजान कडे या परिषदेचे अध्यक्ष पद होते.योवेरी मुसेवेनी यांनी अध्यक्ष पद स्वीकारल्यानंतर झालेल्या या परिषदेत अनेक मुद्यावर विचार मंथन झाले.या शिखर परिषदेचा सामायिक जागतिक समृद्धीसाठी सहकार्यात वाढ करणे होता.120 सदस्यासह राष्ट्रे 18 निरिक्षक देश आणि 10 निरिक्षक संस्था यांचे प्रतिनिधी या बैठकीस हजर होते.गाझापट्टीमधील इस्त्राइल हमास संघर्ष थांबवावा आणि तात्काळ युद्ध बंदी करावी असा ठराव या शिखर परिषदेत करण्यात आला.**

शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामुदायिक प्रयत्नांची पराकाष्टा करण्यावर भर देण्यात आला.या परिषदेमध्ये विकसनशील राष्ट्रांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न भक्कम पणे मांडण्यात आले. भारताचे परराष्ट्र मंत्री यश जय शंकर यांनी या परिषदेमध्ये अभ्यासपूर्ण आणि परिषदेला नवी दिशा देणारे भाषण करून त्याद्वारे सर्व विकसनशील देशांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी भारताच्या सक्रीय सहकार्याबद्दल हमी आणि विश्वास जोमदारपणे प्रकट केला. जी-20 परिषदेमध्ये भारताने घेतलेल्या भूमिकांच्या अनुषंगाने पुढील वाटचालीसाठी ठोस सहकार्याचे आश्वासनही दिले. या परिषदेमध्ये झालेल्या विचार मंथनातून हे स्पष्ट होते की, नव्या बहूध्रुवी जगामध्ये नाम शिखर परिषद अधिक उपयुक्त सुसंगत आणि सुसंवादी भूमिका पार पाडत आहे.

**धोका आणि मर्यादा :** संयुक्त राष्ट्रसंघाचे सर चिटणीस अँटोन्युगुटेरस यांचे वर्तमान जगातील ताण-तणावाबद्दलचे भाषण महत्त्वपूर्ण ठरले. धोके व मर्यादा स्पष्ट करतांना त्यांनी सांगितले की सुदान आणि युक्रेन मधील वाढता भू-राजनैतिक तणाव, हवामान बदलाचे संकट, व्यापक गरिबी, जीवनासाठी करावयाचा उग्र संघर्ष यासह जागतिक स्तरावर अनेक मतभेदाचे प्रश्न या बाबतीत गुटेरस यांनी नवी दिशा दिली. 7 ऑक्टोबर रोजी हमासच्या घ्रनास्पद हल्ल्यानंतर इस्त्राइलने गाझापट्टीवर केलेला प्रति हल्ला आणि त्यातून झालेली जिवित हानी चिंताजनक आहे. संयुक्त राष्ट्रालाही अनेक कर्मचारी गमावावे लागले आहेत. युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत ते अधिक बिकट होतात असे सुत्र घेवून गुटेरस यांनी असे प्रतिपादन केले की, मानवतावादी दृष्टीने मदत वितरीत करण्यासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले असले तरी खराब झालेले रस्ते दळण-वळणतील अंधार आणि प्रवेश नाकारच्या वृत्तीने सततचे बॉम स्पोट आणि नवीन धोक्यांना सामना करावा लागत आहे. युद्ध क्षेत्रामध्ये रोगराई, उपासमार यांचा धोका संभवत आहे.लोक केवळ बॉब आणि गोळ्यांनी मरत नाहीत तर अन्न आणि शुद्ध पाण्याच्या कमतरतेमुळे, विज आणिऔषधाशिवाय रूग्णालये चालविणे कठिण झाले आहे. युद्ध थांबले पाहिजे आणि तत्काळ मानवतावादीने युद्ध विराम, ओलिसांची तत्काळ मुक्तता करण्यासाठी माझे प्रामाणिक आव्हान आहे, गुटेरस यांनी लाल समुद्रातील संघर्षाची ठिणगी रोखण्यासाठी ठाम उपायाची गरज आहे असे मत मांडले. गुटेरस यांच्या भाषणाचे सार अनिश्चित काळासाठी संघर्ष लाबणीवर टाकणे शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे.

ध्रवीकरण वाढत गेले तर अतिरेक्यांना प्रोत्साहन मिळू शकते.**नाम चे समर्थ नेतृत्व :** पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दूरदृष्टीमुळे शीतयुद्धच्या काळात नेहरू नासेर व टिटो यांनी नाम संघटनेची बिलग्रेड परिषदेत स्थापना केली.भांडवलशी व साम्यवादी गटाच्या समुदायापासून दूर राहून विकासाला योग्य वातावरण प्राप्त करून देणे हे नाम संघटनेचे उद्दिष्ट होते.महासत्तांच्या गटबाजीपासून दूर राहून विकासाला पोषक वातावरण तयार करणे हा नामचा आणखी एक उद्देश होता.सहभागी विकास आणि रचनात्मक प्रयत्नावर सकारात्मक दृष्टीने भर देऊन नाम परिषदेने वाटचाल केली आहे. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ते सध्याचे पंतप्रधान नरेद्र मोदी यांच्यापर्यंत सर्व नेत्यानी नाम संघटना सक्रीय करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. इन्डोनेशियात बान्डो येथे झालेल्या शिखर परिषदेतील ठराव आणि संयुक्त राष्ट्र संघातील उद्देश पत्रिका यामध्ये कमालीचे साम्य आहे. त्यामुळे नाम व युनो या दोघांचे कामे परस्पर पूरक व कमालीच्या सुस्पष्ट मूल्यावर आधारलेले आहेत. विकसनशील देशापुढे अनेक गुतांगुतीच्या समस्याबाबतीत नाम संघटनेने ठाम भूमिका घेतली आहे. शाश्वत विकास ध्येयासाठी 2030 पर्यंत संयुक्त राष्ट्र संघाला शाश्वत विकासची लक्ष साध्य करावयाची आहेत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, गरिबी, बेकारी अश्या अनेक समस्यांना




विकसनशील राष्ट्रे सामोरे जात आहेत. अश्या अनेक समस्यांचा सामना करण्यासाठी विकसनशील राष्ट्रांना भक्कम मदतीचा हात हवा आहे. आरोग्य शुद्ध पाणी व स्वच्छता या तेथे कळीच्या समस्या आहेत. **संयुक्त राष्ट्र संघात सुधारणाची गरज :** 21व्या शतकात 2 दशके उलटून गेली आहेत. अश्यावेळी संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यपद्धतीमध्ये सुरक्षा परिषद, सामाजिक आर्थिक मदत, सर चिटणीसांची भूमिका व कार्य तसेच विविध मंडळाची कार्य पद्धतीत सुधारण्याची नितांत गरज आहे. कालबाह्यझालेल्या अन्याय कारक आणि विशम जागतिक अर्थ प्रणाली यामध्ये बदल करण्याची गरज आहे. त्यामुळे नव स्वतंत्र देशांना यथायोग्य मार्गदर्शन लाभेल. आता गरज आहे ती पायभूत सुविधा, आरोग्य, पोषण आहार आणि शिक्षणाला चालणा देण्यासाठी त्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या रचना व कार्यपद्धती सुधारण्याठी गुटेरस यांनी भर दिला तो रास्त आहे. त्यामुळे वित्तीय व्यस्था प्रणाली सुधारण्याची गरज आहे.हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी डॅमेज फंड म्हणजे नुकसान टाळण्यासाठी कोश उभारण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली.सध्याचे संयुक्त राष्ट्रसंघाचे काम मर्यादीत व साचेबद्ध झाले आहे त्यात बदल करण्याची गरज आहे.हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी निश्चित मदत करण्याचे अभिवचन बढी राष्ट्रे बऱ्याच दिवसापासून देत आहेत. त्याची पुर्तता

त्वऱ्याने केली पाहिजे.जग युद्ध व तणावाच्या खाईत लोटले जाण्याच्या अवस्थेत असतांना 19 व्या शिखर परिषदेत घडविण्यात आलेले विचार मंथन डोळ्यात अंजन घालणारे आहे.संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेस झालेल्या ठरावास अनुसरून गाझापट्टीतून माघार घेण्यावर व युद्ध संपविण्यावर भर देण्यात आला आहे.युद्ध व तणाव कमी करण्याची संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका 19 व्या नाम शिखर परिषदेची फलश्रुती होय. नाम संघटना अधिक मजबूत झाली पाहिजे.19 जानेवारीचा सुरक्षा परिषदेतील ठराव हा विश्वासार्ह कृती कार्यक्रम सुचित करणारा आहे. नव्या जागापुढील प्रश्न सोडवावचे असतील तर, नाम चळवळ :किती प्रभावी किती सक्षम? युगांडा शिखर परिषदेचे सुप वाजले परंतु ही चळवळ किती प्रासंगी किती सक्षम आहे असा प्रश्न विचारला जात आहे.भविष्य काळात नाम सदस्य राष्ट्रांचे जिवंत प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिक गंभीर प्रयत्न करावे लागतील. अनेक अफ्रिकी देशामध्ये शाश्वत विकासाची लक्ष साध्य करण्यासाठी अधिक रचनात्मक प्रयत्न करावे लागतील. आफ्रिका कोशाला भारताने भरगोस सहाय्य केले आहे. आता सयुक्त राष्ट्र संघ नाम शिखर परिषदेने ठोस कृती कार्यक्रम आखला पाहिजे.हा कार्यक्रम कालबद्ध आणि तेवढाचा सुसूत्र असला पाहिजे.विकास प्रकल्पावर खर्च होणारा पैसा प्रत्यक्ष गरिब देशातील लोकांच्या पदरात

कसा पडेल हा खरा प्रश्न आहे.नव्या जगामध्ये सामाजिक, आर्थिक प्रश्न बदलत आहेत तसेच काळानूरूप व्यवस्थेत होणारे बदल अधिक प्रमाणात गरिब देशांच्या पथ्यावर कसे पडतील हे ही पाहावे लागतील. **समारोप :** या सर्व चर्चेचे सार असे की, युगांडातील कांप्ला येथे 19 वी नाम शिखर परिषद झाली. या परिषदेतील सदस्य राष्ट्रांनी अनेक सुचना केल्या ठरावही संमत झाले परंतु भारतातचे परराष्ट्र मंत्री जय शंकर आणि संयुक्त राष्ट्र संघाचे सर चिटणीस गुटेरस यांची भाषणे अधिक पथदर्शक ठरली. नजीकच्या भविष्य काळात नाम शिखर परिषदेला केवळ ठरावांची भेंडोळी करून चालणार नाही परस्पर सहकार्यातून कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि ऊर्जा या विकास क्षेत्रावर अधिक भर दिला पाहिजे. हे सर्व चित्र बदलण्यासाठी नाम देशांना सोबत घेऊन नव्या दिशेन प्रयत्न करणे पंतप्रधान नरेद्र मोदी यांच्या कृतीमान नेतृत्त्वावर अवलंबून आहे.पुढील 20 व्या नाम शिखर परिषदेत पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी नाम शिखर परिषदेला नवा जाहिर नामा दिला पाहिजे.भारतातने जसे विकासाचे नवे प्रतिमान (मॉडेल)विकसित केले आहे. तसे प्रत्येक नाम सदस्यांने स्वतःचे विकास प्रतिमान तयार केले पाहिजे.तरच वसुधैव कुटुंबकंम या जी-20 शिखर परिषदेतील नारा प्रतिमध्ये येऊ शकेल.वाट चुकलेल्या नाम सदस्यांना मार्ग दाखवण्यासाठी भारत हाच आशेचा किरण आहे.

# हाथ लगे निर्माण में...



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**हाथ लगे निर्माण मे ... श्रद्धेय बाबा आमटे यांचे हे वाक्य. श्रद्धेय बाबा आमटे यांनी समाजाने फेकून दिलेल्या कृष्ठ रुग्णांना एकत्र करत त्यांच्यामध्ये स्वाभिमान निर्माण केला. त्यांच्या हाताला कौशल्य दिलं. अथक परिश्रमातून आनंदवन उभ राहिलं. आणि त्या ठिकाणी कृष्ठरुग्ण आपलं आयुष्य पुन्हा एकदा नव्याने जगू लागले . बाबा आमटे यांनी समाजाला सुद्धा सांगितलं की तुम्ही त्यांना एक संधी द्या , तुमची दया नको . आणि लोकांनी आनंदवनातील कृष्ठ रुग्णांच्या हातून घडणाऱ्या विविध वस्तूंना घेऊन याच आनंदवनाला एक संधी दिली .**

हे करत असतानाच बाबांनी म्हटलं," हाथ लगे निर्माण मे, नही मांगणे नही मारणे". अर्थात जेव्हा कुठल्याही विधायक कामासाठी हात एकत्र येतात आणि काम करू लागतात तेव्हा त्या हातांना समाजातील इतर गोष्टींकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही . आणि समाजात काही तरी नवीन असं निर्माण व्हायला लागतं. 22 जानेवारी 2024 या दिवशी अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामचंद्रांच्या भव्य मंदिराचं लोकार्पण आणि श्री राम लल्लांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजाला आवाहन केलं होतं , समस्त भारतीयांना आवाहन केलं होतं की , तुम्ही तुमच्या परिसरातील मंदिराची आणि मंदिर परिसराची स्वच्छता करा . जिथे आहात तिथेच राम नामाचा संकीर्तनामध्ये स्वतःला तल्लीन करा . भजन , कीर्तन आणि आठ दिवस स्वच्छता अभियान अस आवाहन देशाच्या पंतप्रधानांनी केलं . आणि देशाच्या पंतप्रधानांना त्यांनी केलेल्या आव्हानाला समस्त भारतीयांनी प्रचंड असा अभूतपूर्व प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळालं. 22 जानेवारीच्या आठ दहा दिवस आधीपासूनच ठीक ठिकाणी सगळ्या नागरिकांनी आपली जात , धर्म ,पंथ ,पक्ष सोडत एकत्र येत अनेक ठिकाणी मंदिराची स्वच्छता ,मंदिर परिसराची स्वच्छता , मंदिराला पेंटिंग , लाइटिंग लावणं आणि संपूर्ण परिसर छान सुसज्ज करण्याचं काम सुरू केलं. सायंकाळी अनेक लोक मंदिरामध्ये एकत्र यायला लागले . आणि भजन संध्या होऊ लागली. काही ठिकाणी महाप्रसादाचा आयोजनही सुरू झालं होतं. समाजामध्ये विधायक कार्याची दिशा देणं हे खूप महत्त्वाचं असतं . देशाच्या पंतप्रधानांनी केलेल्या या आवाहणातून समाजाला ही विधायक दिशा देण्याचे काम समोर येऊ लागलं . आणि समाजातील लोक खऱ्या अर्थाने मनापासून एकत्र येत चांगले काम करू लागले . आणि यातूनच अनेक ठिकाणी स्वच्छता अभियान राबविल्या गेलं , महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं . हे सगळं होत असताना कुठेही जात, धर्म , पंथ ,पक्ष आडवे आले नाहीत . एरवी मात्र जाती-जातीत फूट पाडण्याचं काम विविध पक्ष सातत्याने करत असतात. राजकारणामध्ये आपली पोळी शेकून घेण्यासाठी जाती-जातीत फूट पाडायची , प्रत्येक जातीला एकमेकांच्या समोर उभ करायचं आणि राजकारणात आपली खुर्ची कशी टिकून राहील याचा प्रयत्न करायचा या दृष्टीने प्रयत्न सुरू असतात. परंतु गेल्या दहा-बारा दिवसापासून संपूर्ण भारतामध्ये जे एक वातावरण निर्माण झालं होतं ते वातावरण जेव्हा पाहिलं , लोकांनी अनुभवलं तेव्हा एक गोष्ट मात्र सातत्याने लक्षात आली की , जर लोक विधायक कामासाठी एकत्र येत असतील



, त्यांना चांगली दिशा दाखवण्यात येत असेल आणि जर लोकांनी मनापासून एखाद्या गोष्टीचा स्वीकार केला तर समाजामध्ये कुठलीही तेढ निर्माण होत नाही . समाजामध्ये वितुष्ट निर्माण होत नाहीत .आणि समाज हा एकसंघ होऊन उभा राहतो . आज या देशाला खऱ्या अर्थाने एकसंघ होऊन उभं राहणं हे खूप गरजेचे आहे . गेल्या काही वर्षात संपूर्ण जगामध्ये इराण - इराक असो , अफगाणिस्तान असो , इजराइल असो , की आता पाकिस्तान असो , आणखीन विविध देशांमध्ये सुरू असलेले युद्ध पाहता आपल्याला हा देश एकसंघ कसा राहील आणि कुठल्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी हा देश जात , धर्म , पंथ ,पक्ष सगळे बाजूला ठेवून एकत्र कसा राहील हे पाहणं अतिशय आवश्यक आहे . या दृष्टीने विचार करता राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने समाजामध्ये सुरू झालेला हा एक विधायक प्रयोग निश्चितच अभिनंदनिय आणि दखल घेण्यासारखाच आहे . खरं तर या आठ दहा दिवसांमध्ये समाज माध्यमांवर काही लोकांनी कोल्हेकुई करण्याचा प्रयत्न केला. पण लोकांनी याकडे दुर्लक्ष केलं किंवा , काही लोकांनी त्यांना त्या समाज माध्यमावरच सडेतोड उत्तर देऊन त्यांची तोंड बंद केले . हीच खरी एकसंघ देशाची ओळख आहे . आणि म्हणूनच आज या संपूर्ण कार्याचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा देशाच्या पंतप्रधानांची असलेली दूरदृष्टी , त्या दूरदृष्टीतून त्यांनी केलेलं आवाहन , या आव्हानाला समाजांनी दिलेला प्रतिसाद आणि गल्लीबोळापासून तर मुख्य मार्गापर्यंत , वेगवेगळ्या चौका पासून तर ठिकठिकाणीच्या मंदिरापर्यंत , तरुण असो , आबाल वृद्ध असो ,महिला असो , पुरुष असो ,कोणीही असो हे सगळे जण रामनामाच्या संकीर्तनामध्ये दंग झालेले, तल्लीन झालेले आपण पाहत होतो . अनेक ठिकाणी कुठल्याही राजकीय पक्षाचा पुढाकार न घेता भव्य प्रमाणामध्ये शोभायात्रा काढण्यात आल्या. यावेळेस सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणीही कोणालाही वर्गणी मागितली नाही . प्रत्येक मंदिरामध्ये आपल्याला महाप्रसादाचा आयोजन करताना लक्षात आलं , दिसलं , पाहिलं . पण त्यासाठी कोणीही कोणाला वर्गणी सुद्धा मागितलेली नव्हती . तर प्रत्येकाने आपापल्या परीने जमेल तेवढ दान देण्याचा प्रयत्न केला . आणि या दानातूनच मोठ्या प्रमाणामध्ये ठीक ठिकाणी आपण महाप्रसादाचा आयोजन झालेल सुद्धा पाहिलं . समाजामध्ये काही विधातक लोक असतातच. पण या विधातक लोकांकडे दुर्लक्ष करून समाज आणि राष्ट्रासाठी काय योग्य आहे ? काय अयोग्य आहे ? हे आता लोकांना पटायला लागले आहे . लोकांच्या लक्षात यायला लागले की हा देश एकसंघ उभा राहण्यासाठी आता आम्हाला काय करायचंय ? आणि म्हणून समाजातली ही एकजूट या राष्ट्राच्या निर्मितीसाठी सगळ्यात महत्त्वाची ठरणारी आहे. आणि म्हणूनच बाबा आमटे यांचं वाक्य पुन्हा एकदा आठवतं . त्यांनी जेव्हा सर्व कृष्ठ रुग्णांना एकत्र करून आनंदवनची निर्मिती केली तेव्हा त्यांनी म्हटलेलं वाक्य , " हाथ लगे निर्माण में , नही मांगने नही मारणे " . आज या देशाला सुद्धा राष्ट्र निर्माण कार्यासाठी हाथ लगे निर्माण मे ..... हेच वाक्य घेऊन पुढे चालायचं आहे . समाजा समाजामध्ये तेढ निर्माण होऊन एकमेकांच्या समोर उभे ठाकण्यापेक्षा आम्हाला आज हे राष्ट्र पुनर्निर्माण करत विश्वगुरूपदी आसनस्थ करावयाचे आहे . त्यासाठी चला आपण सगळेजण मिळून एकत्र येऊ या . आणि या राष्ट्राच्या पुनर्निर्माणामध्ये मध्ये आपण सगळे आपलंही योगदान देऊया .



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# मोदी सर

आधुनिक केसरी

**गेली काही वर्षे पंतप्रधान मोदीजी परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थी पालक यांच्याशी संवाद साधत आहेत. यावर्षीचा हा लाईव्ह कार्यक्रम नुकताच प्रसारित झाला. श्री मोदीजीचे सुरुवातीला संबोधन, अन् नंतर प्रश्नोत्तराचा, शंका समाधानाचा कार्यक्रम असे याचे स्वरूप आहे. इथे हॉल मधील हजारो पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या समवेत देशाच्या काना कोपऱ्यातील, विविध राज्यातील विद्यार्थी, शिक्षक देखील ऑनलाईन जोडलेले असतात. आधुनिक तंत्रज्ञानाने साध्य झालेली ही या कार्यक्रमाची जमेची बाजू.**

काही टीकाकार यालाही नावे ठेवतील. पंतप्रधानांना दुसरे काही काम नाही का अशी हास्यास्पद टीकाही करतील! खरे तर देशाचा पंतप्रधान परीक्षेच्या आधी मुलांशी संवाद साधतो,त्यांचा ताण कमी करण्याचा प्रयत्न करतो,अनुभवाच्या, युक्तीच्या चार गोष्टी सांगतो हेच वेगळेपण आहे.मुले ही देशाची संपत्ती आहे. त्यांची जडणघडण,त्यांची अडचण, त्यांचे संस्कार ही जशी पालक,शिक्षकाची जबाबदारी आहे,तशीच ती सरकारची, देशाच्या प्रमुखाची देखील जबाबदारी आहे हा पंतप्रधानांचा कर्तव्य भाव यातून प्रगट होतो. मोदीजी किती काय शिकले आहेत,त्यांनी कोणत्या विद्यापीठाची कोणती पदवी घेतली आहे, वगैरे प्रश्न इथे माझ्या मते गौण ठरतात.देशाचा पंतप्रधान एखाद्या कुटुंब प्रमुखासारखा आपल्याशी थेट संवाद साधतो, जिव्हाळ्याने बोलतो हेच महत्वाचे..

अभ्यास कसा करायचा,शिस्त कशी पाळायची, वेळेचे नियोजन कसे करायचे,एकमेकाशी स्पर्धा न करता,परस्परांना मदत कशी करायची,सहकाराची भावना कशी जोपासायची,मनावर नियंत्रण कसे ठेवायचे, ताण न घेता चित्त शांत कसे ठेवायचे हे सारे फक्त परिक्षेशी संबंधित नाही. ते पूर्ण जीवनाशी संबंधित आहे.. मोदीजी हे थेट वारसा हककाने मुख्यमंत्री, पंतप्रधान झालेले नाहीत.ते आधी स्वयं सेवक होते अनेक वर्षे.. नंतर पक्षाचे साधे कार्यकर्ते..संघटनेत काम..देश भ्रमण.. लोकांना समजून घेणं,समस्यांची ओळख करून घेणं, त्यावर चिंतन मनन करणं.. या खडतर प्रक्रियेतून गेले आहेत.वर शिखरा पर्यंत पोहोचले आहेत. म्हणून त्यांच्या शब्दाला महत्व आहे.विचारात तथ्य आहे.

एरवी अशा कामासाठी हजारो रुपयांचे मानधन घेऊन पिपिटी व्दारे रंगीत स्लाईड शो करणारे बरेच समुपदेशक, कौसेलर आहेत. ते सारे चार बुके वाचून मिळवलेले पुस्तकी ज्ञान.मोदीजी स्लाईड शो दाखवीत नाहीत. पॉवर पॉइंट



प्रेझेंटेशन करीत नाहीत. खरे तर त्यांना हे सहज शक्य आहे. कार्यालयातील सचीवाला सांगितले की झाले काम! मोदीजी चे बोलणे उत्स्फूर्त असते. ते अनुभवातून शिकलेले बोल आहेत. बालकांचे मनो विज्ञान वाचून, पालकाच्या ताण तणावाचे सायको अनालीसिस वगैरे करून मिळवलेले ते तांत्रिक ज्ञान नाही.म्हणून हे अस्सल वाटते. मुलांना, पालकांना हा सहजभव जाणवतो.त्यात ते इन्वोलव होतात.समरस होतात.कोणत्याही समुपदेशात हे ट्युनिंग महत्वाचे असते. शब्द तितके महत्वाचे नसतात.ते कोण कसे वापरतात हे जास्त महत्वाचे. या बाबतीत मला माझे अनेक वर्षांचे सहकारी मित्र डॉ कलाम यांची आठवण होते. ते डी आर डी ओ मध्ये असे पर्यंत वक्ता म्हणून तितके पॉप्युलर नव्हते. निवृत्ती नंतर, राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांचे संवाद साधणे सुरू झाले.अन् अचानक ते प्रकाश झोतात आले. विद्यार्थी वर्गातच नव्हे तर सामान्य जनात लोकप्रिय झालेत. त्यांची सर्बमव भाषणे एकत्रित वाचली तर त्यात तोच तो पणा सहज जाणवतो.तेच ते मुद्दे रिपीट होताना दिसतात. तरी ते लोकप्रिय होतात. स्वतःची क्रेझ निर्माण करतात.कारण ते सहज सोपे बोलतात.शब्दाची आतिषबाजी करीत नाहीत. फटाके उडवीत नाही.ते थेट हृदयाशी भिडतात. पब्लिक मध्ये थेट मिसळतात.मोदीजी म्हणा किंवा डॉ कलाम म्हणा, आपल्याला ते आपले जवळचे वाटतात.ते सांगतात त्यात मुले पालक गुंतत जातात. त्याचा योग्य तो चांगला परिणाम देखील होतो.आपली आजी कुठे शिकली होती? तिने कुठले जग पाहिले होते? पण तिच्या सांगण्यात ममत्व असायचे.जिव्हाळा असायचा.हीच इन्वोलव्मेन्ट मोदीजी च्या परीक्षा पे चर्चा मध्ये दिसते. म्हणूनच मोदी सरांचे मुला मुलींना,पालकांना ऐकावेसे वाटते.तसेही मुलाशी परीक्षेच्या आधी संवाद साधणारे,त्यांचे शंका समाधान करणारे, त्यांना धीर देणारे मोदीजी जगातले एकमेव पंतप्रधान असतील.कुणी म्हणेल ते सारे अत्यंत बिझी राष्ट्र प्रमुख असतात.असतील.. अत्यंत व्यस्त असतील.पण विद्यार्थ्यांशी संवाद साधणे देखील इतर कामा इतकेच महत्वाचे आहे असे कर्तव्य भावाने मानणारे मोदीजी एकमेव असतील. त्यांचे हे वेगळेपण म्हणूनच भावते.हृदयाला भिडते. तसेही न पेलणारा अभ्यास, शिकवण्यात फारसा रस नसलेले शिक्षक, भविष्या विषयी नको तितके जागरूक, ताण वाढवणारे पालक अशा चहू बाजूंनी चक्रव्यूहात फसलेल्या विद्यार्थ्यांना आपले जवळचे वाटणारे कुणीतरी हवेच असते..परीक्षेच्या आधी संवाद साधायला. मोदी सरांनी ही गरज ओळखली यातच त्यांचे नेता म्हणून वेगळेपण जाणवते..



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# रोहित बाबु, ईडीचा बाऊ का करताय ?

आधुनिक केसरी

**शरदचंद्र पवारांच्या राहिलेल्या गटात रोहित पवार सद्या महत्वाचे नेते म्हणुन ओळखले जातात. वयाने कमी असल्याने युवा नेते अशी त्यांची ओळख साहजिकच म्हणावी लागेल. प्रस्थापित राजकारण्याचं लेकरू राजकिय प्रवाहात आल्यानंतर संघर्ष करण्याची वेळ त्यांच्यावर नसती दुर्दैवाने रोहित पवार यांच्यावर आली त्यांच्या नशिबाचा भाग. कारण मोठ्या साहेबांनी सारं आयुष्य सत्तेच्या गादीवरच घातलं म्हणा. आमदारकीची पहिलीच पाच वर्षे पुर्ण होत नाहीत तोच त्यांच्या पक्षात मोठी फुट पडली.**

तब्बल चाळीस आमदार सोबत घेवुन रोहित यांचे काका राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा बाहेर पडले. मोठ्या साहेबांचा वारसा चालवण्याची सर्वस्वी जबाबदारी या लेकरावर येणे साहजिक म्हणुन की काय? त्यांना अल्पावधीत महाराष्ट्राचा



नेता होण्याचे स्वप्न पडू लागले अन् त्यासाठी त्यांची धडपड सुरू झाली. बारामती ॲग्रो अर्थात खासगी साखर कारखान्यातला खरेदी व्यवहार ज्याची तक्रानुव्ये चौकशी केंद्रिय तपास यंत्रणेमार्फत सुरू आहे. ज्यासाठी दस्तुरखुद्द रोहित यांना दोन-तीन वेळा ईडी कार्यालयात जावं लागलं. खरं तर तपास यंत्रणेचा भाग म्हणून समोर जाताना राजकिय बाऊ करायची गरज नाही. पण यांनी ईडीची चौकशी आली, ईडीने बोलावलं असा डांगोरा पेटवत मोठ्या साहेबांसह काकु-काकींना ईडीच्या दरबारातच घेवुन जाणं पसंत केलं. प्रश्न हाच पडतो की, ईडीचा बाऊ कशासाठी? त्याचं उत्तर शोधलं तर आता मोठ्या साहेबांकडे मीच अजितदादा हे दाखवण्यासाठी राज्य पातळीवर नेतृत्व करण्याची लागलेली आस असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही.रोहित पवारांना ईडीनं बोलावल्यानंतर ज्या प्रकारचं राजकिय वादळ त्यांनी उठवलं, त्यामागचे कांगोरे आता खऱ्या अर्थाने चर्चेत येताना दिसतायेत. एक गोष्ट खरी आहे की, या देशात केंद्रिय तपास यंत्रणा वेगळं अस्तित्व आहे ज्याला ईडी नावाने ओळखल्या जाते. याची सामान्य जनतेला ओळख नव्हती. कारण देशाचा कारभार वर्षानुवर्षे कॉंग्रेसने केला. पण अशा संस्थांना स्वायत्तता न देता दाबुन ठेवले. त्याचं कारण भ्रष्टाचार हाच खरा रंग कॉंग्रेस व्यवस्थेचा होता. सारे मिळुन भाऊ आणि खाऊ असंच नाते असल्याने ईडी सारख्या तपास यंत्रणा सामान्य जनतेला कधीच माहिती झाल्या नाहीत. 2014 ला सत्तेवर आल्यानंतर काळा पैसा बाहेर काढणे असेल किंवा भ्रष्टाचारमुक्त सुशासन हे आश्वासन खऱ्या अर्थाने भाजपाने जनतेला दिलं होते. लोकांनी एकदा नव्हे तर 2019 ला देखील प्रचंड विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर दाखवला. त्याचं कारण हेच आहे की, भ्रष्टाचार पोखरून काढताना केंद्रिय तपास यंत्रणा, त्यांना दिलेली स्वायत्तता त्यातुन देशाला झालेली ईडीची ओळख काल परवाच झारखंडचे मुख्यमंत्री सोरेन यांना अटक झाली ती केवळ भ्रष्टाचारामुळेच. कॉंग्रेस कार्यकाळात ईडीची एकही कारवाई नव्हती. एवढेच नव्हे तर साधे कार्यालय देखील कुणाला माहित नसायचे. नऊ वर्षात ईडीनं भ्रष्टाचारांना हात दाखवताना केलेल्या कारवाया कमालीच्या असुन ज्यांच्या तक्रारी आल्या त्यांना ईडी काय आहे? हा दणका निश्चित मिळाला. मनी लॉंड्रींग असेल, जास्तीची संपत्ती असेल किंवा अनेक भानगडी ज्यातुन ईडी आता कुणाला सोडत नाही. महाराष्ट्रात ईडीच्या कारवाई विरोधात विरोधक रान उठवतात पण सामान्य जनता मात्र स्वागत करते. अगदी मंत्र्यांना देखील ईडी काय करू शकते? सामान्य जनतेला कळुन चुकलं. 100 कोटीच्या आरोपात याच राज्यात अनिल देशमुख नावाचे गृहमंत्री जेलमध्ये होते. नवाब मलिक जेलात आहेत. हे सारं ईडीमुळेच. खरं तर केंद्रिय तपास यंत्रणा स्वतंत्रपणे काम करण्यास देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच नऊ वर्षात वाव मिळाल्याची प्रतिक्रिया यंत्रणेत काम करणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांनी बोलुन दाखविली. महाराष्ट्राचं राजकारण विरोधकांनी ईडीभोवती रंगवुन ठेवलं असं म्हटलं तर चुकीचं नाही. ईडीची पहिली नोटीस आली तरी आरडाओरड विरोधक करतात. पण सामान्य जनता मात्र ईडीच्या भुमिकेचे स्वागत करताना दिसते. बारामती ॲग्रो यांनी खरेदी केलेल्या कारखान्याच्या व्यवहारात जिथे रोहित पवार प्रमुख जबाबदार त्या व्यवहाराची चौकशी ईडीमार्फत सद्या सुरू आहे. रोहित पवारांना चौकशीसाठी दोन-तीन वेळा ईडीनं बोलावलं. आठ-आठ तास त्यांचे जबाब घेतले. यातलं सत्य असत्य तपासाअंती निश्चित कळुन चुकेल. पण ईडीच्या नोटीसाचं राजकारण किती रंगवुन सभोवती फिरवल्या जातं हेच लक्षात घेण्यासारखं. ईडीनं बोलावलं म्हणजे जावायानं सासुरवाडीला बोलावल्यासारखा थाटमाट रोहितबाबुंनी करून घेतला. कार्यालयात जाताना कार्यकर्ते, समर्थक आले, स्वतः मोठे साहेब कार्यालयाबाहेर बसले. सुप्रियाताई उंबरठ्यापर्यंत आल्या. दुसऱ्यांदा तर दस्तुरखुद्द काकी आल्या. एखाद्या संकटात लेकराच्या पाठीमागे कुटुंबाने रहाणे आपण समजुन घेवु शकतो. पण लेकरू पराचा कावळा का करू लागलं? हे कुटुंबियाला समजलं नाही तरी याचि देहि, याचि डोळा पाहणारी जनता दुधखुळी नसते. काही तरी खालीवर मोठ्या प्रमाणावर लेकराकडून झालं यात आता शंका नाही. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे रोहितबाबु ईडीचा बाऊ का करू लागले? त्यामागे राजकिय मोठंच कारण म्हणावे लागेल. राष्ट्रवादी पक्षाचा गट फुटला. अजितदादा बाहेर पडले. सद्या तरी मोठ्या साहेबांच्या पक्षाची अवस्था लहान होवुन बसली. शिवाय साहेबांचा वारसदार म्हणुन माझ्याशिवाय कुणी नाही. हे दाखवण्याची वेळ आणि दुसरं महत्वाचं म्हणजे कदाचित अजितदादा बाहेर पडले नसते तर रोहित बाबुवर नेतृत्व करण्याची वेळ अद्याप आली नसती. दुसरी बाजु पाहिली तर बरं झाले दादा निघुन गेले, आता मीच रोहितदादा. हा राजकिय दुरदृष्टीपणा कदाचित त्यांना डोळ्यासमोर दिसत असेल. मध्यंतरी काढलेली संघर्ष यात्रा नव्हे तर त्यांचं पक्षाचा नेता म्हणुन येत असलेली वेगवेगळी वक्तव्य हे सारं पाहिल्यानंतर रोहितबाबुंना असं निश्चित वाटत असेल की, शिल्लक राहिलेल्या राष्ट्रवादी पक्षाचा नेता मीच होवु शकतो आणि मोठ्या साहेबांच्या पुण्याईवर आश्वारूढ होवुन या राज्याचं नेतृत्व मीच करू शकतो. कदाचित हा सारा अभ्यास त्यांच्या डोक्यात निश्चित असावा. ज्यामुळे केवळ गाजावाजा ईडीचा करत असले तरी यामागे भलतेच किडे त्यांच्या डोक्यात वळवळ करत असल्याचे लक्षात येतं. अजितदादांच्या अंगावर थेट शब्दांचा मारा करणं असेल किंवा नेतृत्वाची खुमखुमी असेल खरं तर मध्यंतरी जितेंद्र आवाडांनी देखील बाळ तु लहान आहेस असं म्हणत रोहितबाबांना त्यांची जागा दाखवुन दिली होती. पण जेव्हा नेतृत्वाची संधी येवु पहाते तेव्हा अंग देखील संचार झाल्यासारखं होतं. त्यावेळी लहान तोंडी मोठा घास लेकरं घेतात आणि अशा प्रकारचे नाटकं करत ईडीच्या चौकशीला सामोरे जातात. नेत्यावर वेळ आली तर कार्यकर्ते सोबत येणं साहजिक म्हणावे लागेल. पण जो असा नेता असतो की आपण केलेल्या भानगडी देखील छाती काढून सहकाऱ्यांना सांगण्याची कुवत त्यांच्यात असावी. पण जिथं काही काळं बेरं केलेलं असतं तेव्हा नैतिकता अशा राजकिय नाट्याच्या गोदडीखाली लपुन रहाते आणि मग नको त्या गोष्टीचा पराचा कावळा केला जातो. केंद्रिय तपास यंत्रणेनं भ्रष्टाचारी लोकांना जणु काही हात लावायचाच नाही याच भुमिकेत विरोधक मंडळी असुन रोज ईडीच्या नावाने शिमगा करताना दिसतात. खरं तर रोहित बाबुंनी ईडीच्या नोटीसचं स्वागत करत केंद्रिय तपास यंत्रणा किती पारदर्शक काम करते? हे मान्य केलं असतं तर त्यांच्या वाढत्या लोकप्रियतेत अधिक वाढ झाली असती. पण ईडीचा बाऊ करत सुरू असलेली आरडओरड यामागचे सत्य जनतेला कळुन चुकलं हे मात्र नक्की.



## नथ मोत्याची

नथ मोत्याची
परी तार तिची सोन्याची
नथ मोत्याची
मोत्याची नथ नाकात
जागी मोक्याच्या
बांधते कमरबंद
अंग चोळीला
लावलाय सोन्याचा बंध

माझा इशारा
साऱ्या गर्दीत मारतोय चकरा
माझ्या इंग्यावर
गर्दीत होताया दंगा

नथ मोत्याची
मोत्याची नथ नाकात
जागी मोक्याच्या
बांधते कमरबंद

माझ्या साडीला
साडीला रेशमी झूल
माझ्या गाडीला
गाडीला गुलाबी फुल

केसात मोहरतो मोगरा
फुलतो गुलाबी चेहरा
अंगलट खेचून येत्या
गावभर नजरा

माझ्या प्रीतीचा गंध पसरला
लागले निमंत्रण भलतेच यायला
तुम्ही कितीही वरचढ धावला
माझ्या हातात लगाम हायना

माझा इशारा
साऱ्या गर्दीत मारतोय चकरा
माझ्या इंग्यावर
गर्दीत होताया दंगा

नथ मोत्याची
मोत्याची नथ नाकात
जागी मोक्याच्या
बांधते कमरबंद

माझा इशारा
साऱ्या गर्दीत मारतोय चकरा
माझ्या इंग्यावर
गर्दीत होताया दंगा

@ लक्ष्मण गं वाल्डे -कन्नड

## काळचक्र

जाळ उठती मनामध्ये,
श्वास् आता थांबू लागला,
अजून , किती भार या देहाचा,
आता उचलायचा बाकी
राहिला..!!"

वेळ ही आता अशी थैमान घालत
आहे,
एक जिव- सूक्ष्म जगाला,
मृत्यूच्या दारात आणून ठेवत
आहे...!!"

ह्या संकटाच्या वादळाने,
जीवसृष्टी ही धोक्यात
येऊलागली..,
सारी जीवसृष्टीह्यासंकटातआता,
हळू हळू नष्ट होऊ लागली...!! "

चला उठा आता, वेळ नाही
बसण्याची,
करूया प्रयत्न काही तरी,
देऊ लढा या संकटाला
आता सर्व एकत्र येऊनी ...!!

सर्वसहकार्याने
वेळ आता आहे ही लढण्याची....,
न करताविरोध एकमेकांच्या
वक्तव्याचा,
समजून चाला आता हा काळ
आहे....
सर्वांच्या विनाशाचा ....!! "

विलंब आता खूप झाला....,
आता वेळ आली लढण्याची..,
येऊनी सर्व एकत्र आता,
करूया निर्माण एक ऊर्जा..
सामर्थ्याची..!! "

वेळही, क्षणिकराहिली,
आता आपुल्या धैर्याची..
उठा, लढूया आता या
संकटाशी,
सर्व एकत्र येऊनी...!!

न थांबणारे हे कालचक्र,
वेठीस धरू लागले जिवाला...,
मिळूनीया सर्व आता,
करूया पर्यास्त या क्षणाला..!!

- तुषार राजेश लाखे .
-वरोरा जिल्हा चंद्रपूर

## खेळ माणसाच्या जीवनाचा

जगतो भ्रमात माणूस जगी जीवन सारे त्याचे
म्हणतो! हे माझे ते माझे कुणी नसते कुणाचे!

सारे जवळ असूनही, त्याचे कुणीच नाही!
हा खेळ कसला जीवनाचा! की प्रारब्धाचा!

कुणा ना कळे जीवनी आहे खेळ हा कुणाचा
करतो खेळ कुणी भावनांचा, तर कुणी पैशांचा!

काय मिळते अशाजनांना करुनि खेळ पामरांचा
सारे लोभी धनाचे कुणी न जाणी मोल जीवनाचे

वेळ चांगली तुमची, तर असतात सगळे तुमचे
अन्यथा, असूनही जवळचे तुमच्या दूर जातीसारे

हे सत्य जीवनाचे आहे या जीवनी खरेखुरे!
जन्म हा माणसाचा दवडिती व्यर्थ जीवनी सारे

मधुकर ए.निलेगावकर
मो. ९४२१३७५६९१

## प्रतिक्षा

आठवणीच्या कळया आज
उमलताना, सांग तू येशील
ना सांग तू येशील ना.. धृ..
तुटलेल्या साकवावरलाटेतला
तो थेंब तुषारात विखरण्या
आधी पोहाचशील ना.
सांग तू येशील ना, सांग तू येशील ना..१..

दूरच्या रानातल्या हुरहूर त्या सावल्या,
दूर अंधारात सामावण्याआधी भेटशील ना.
सांग तू येशील ना,सांग तू येशील ना..२..

मांडवावरच्या झावळ्या
भिंतीवरून उतरूनी अंगणी
येण्याआधी, फक्त एकदा
दिसशील ना.
सांग तू येशील ना,येशील ना..३..

आठवणींच्या कळयाचे फुल
उमलूनी , पाकळ्या मिटण्या
आधी सुगंधात दरवळशील ना.
सांग तू येशील ना, सांग तू येशील ना..४..

© सौ.वैशाली इंदुमती जाधव - महाडिक.
मो. क्र. - ९७६७४३७९२३



## लेखणी

आज घेतली लेखणी
आज घेतली लेखणी
बळीराजा तुझ्यासाठी
खूप झिजला तू राजा
इथं साऱ्या जगासाठी

मुक्या तुझ्या वेदनांना
देतो शब्दरूपी साज
तूझी महती गाण्यास
सिद्ध जाहलो मी आज

गेला देवाघरी राजा
छत्रपती देव बाप
अन् तू झालास पोरका
त्यात दुष्काळाचा शाप

आले गेले किती राजे
शोषितच सारे झाले
आता म्हणे राज्य तुझे
नावापुरतेच आले

तूच राबतो म्हणून
मिळे जगास भाकर
तरी चंद्र भाकरीचा
नाराज रे तुझ्यावर

आता औताचा कासरा
गळफासास भेटतो
एक एक बळीराजा
रोज स्वर्गास गाठतो

तुझ्या मरणाचे आता
तूच उठव रे रान
लढ राजा मरू नको
तुला शिवबाची आन

ज्ञानेश्वर गायके कन्नड
मो ९४०३३८४८८९

## मेरे राम जी

मेरे राम जी
आज घर आयें हैं

मेरे राम जी
आज घर आयें हैं
पूरी दुनियां दिवाली मनायें रे

दिल को चाहत मिलीं हैं
धड़कनों में बसी अयोध्या में
हमारे रामलल्ला
हमारे संग रहनें आयें हैं
मेरे राम जी आज घर आयें हैं
पूरी दुनियां दिवाली मनायें रे

बरसों से देखा ख़्वाब
आज़ पूरा हुआं हैं
पूरी दुनियां में खुशहाली छाईं हैं
मेरे राम जी आज घर आयें हैं
पूरी दुनिया दिवाली मनायें रे

युगों युगोका मिटा है वनवास
अब आयेंगा रामराज
दिलं दिलों की चाहत पुरी हुईं हैं
मेरे राम जी आज घर आयें हैं
पूरी दुनिया दिवाली मनायें रे
लक्ष्मण वाल्डे-न्नड
मो.नं-888860606



## अपेक्षा..

जरा चुकीची जरा बरोबर
माझी पडली काही पाऊले
धडपडले,सावरले त्यातून
आयुष्याने मला घडविले

अपेक्षेविना कधी अचानक
भरुनी गेली सुखाने ओंजळ
कधी काटेरी वळण लागता
क्षणी दुःखाची वाढे खळखळ

ठेच लागता त्यातून शिकले
कोणाकडून करू नये अपेक्षा
मनापासुनी प्रयत्न करते
आपण मात्र करू नये उपेक्षा

काही चुकीचे जरी वाटले
अलगद सारे सोडून देते
माझा सखा एक श्रीहरी
श्रीकृष्णाअर्पणमस्तु म्हणते

आनंदाची सांज रहावी
अपेक्षांचे ओझे ना साहिल
निरपेक्ष आणि निर्मळ
माझ्यापाशी नित्य राहील

सौ.माधुरी म.इनामदार
मिरज





## स्वप्नांची पालखी

माझ्या स्वप्नांची पालखी
आज तुझ्या दारी आली
दार बंद सखे तुझे
स्वप्ने माझी कोमेजली

वाट पाहता पाहता
भान माझे हरपले
किती पाहशील अंत
डोळे माझे पाणावले

मन सैरभैर झाले
तुझ्याविना करमेना
काय करू, कसे करू,
आता काहीच सुचेना

काहीतरी करूनी तू
एकदाची ये भेटीला
केव्हा पाहीन तुला, ही
आस लागली दीठीला
***

उद्धव भयवाळ
१९, शांतीनाथ हाउसिंग सोसायटी
गादिया विहार रोड
शहानूरवाडी
छत्रपती संभाजीनगर ४३१००९
मो. ८८८८९२५४८८

## नको मजला काही

सांजवेळी तुळशी जवळ लावते दिवा
काय मागू रे माझ्या सावळ्या देवा

हात, पाय, डोळे दिलास रे मजला
सत्य बघण्यासाठी साथ दिलास विठ्ठला

सांजवेळी दिवा लावते दैनदिन
अन् कळते रे माझे मलाच जीवन

दिव्याचा प्रकाश पडतो माझ्या अंगणात
तुझे गोड नाम येते रे सदा माझ्या मुखात

तुझे गोड नाव माझ्या मुखी सदा राहू दे
संघर्ष करण्याची रे मला ताकद दे

दिवा लावून वंदन करते तुजला
अजून काय हवंय रे या संगीताला... ?

नको अडकवू मला माया, जाळ्यात
नको, अडकवू मला स्वार्थीभावनेत

समाजासाठी जगायचे आहे रे मजला
तेव्हा अर्थ लागेल रे माझ्या जीवनाला

साजवेळ येते अन् जात राहते
ही संगीता तुझी रे वाट पाहते

सत्कर्म घडत राहो माझ्या हातून
त्यांच्याशी ठेव मजला जुळवून

नकोच मजला आता व्यर्थ काही
तुझ्या एवढा रे कोणीच मोठा नाही

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## मजबुरी

व्याकुळले पिल्लू
भूक घेउनी पोटी
संस्कार,लाजेस दिली
कायमची मूठमाती

सताड उघडले दारा
सैलवल्या देहमुठी
पहाट पिल्लासाठी
मारल्या चुकार गाठी

विषदृष्टी तिरंदाज
खुपला पदोपदी
विळख्यात वासनेच्या
गढूळली गंगा नदी

कुलटा विशेषणे अन
वेश्येत झाली गणती
जाळीत जीव,काया
उबवत गेले कनवटी.

कल्पना मापूसकर
मीरारोड, ठाणे
90826 46494



## शिवरायांना मानवंदना



फिटे पारतंत्र्याचे जाळे,
झाले गुलामीतून मुक्त,
दरी खोऱ्यातून गर्जे
हरहर महादेव फक्त.

हिंदू जागे झाले सारे
पायवाटा रक्षणासाठी.
सूर्य जन्माला शिवनेरीवर
प्रकाश देण्या लोकांसाठी

एक अनोखे साम्राज्य
आले भरास भरास,
किल्ले शिवनेरीवर
सजली भव्य आरास.

भिजला आनदाने सारा
सह्याद्रीचा दगड दगड,
अंधाऱ्या कोठडीत पहा
पडला उजेड उजेड.

राजे उदयास आले
भगवा फडकला आकाशी,
हिंदवी स्वराज्याचे स्वप्न
जिजाऊंच्या चरणापाशी

राजेंद्रकुमार शेळके.
नारायणगाव, पुणे.

# रवि दीप हिरा दाविती देखणे। अदृश्य दर्शने संताचिया ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आपण जो कोणी आहोत तीच माणसे आपण आपल्या भोवताल शोधत असतो. त्याच माणसांविषयी आपण नित्य चिंतन-मनन करत असतो, लिहित अथवा बोलत असतो. कधी कधी समान नामाभिधान असणारी माणसे आपल्या भोवताल असतात, परंतु कार्य मात्र तसे करीत नाहीत. त्यासाठी आपल्या भोवताल जे वातावरण आहे ते आपला वर्तमान आणि त्याच्या आधारेच आपले भविष्य बनत असते. त्यात संत तुकाराम महाराज हे अलौकिक प्रतिभा असलेले एक सर्वश्रुत लोककवी! तुकोबांच्या अभंग वह्या जनमानसाच्या मन:पटलावर तरल्या असून त्यांना सार्वकालिक लोकानुनयाचे आढळ स्थान प्राप्त झाले आहे. जगात अनेक श्रेष्ठ कवी होऊन गेले, होत आहेत आणि होत राहतील, मात्र तुकोबांच्या कवितेएवढी एकाही कवीची कविता सामान्य माणसांना मुखोद्गत नाही! तुकोबांच्या कवितेचे हे एक अत्यंत महत्वपूर्ण वैशिष्ट्ये असून त्याचे कारण काय(?) याचा शोध आणि त्यातून काहीतरी महत्वाचा बोध घेणे काळाची गरज आहे.**

तुकोबांचे सर्वच अभंग सर्वच जाती, धर्म, पंथांच्या सर्वच घटकांसाठी अनमोल आहेत. त्यातील असलेले जीवनसार हे कुणालाही दुर्लक्षून चालणार नाही. लिहितांना तुकोबा किंवा कुणीही सृजन एखादा धर्म, पंथ अथवा विशिष्ट व्यक्ती समोर ठेवून लिहित नसतो. त्याच्या समोर सगळ्याच जगात घडणाऱ्या महत्वपूर्ण घडामोडी आणि व्यक्ती असतात. त्या पाहूनच त्याच्या मनात एखादी कलाकृती निर्माण होत असते. त्यातीलच जगद्गुरू तुकाराम महाराजांचा हा एक महत्वपूर्ण अभंग!

तुकोबांचा आणि त्या अगोदरचा आणि काळ सुद्धा मोठा खडतर होता आणि आहे. आत्तापर्यंत बोलके आणि कर्ते सुधारक होऊन गेले आणि आजही आहेत. मात्र आज करत्या सुधारकांची संख्या कमी होत आहे. आज प्रत्येकजण बोलत आहे, कृती मात्र शून्य! याचा परिणाम म्हणजे आपला भोवताल अनंत समस्यांनी वेढलेला आहे. ज्यांच्याकडे अगोदरच आहे तेच आणखी जास्त गोळा करण्यासाठी धडपडत आहेत. यातील कुणीही भोवतालच्या काहीही नसणाऱ्या लोकांचा थोडासुद्धा विचार करायला तयार नाही. असे एक न अनेक विचारांचे वादळ गोंगावत असतांना तुकोबांनी आपल्या समकालीन लोकांशी केलेला अजोड संघर्ष आज लोकशाहीत करणे शक्य आहे का? आपल्या देदीप्यमान विचारांनी आपली लेखणी पाजळवतांना त्यांना अतोनात हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. सतरावे शतक तसे यवनांच्या सत्तेने धुमाकूळ माजवणारे शतक होते. महाराष्ट्रात सगळीकडे निजामशाही, कुतुबशाही, आदिलशाही आदींनी हाहाकार माजवला असतांना धर्माच्या क्षेत्रात ब्राह्मणशाहीने उच्छाद मांडला होता. तेराव्या शतकात जनाबाई-नामदेव-सावतोबा-गोरोबा-चोखोबा-ज्ञानदेवादी वारकरी संतांनी येथील चातुर्वर्ण व्यवस्था मोडीत काढून वारकरी संप्रदाय नावाचा सर्वसमावेशक धर्म जात-लिंग-उच्च-नीचतेच्या बाहेर आणून पंढरपूरच्या वाळवंटात सर्वांसाठी मोठ्या ताकदीने खुला केला होता. तिथे कुणी ब्राह्मण अथवा शुद्र राहिला नव्हता. सगळ्याच जातीतील लोक एकाच पंगतीत बसून काला सेवन करत होते. माणूस एका रेषेत आणण्याचे महत्कार्य वारकरी संतांनी करून वर्णभेदी सनातन्यांनी निर्माण केलेली इथली भेदाभेदाची चौकट मोडून तोडून टाकली होती. अस्पृश्य जातीतील जनाबाई, शिंपी जातीतील नामदेव, माळी जातीतील सावतोबा, तत्कालीन महार जातीतील चोखोबा, गणिकेची मुलगी कान्होपात्रा, कुंभार जातीतील गोरोबा आणि ब्राह्मणांनी ज्ञाती बहिष्कृत केलेला ज्ञानोबा आदि सगळे भजनकरी-वारकरी-माळकरी एकत्र आले आणि वारकरी संप्रदाय मोठ्या ताकदीने उभा केला.पंढरीच्या लोका नाही अभिमान। पाया पडे जण एकमेकां॥ इथे सारा भेद संपला. ज्ञानोबा चोखोबाच्या पाया पडू लागले. स्वतः जनाबाई ज्ञानदेवांना अभंग म्हणायला सांगू लागल्या. भेदाच्या जोडीने धर्माच्या नावाखाली कर्मकांडाच्या रूपाने होणारी समाजाची लुटसुद्धा थांबवण्यात आली. धर्मातील अवडंबर, कर्मकांड, थोतांड, अनावश्यक




पूजा-अर्चा इत्यादी बाबींना कालबाह्य ठरवून केवळ मुखात आणि हृदयात ईश्वराचे नाव, गळ्यात तुळसीची माळ, वर्षातून दोन वेळा (शक्य असेल तरच) पंढरीची वारी, चोरी न करणे, दारू न पिणे, मांसाहार न करणे, भिक न मागणे आणि कुणाचेही लुबाडून न घेणे इत्यादी सर्वांना पटतील, पचतील, रुचतील अशी सर्वसमावेशक तत्वे वारकऱ्यांनी अंगीकारली होती. यातून वारकरी संप्रदाय उभा राहिला होता. गूढ संस्कृत ज्ञान, वेद हे अपौरुषीय नसून आदिवाशी माणसाने माणसाचे दैनंदिन जगणे सोपे व्हावे यासाठी सांगितलेली सोपी सोपी तत्वे असून त्यातील थोतांड बाजूला काढून निकं स्वीकारणे इत्यादी बाबींवर वारकरी विचारांची बैठक उभी राहिली होती. याच सर्वसमावेशक तत्वांच्या आधारे पुढे वारकरी संप्रदायात संत एकनाथांनी गाढवाला पाणी पाजून आणि अस्पृश्यांच्या लेकराला कडेवर घेऊन अवघड होत असलेले धार्मिक जीवन आपल्या सडेतोड हरिपाठाने सोपे केले. हीच महत्वपूर्ण विचारांची खुणगाठ मनाशी बांधून सतराव्या शतकात लोकांना मुळचा, खरा वारकरी संप्रदाय सांगतांना तुकोबा
रवि दीप हिरा दाविती देखणे। अदृश्य दर्शने संताचिया ॥१॥
त्यांचा महिमा काय वर्णू मी पामर। न कळे तो साचार ब्रम्हादिका ॥धृ॥ तापली चंदन निववितो कुडी। त्रिगुण तो काढी संतसंग ॥३॥ मायबापे पिंड पाळियेला माया। जन्ममरण जाया संतसंग ॥४॥ संतांच्या वचने वारी जन्मदुःख। मिष्ठान्न ते भूकनिवारण ॥५॥ तुका म्हणे जवळी न पाचरिता जावे। संतचरणी भावे रिघावया ॥६॥ (१२६०) या अभंगात अशी संतांची लक्षणे सांगतात. इथे तुकोबाराय सहजतेने संतांची ओळख पटवून देतात. ज्याप्रमाणे सूर्य, दिवा आणि हिरा यांना वेगळी ओळख करून द्यायची गरज नाही, त्याप्रमाणे संतांच्या दर्शनाने तो संत आहे की जंत( ?) हे कळते. जंत म्हणजे शोषण करणारा प्राणी! सूर्य, दिवा आणि हिऱ्याप्रमाणे आपला भोवताल उजळवून टाकणारे मग ते कुणीही असोत ते संतच असतात. त्यांची थोरवी कुणालाही वर्णन करता येत नाही. खरे संत कसे असतात? ते चंदनाप्रमाणे असतात. ज्याप्रमाणे एखाद्या ठिकाणी अग्नीने पोळले असेल तर त्या ठिकाणी चंदनाचा लेप दिला की तिथली आग शमते. तिथे थंडावा निर्माण होतो. त्याप्रमाणे संसारिक तापाने अथवा अन्य एखाद्या तापाने तापत असणाऱ्या माणसांना आपल्या आगमनाने थंड करतात ते संत! इथे प्रत्येक जनाला आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक असे तीन प्रकारचे ताप (दुःखे) सतत छळत असतात. या तीनही तापापासून संत आपल्या सोबतच्या माणसांना मुक्त न करता ते ताप सहन करण्याची सहनशीलता माणसांमध्ये निर्माण करतात. आपल्या संपर्कात आलेल्या लोकांचे संत केवळ शारीरिकच नाही तर मानसिक ताप सौम्य करतात. त्यामुळे खरे संत हे माय-बापापेक्षाहि श्रेष्ठ आहेत. माय बाप केवळ आपल्या लेकरांचे पालन-पोषण करतात. त्याला लहानाचे मोठे करतात, परंतु खरे संत माणसाला आपला जन्म का झाला? आपण काय करावे? काय करू नये? इत्यादी कृतीशील उपदेश करून माय-बापापेक्षा मोठे काम करतात. त्यामुळे संतवचन हे केवळ भूक निवारण करणारे केवळ भौतिक मिष्ठान्न नसून ते माणसाचे जन्म मरणाचे दुःख निवारण करणारे महाऔषध आहेत. संत माणसाला आपल्या जन्माला येण्याचे प्रयोजन काय? त्याच बरोबर "जन्मल्या पिंडाते मरण सांगाती" असा खरा खरा उपदेश करून आपले मरण सुकर करतात. जन्मलेल्या सजीवाला मृत्यू अटळ आहे, हे वैश्विक तत्व संत आपल्या संपर्कात आलेल्या माणसांना सोदाहरण पटवून देतात. जगात कुणीही अमरपट्टा घेऊन आलेले नाही. आत्तापर्यंत जो जन्मला त्याला मृत्यू आलाच आहे! तेंव्हा जन्माचा सोहळा साजरा करतांना लोक आपल्या मरणानंतर आपल्या मरणाचा सोहळा कसा साजरा करतील? याचा विचार करून प्रत्येकाने काही ना काही तरी सत्कर्म करावे असा उपदेश संत करत असतात. त्यामुळे अशा संत प्रवृत्तीच्या लोकांजवळ कोणत्याही निमंत्रणाशिवाय जावे. त्यांच्या सहवासात काहीतरी काळ घालवावा. जेष्ठ, जुने जाणते, प्रगल्भ, शांत, व्यासंगी अभ्यासक व्यक्तिमत्वाचा शोध घेऊन त्यांच्या सहवासात काहीतरी काळ व्यतीत करावा. त्या व्यक्तीच्या सहवासाने आपण निश्चितपणे प्रगल्भ, दूरदृष्टीचा विचार करणारे होऊ शकतो. अशी माणसेच खरे संत असतात. त्यांच्या जवळ न बोलावता जाऊन त्यांच्या सोबत मनसोक्त, दिलखुलास गप्पा गोष्टी माराव्यात. त्यांच्या बरोबरीने आपणही प्रभारित होऊन आपला भोवताल आनंदी करावा! हीच खरी संत भेट! वर्तमानात माणसाचा संवाद खुंटला आहे. आज आपल्याला एकमेकांना चॅटिंग करायला वेळ आहे पण बोलायला वेळ नाही. मित्रहो, एकमेकांशी चॅटिंगने संवाद साधण्यापेक्षा प्रत्यक्ष भेटा अथवा कॉल करून बोला. असे झाल्याने माणसांचा माणसांसी थेट संवाद साधला जाईल. सरळ एकमेकांच्या भावना समजतील. त्यासाठी जुन्या, जेष्ठ, अनुभवी लोकांना बोला. त्याच्या जोडीने महान लोकांचे विचार धन वाचा. संत विचार वाचा. त्याचे अनुसरण करण्याचा थोडा तरी प्रयत्न करा. विशेषतः आपल्या घरातील आई-वडील, जेष्ठ व्यक्तींना बोला. त्यांच्याशी जिव्हाळ्याने संवाद साधा. असे झाले म्हणजेच खऱ्या संतांची भेट होणे आहे. तिथेच आपल्याला संत, देव आणि खरे जीवन मिळेल यात तिळमात्र शंका नाही! जय तुकोबाराय!

# लाल समुद्रातील हल्ल्याने व्यापार प्रभावित



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**लाल समुद्रामधून होणाऱ्या वाहतुकीवर हौथी या संघटनेचा हल्ला हे भारतासोबत इतर देशांचेही आर्थिक व्यवहार प्रभावित करत आहे. आफ्रिकेला फेरी मारून जात असल्यामुळे युरोपियन देशात तांदळासह इतर उत्पादन पोहोचण्यासाठी १८ ते २० दिवसांचा कालावधी अधिक लागत आहे, वाहतुकीचा खर्च ही वाढत आहे, प्रतिकिलो ६ ते ७ रुपये अधिक किंमत मोजावी लागत आहे. लाल समुद्रातील अडचण लवकर संपेल असे वाटत होते पण ते आणखी लांबतच चालले आहे. भारताकडून बासमती तांदळाची मागणी कमी होत आहे.**

**द्राक्षासह इतर फळपिकांची मागणीही प्रभावित झाली आहे.**

चिलीमधून द्राक्षाची निर्यात ३.३% ने अधिक :- चालू हंगामात चिलीमधून द्राक्षाची निर्यात ३.३% ने वाढून ६२४ लाख बॉक्सेस वर पोहोचली. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी पारंपरिक पांढऱ्या जातीपेक्षा नव्या रंगीत जातीला मागणी चांगली असून निर्यातीमध्ये ६४% चा वाटा हा नव्या जातीचा आहे. चिलीमधून झालेल्या निर्यातीमधील ३९६ लाख बॉक्सेस नव्या जातीचे आहेत. नव्या लाल रंगाच्या जातीची मागणी सर्वाधिक असून जवळपास २४२ लाख बॉक्सेसची निर्यात झाली, तर ५९ लाख बॉक्सेस हि काळ्या रंगाच्या द्राक्षाची निर्यात झाली.

**कृषिक्षेत्रातील थेट ऊर्जेचा वापर वाढला :-** भारतातील कृषिक्षेत्रातील थेट ऊर्जेचा वापर २०१९-२० मध्ये एकूण ऊर्जा वापराच्या ३७.१ टक्क्यापर्यंत वाढला आहे असे ऊर्जा संशोधन संस्थेच्या इयरबुकमध्ये सांगण्यात आले आहे. २००९-१० मध्ये कृषी क्षेत्राचा ऊर्जेचा वाटा २८.७५ टक्के होता. तो आता ३७.१ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. नवीन पीक वाणांसाठी सिंचनाची उच्च मागणीमुळे कृषी क्षेत्रात विजेचा वापर वाढत आहे. खतांच्या स्वरूपात ऊर्जेचा अप्रत्यक्ष वापर २००९-१० मध्ये ६८.४ टक्के होता तर २०१९-२० मध्ये तो ६०.६१ टक्के झाला.

**हळदीचे भाव ५ महिन्यातील उच्चंकी स्तरावर :-** सन २०२२-२३ हंगामामध्ये हळदीची निर्यात १७,००० टनाने वाढून १ लाख ७० हजार टन झाली. पुढील काळात नव्या हळदीची आवक हळूहळू वाढू लागेल. युरोप, अमेरिका, जपान, आखाती देश आणि जपानमधूनही भारतीय हळदीला चांगली मागणी मिळत आहे. २०२२-२३ हंगामामध्ये हळदीचे भाव कमी झाल्याने निर्यातीची आकडेवारी वाढली. सध्याची परिस्थिती पाहिल्यास मे अखेरपर्यंत हळदीची निर्यात जोरदार होऊ शकते. हळदीचे भाव सध्या मागील ५ महिन्यातील उच्चांकी स्तरावर आहेत. हळदीच्या भावात आणखी सुधारणा होऊ शकते.

**साखर उत्पादनात घट:-** सन २०२३ या हंगामात साखरेचे उत्पादन ४% ने घटण्याची शक्यता साखर असोसिएशनने वर्तविली आहे. ३१६ लाख टन साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता असून २० लाख टन सुक्रोज इथेनॉल निर्मितीमध्ये वापरण्याची शक्यता आहे. मागील वर्षाचा ५७ लाख टनाचा साखरेचा साठा शिल्लक आहे. भारताची वार्षिक साखरेची खपत २९० लाख टनावर पोहोचली आहे. सर्वसाधारण दरवर्षी एक ते दीड टक्क्याची वाढ यामध्ये दिसून येत आहे. केंद्र सरकारने थेट ऊसाच्या रसापासून इथेनॉलच्या निर्मितीला बंधने घातली यामुळे देशातील साखरेचे उत्पादन वाढत आहे. खुल्या बाजारपेठेत विक्रीसाठी साखरेचा कोटाही सरकारने वाढवला आहे. परिणामी साखरेच्या भावात २०० रुपयाची घसरण झाली आहे. जानेवारी महिन्यासाठी सरकारचा निर्धारित कोटाही पूर्ण विकला जाणार नाही असे वाटते. अशीच परिस्थिती राहिल्यास साखर कारखान्यासमोरील आर्थिक अडचणी आगामी काळात वाढतील असे वाटते.



**आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कांद्याचे भाव वाढले :-** भारतातून कांद्याची निर्यात बंद झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कांद्याचे भाव जोरदार वाढले आहेत. बांग्लादेशमध्ये या दिवसात सरासरी ३० ते ४० टाका प्रति किलो इतके भाव राहत होते. पण सध्या १०० ते १२० टाका प्रति किलो इतके भाव आहेत. कांद्याची उपलब्धता कमी असल्यामुळे भारतीय चलनामध्ये ७५ ते ९० रुपये प्रतिकिलोवर भाव पोहोचले आहेत. याउलट भारतात कांद्यावरील निर्यात बंधनांमुळे मागील १ महिन्यापासून कांद्याच्या भावात सातत्याने घसरण सुरूच आहे. आवक अधिक असल्यामुळे किमान भाव घसरत आहेत, अशा वेळी निर्यात लवकर सुरु होईल असे वाटते. सध्या कांद्याची उपलब्दता अधिक असल्यामुळे भाव दबावातच राहतील असे वाटते.

भारतीय निर्यातबंदीमुळे पाकिस्तानला फायदा :- तांदुळाचा जगातील सर्वात मोठा निर्यातदार देश असलेल्या भारताने तांदुळाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. त्यामुळे इतर देशानी तांदुळसाठी आता पाकिस्तानकडे मोर्चा वळविला आहे. त्यामुळे पाकिस्तानी तांदुळाला मागणी वाढली असून मागील १६ वर्षातील सर्वाधिक चांगला भाव तांदुळाला मिळताना दिसत आहे. लवकरच पाकिस्तानची तांदूळ निर्यात विक्रमाचा उच्चाक गाठण्याची शक्यता आहे.

**रब्बी पिकांचे लागण ५.३ % ने घटले :-** कृषी विभागाने प्रसारित केलेल्या आकडेवारी नुसार रब्बी पिकांचे लागण क्षेत्र महाराष्ट्रात ५.३ % ने घटले. हरभऱ्याचे लागण क्षेत्र ३ लाख हेक्टर ने तर इतर कडधान्याचे लागण ४ लाख हेक्टर ने घटले आहे. तृणधान्याचे लागण क्षेत्र हि १३ लाख हेक्टर ने कमी झाले आहे.

**तूर दरात घसरण, चण्याचे दर स्थिर, उडीदची आवक नाही :-** तूर दरात घसरण झाली, तर चण्याच्या दरात स्थिरता दिसून आली. मात्र उडीदची आवक बाजारात झाली नाही. गुरुवार दि. २५ जानेवारी रोजी तुरीच्या दरात २०० रुपयांची वाढ होऊन १०,००० ते १०,४५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता. मात्र आज २७ जानेवारी रोजी आवक कमी झाल्याने तुरीच्या भावात २५० रुपयांची घसरण झाली. आज तुरीला १०,०००ते १०,१५० रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळाला. चण्याच्या किमती ५,६०० ते ५,९०० रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान राहिल्या. मात्र आज बाजारात उडीदची आवक झाली नाही.

**मागील वर्षाचा २५-३० टक्के बेदाण्याचा साठा शिल्लक :-** मागील ४ वर्षांपासून उत्पादनापेक्षा बेदाण्याची मागणी कमी होताना दिसत आहे. या हंगामाच्या मुहुर्तावेळी उचांकी २११ रुपये इतके भाव मिळाले पण सरासरी भाव मात्र १२० ते १५० रुपयाच्या आसपासच राहिले. हे मागील ४ वर्षातील सर्वात कमी भाव आहेत. मागील वर्षाचा( २०२२-२०२३ हंगामाचा) जवळपास २५-३० टक्के बेदाण्याचा साठा अजूनही शिल्लक आहे. भाव कमी मिळत असल्यामुळे बऱ्याच बागायतदारांनी विक्री केली नाही. कोरोना काळापासून द्राक्षाला कमी भाव मिळत असल्यामुळे बेदाण्याची निर्मिती वाढली आहे. या वर्षी बेदाणे किती तयार होतील यावर पुढील भाव अवलंबून राहतील.


**लसूणचे भाव ४०० रुपये प्रतिकिलो :-** या आठवड्यात घाऊक बाजारपेठेत लसूणचे भाव ४०० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचले आहेत. तर किरकोळ बाजारपेठेत ६०० रुपये किलोवर भाव पोहोचले. कोरोना काळापासून लसूणला भाव कमी मिळत असल्यामुळे लसूणचे लागणक्षेत्र मोठ्या प्रमाणात घटले आहे. जानेवारीच्या मध्यापासून नव्या लसूणची आवक सुरु होते. पण सध्या नव्या लसूणची आवक खूपच कमी होत असल्या कारणाने भाव जोरदार वाढले आहेत. पुढील आठवड्यात नव्या लसूणची आवक जोर धरू लागेल तस तसे भाव पुन्हा घटू लागतील.

सोयाबीनचे भाव मागील दोन वर्षातील निचांकी स्तरावर :- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोयाबीनचे भाव मागील दोन वर्षातील निचांकी स्तरावर पोहोचले आहेत. दक्षिण अमेरिकेत झालेल्या चांगल्या पावसामुळे आणि ब्राझीलमधील सोयाबीनचे लागण क्षेत्र वाढल्यामुळे जागतिक स्तरावर सोयाबीनची उपलब्धता वाढली आहे. त्यातच चीनकडून सोयाबीनची मागणी कमी झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उपलब्धता अधिक असल्याचा परिणाम सोयाबीनच्या भावावर होत आहे. भारतातून सोया DOC ची निर्यातही त्यामुळे कमी राहिली नजीकच्या काळात सोयाबीनच्या भावात आणखी हलकीशी घसरण दिसू शकते. ब्राझीलमधून सोयाबीनची निर्यात मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. या जानेवारी महिन्यात २६ लाख टन ब्राझीलमधून सोयाबीनची निर्यात झाल्याचे नोंद आहे.

# भाजप गड परत मिळविणार की सहानुभूतीच्या लाटेवर काँग्रेस स्वार होणार ?

आधुनिक केसरी







**चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभा 2024 विश्लेषण**

प्रा. श्याम हेडाऊ

लोकसभा 2024 च्या निवडणुकीचे पडधम आता जोरदार वाजायला लागले आहेत. देशात पुन्हा एकदा मोदी सरकार सत्तेवर येणार की लोक काँग्रेसला संधी देणार ? यावर आता चौकात चौकात गप्पांचे फड रंगायला लागले आहेत . या पार्श्वभूमीवर चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा क्षेत्रामध्ये मात्र भाजपा आपला गड पुन्हा परत मिळविणार की महाराष्ट्रातील एकमेव खासदार म्हणून निवडून आलेल्या बाळू धानोरकर यांच्या अकाली निधनाने निर्माण होणाऱ्या सहानुभूतीच्या लाटेवर काँग्रेस स्वार होणार ? असा प्रश्न आता चौका चौकात रंगायला लागलाय. 2019 च्या निवडणुकीमध्ये संपूर्ण देशात आणि राज्यात सुद्धा मोदींची लाट असताना देशाचे केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांचा पराभव करीत महाराष्ट्रातून काँग्रेसचे एकमेव खासदार म्हणून बाळू धानोरकर हे निवडून आले होते. ओबीसी बहुल या भागात जातीचे राजकारण जमविण्यामध्ये बाळू धानोरकर यांनी यश मिळवले . सोबतच काँग्रेसच्या अंतर्गत असलेल्या गटातटाच्या राजकारणामध्ये सुद्धा काही अंशी समन्वय जुळवून आणण्यात त्यांना यश मिळाले होते . सोबतच लोकसभेच्या भर जाहीर सभेमध्ये दूधवाला हवा की दारूवाला हवा ? असा प्रश्न दारूबंदीच्या मुद्द्यावर विचारीत दारूबंदीच्या पार्श्वभूमीवर सुद्धा या निवडणुकीत आपलं नशीब आजमाविण्यात बाळू धानोरकर यांना यश मिळालं. याचा फायदा घेत 2019 मध्ये बाळू धानोरकर हे केंद्रीय गृहराज्यमंत्री पदावर असलेल्या हंसराज अहिर यांचा 44 हजार 763 मतांनी पराभव करीत संपूर्ण महाराष्ट्रातून काँग्रेसचे एकमेव खासदार म्हणून निवडून आले होते.

2009 मध्ये चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली. यात गडचिरोली जिल्ह्यातील सीरोंचा व गडचिरोली या दोन विधानसभा मतदारसंघांना वगळून यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि आर्णी या दोन विधानसभा मतदारसंघाचा समावेश करून चंद्रपूर वणी आर्णी असा नवा लोकसभा मतदारसंघ तयार करण्यात आला होता. मतदार संघाच्या या पुनर्रचनेनंतर झालेल्या दोन्ही निवडणुकीमध्ये म्हणजेच 2009 व 2014 या दोन्ही निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीच्या हंसराज अहिर यांनी बाजी मारली होती. यावेळेस झालेल्या त्रिकोणी लढतीमध्ये शेतकरी संघटनेचे वामनराव चटप यांच्या उमेदवारीमुळे कुणबी समाजाच्या मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झालं . याचा नेमका फायदा भाजपला झाला होता. आणि ही निवडणूक सुद्धा भाजपने जिंकली होती. सलग दोन वेळा अहिर हे चंद्रपूर वणी आर्णी या लोकसभा मतदारसंघातून निवडून आल्यानंतर केंद्रीय पातळीवर त्यांचे वजन वाढलं होतं . म्हणूनच केंद्रीय गृहराज्यमंत्री पदावर ते पोहोचले होते .परंतु 2019 ची निवडणूक मात्र जातीय समीकरण आणि दारूबंदी या मुद्द्यांच्या भोवती प्रकर्षाने गुंतविण्यात आली . आणि याचाच फायदा घेत बाळू धानोरकर यांनी कुणबी व ओबीसी यांच्या सोबतच काँग्रेसची एक गठ्ठा असलेली मुस्लिम मते व एस सी समाजाची एक गठ्ठा असेलेली मते आपल्याकडे वळून घेण्यात यश मिळविले. याला जोड चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदीची पण मिळाली . आणि थेट जाहीर सभेमध्ये मतदारांना दारूबंदीच्या संदर्भात दूधवाला हवा की दारूवाला हवा असं म्हणत तळीरामांनाही त्यांनी साद घातली. आणि मतांचे हे राजकारण जुळवून आणत केंद्रीय गृहराज्यमंत्री पदावर असलेल्या हंसराज अहिर यांचा पराभव केला . याला भाजपमध्ये असलेल्या मुनगंटीवार अहिर यांच्या सर्वश्रुत असलेल्या " सख्य " चीही जोड मिळाली.

आता मात्र 2024 च्या निवडणुकीसाठी चंद्रपूरमध्ये चंद्रपूर वणी आर्णी लोकसभे मध्ये भाजपमध्ये मुनगंटीवार की अहिर ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे . मुनगंटीवारांनी लोकसभेमध्ये आपले नेतृत्व सिद्ध करण्याच्या दृष्टिकोनातून चंद्रपुरात भव्य विशाल प्रमाणातील कार्यक्रमांचे आयोजन करून मत पेरणी सुरू केलेली आहे. अयोध्येतील श्रीराम मंदिरासाठी पाठविण्यात आलेले काष्ठ असो , मेरी माटी मेरा देश हा कार्यक्रम असो की, कृषी मेळावा असो किंवा म छत्रपती शिवाजी महाराजांच्या 350 व्या राज्याभिषेक सोहळ्याच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेला जाणता राजाचे प्रयोग असो, कार्यक्रम कोणताही असो या कार्यक्रमांमध्ये मोदींचे भव्य कट आउट सोबत आपले कट आउट उभे करून आणि सर्व बॅनर वर मोदींच्या फोटोंचा प्रचार व प्रसार करत आपण लोकसभेसाठी तयार असल्याचे स्पष्टपणे पक्षाच्या निदर्शनास आणून देण्याचे काम सुरू केले आहे. हंसराज अहिर यांच्या 2019 मधील पराभवानंतर पक्षाने राष्ट्रीय ओबीसी आयोगाच्या अध्यक्षपदावर त्यांचे पुनर्वसन केले. असे असले तरीही देशात संपूर्ण मोदी लाट असताना आणि राज्यांमध्ये सुद्धा मोदी लाट असताना माझा पराभव का झाला ? असा प्रश्न अहिर यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या व्यासपीठावरून केला होताच. परंतु 2024 च्या लोकसभा निवडणुकीचे रणशिंग महायुतीच्या ज्या महामेळाव्यातून फुंकले त्या महायुतीच्या महामेळाव्यामध्ये सुद्धा सुधीर मुनगंटीवार हे व्यासपीठावर बसलेले असतानाही त्यांनी हाच प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित केला. जातीचे राजकारण असते तर वणी आर्णी क्षेत्रामध्ये मला मते पडली असती का ? असा थेट सवाल करत त्यांनी व्यासपीठावर असलेल्या पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना माना खाली घालायला लावल्या होत्या . चंद्रपूर वणी आर्णी या लोकसभा क्षेत्रामध्ये एकूण सहा विधानसभा येतात . यातील वणी आर्णी या विधानसभेमध्ये अहिर यांना मोठ्या प्रमाणात मते पडली होती. तर बल्लारशा ,मुल ,पोम्भूर्णा , राजुरा अशा ज्या भागांमध्ये मुनगंटीवार यांचे प्राबल्य आहे व बल्लारपूर विधानसभेचे मुनगंटीवार हे आमदार असतानाही लोकसभेमध्ये मात्र याच पट्ट्यामध्ये अहिर यांना कमी मते पडली होती. सहा विधानसभांपैकी तीन विधानसभेमध्ये भाजपाची सत्ता असतानाही आणि चंद्रपूर महानगरपालिकेत सुद्धा भाजपचे राज्य असतानाही अहिरांचा पराभव का व्हावा ? हा प्रश्न सर्वसामान्यांनाही पडलेला होता. तसाच तो पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर सुद्धा चर्चेला गेला होता. आणि म्हणूनच 2019 च्या निवडणुकीमधील पराभव अहिर यांच्या फारच जिव्हारी लागलेला आहे . आणि त्याचे शल्य ते वेळोवेळी बोलून दाखवत आहे. आणि म्हणूनच 2024 मध्ये पुन्हा एकदा संधी मिळावी आणि आपलं कर्तृत्व सिद्ध करत पुन्हा एकदा मोदी शहांच्या मंत्रिमंडळामध्ये सामील होण्यासाठी ते सुद्धा उत्सुक आहेत. त्यासाठी त्यांनी विशाल असा दांडगा जनसंपर्क सतत सुरू ठेवलेला आहे . त्यामुळे चंद्रपूर मध्ये लोकसभेची उमेदवारी कोणाला मिळणार यावर आता सगळ्यांच्या नजरा लागलेल्या आहेत. ओबीसी मराठा वातावरण सध्या राज्यात जोर धरत असून ओबीसी महासंघाचे चंद्रपुरातील शिक्षण सम्राट डॉक्टर अशोक जीवतोडे हे सुद्धा कुणबी मराठा या सुरू असलेल्या रणधुमाळी मध्ये कुणबी चेहरा म्हणून भाजपच्या कोट्यातून जागा मिळविण्यासाठी इच्छुक असल्याचे त्यांच्या विविध कार्यक्रमांवरून दिसून येते. दुसरीकडे काँग्रेसमध्ये मात्र ही लोकसभेची जागा बाळू धनोरकर यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना मिळणार का ? की गटातटाच्या राजकारणामध्ये विभागून असलेल्या काँग्रेस मधील आक्रमक नेते आणि सध्या महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते असलेले विजय वडेट्टीवार यांना मिळणार ? की ओबीसी चेहरा म्हणून सुभाष धोटे हे राजूराचे आमदार लोकसभेच्या रणांगणात उतरणार ? यावर आता जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. बाळू धानोरकर यांच्या अकाली निधनानंतर पुढील लोकसभेसाठी वर्षभरापेक्षा जास्त काळ असतानाही निवडणूक आयोगाने येथे निवडणूक घेतली नाही. त्यामुळे सहानुभूतीची लाट प्रतिभा धानोरकर यांना मिळेल का ? की पक्षांतर्गत राजकारणाच्या चढाओढीत ओबीसी चेहरा म्हणून सुभाष धोटे समोर येणार की महाराष्ट्रातील आक्रमक विरोधी नेते असा चेहरा असलेले वडेट्टीवार लोकसभेच्या तिकीट वाटपात आपली बाजी मारणार ? यावर चंद्रपूर लोकसभा निर्वाचन क्षेत्रातील निवडणूक रंगतदार ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिभा धानोरकर यांनी आपण लोकसभेत लढण्यासाठी इच्छुक असल्याचे स्पष्टपणे सांगितले असून त्यादृष्टीने त्यांनी विविध मतदारसंघांमध्ये जात आपला जनसंपर्क सुरू केलेला आहे. चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निवडणुकीमध्ये भाजप आणि काँग्रेस अशी थेट लढत होणार आहे . यामध्ये आता भाजप मुनगंटीवार यांच्या पारड्यात वजन टाकते की अहिरांना पुन्हा संधी देण्यात येते ? यावर आता लोकसभा क्षेत्रात चर्चा आहे. तर काँग्रेसमध्ये सुद्धा धानोरकर, वडेट्टीवार की सुभाष धोटे हे येणारा काळच ठरवणार आहे. परंतु या 2024 च्या निवडणुकीसाठी भाजप हा आक्रमकपणे तयारीला लागला असून काँग्रेस मात्र अजूनही गटातटाच्या राजकारणामध्ये विखुरलेली असल्यामुळे आणि उमेदवारीचे चित्र स्पष्ट न झाल्यामुळे अजूनही नैराश्याच्याच भूमिकेत वावरताना दिसते आहे.

**चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा क्षेत्रातील विधानसभेची सद्य स्थिती**

चंद्रपूर :- किशोर जोरगेवार ( अपक्ष )
बल्लारशा :- सुधीर मुनगंटीवार ( भाजपा )
राजुरा :- सुभाष धोटे ( काँग्रेस )
वरोरा :- प्रतिभा धानोरकर ( काँग्रेस )
वणी :- संजीव रेड्डी बोंद्कुरवार ( भाजप )
आर्णी :- संदीप धुर्वे ( भाजप )
सहापैकी तीन विधानसभेमध्ये भाजपची सत्ता असून दोन विधानसभेत काँग्रेस तर चंद्रपूर मध्ये अपक्ष अशी सद्यस्थिती आपल्याला दिसते आहे .

**2019 च्या लोकसभा निवडणुकीचे चित्र**

सुरेश उर्फ बाळू धानोरकर :- ( काँग्रेस ) 5 लाख 59 हजार 507 हंसराज अहिर :- ( भाजप ) 5 लाख 14 हजार 744 राजेंद्र महाडोळे :- ( वंचित बहुजन आघाडी ) 1 लाख 12 हजार 79 मते




# सातपुडा प्रभाग संघाची वार्षिक सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव जामोद येथे सातपुडा महिला प्रभाग संघाची वार्षिक सभा धानोरा महासिद्धच्या सरपंच अनिता पैंसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

यावेळी ग्रामसेवक प्रमोद खोद्रे, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व्यवस्थापक चंद्रशेखर तऱ्हेकर, जिल्हा व्यवस्थापक अविनाश वांदिले, विस्तार अधिकारी संदीप मोरे उपस्थित होते प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली सर्वप्रथम प्रभागसंघ कार्यालय उद्धघाटन करण्यात आले. प्रभागसंघाची आर्थिक उलाढाल व पुढील वाटचालीबाबत चंचल माळोदे यांनी माहिती दिली. जिल्हा कक्षाकडून प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले जिल्हा व्यवस्थापक चंद्रशेखर तऱ्हेकर सातपुडा प्रभाग संघाच्या वार्षिक सभेला संबोधतांना म्हणाले की , "समूह, ग्रामसंघ व प्रभागसंघ ह्या समुदाय स्तरीय संस्था आहेत. त्या संस्थांनी उमेद अभियानच्या दशसूत्रीचे सातत्याने पालन करावे. आपल्या प्रभागातील सामाजिक समावेशाना सोबतच उपजीविका निर्माण करण्याचे काम प्रभाग संघाने करावे. आदर्श प्रभाग संघाच्या प्रत्येक इंडिकेटर नुसार नियोजन करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रभाग संघाने करावे".कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेले, नुकताच पुणे येथील ग्लोबल स्कॉलर फाऊंडेशन चा राज्यस्तरीय भूषण पुरस्कार प्राप्त मा.संदीप मोरे साहेब यांचा सातपुडा प्रभाग संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले संदीप मोरे यांनी महिलांना ग्रामपंचायत कर वसुलीमध्येही सहभागी होऊन आपले उपजीविका वाढवण्याचे आवाहन केले.सोबतच बचत गटाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती कशी होईल या कडे लक्ष देणे गरजेचे असून गटांनी बचती पुरते मर्यादित न राहता त्या पुढचा विचार करणे गरजेचे आहे. ग्रा.पं.धानोरा महा. च्या सरपंच अनिता पेसोडे व ग्रामसेवक प्रमोद खोद्रे यांनी प्रभाग संघाला कार्यालय उपलबद्ध करून देण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. त्यानंतर प्रभाग संघाच्या अध्यक्षा अनुराधा गाडगे अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, महिलांच्या सर्वांगिण विकास करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद महत्वाची भूमिका बजावत आहे. आज मला अभिमान वाटतो की,उमेदमुळेच मी तीन हजार महिलांचे नेतृत्व सक्षमपणे करीत आहे. वार्षिक सभेमध्ये ,दिपाली गव्हाळे, रूपाली मंसूरे ,वंदना कवरे , वनमाला जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच शोभाताई हिवरकार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सुनिता खुराळे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी जिल्ह्याच्या वतीने जिल्हा व्यवस्थापक अविनाश वांदिले, तालुका अभियान कक्ष जळगाव जामोद यांच्या वतीने तालुका अभियान व्यवस्थापक सदानंद धनोकार, तालुका व्यवस्थापक,विनोद शेगोकार, प्रभाग समन्वयक अमोल वैराळे अनिल कपलकर सुबोध खोब्रागडे तसेच सर्व कॅडर उपस्थित होते.

# ही कामे इस्टिमेटनुसार व्हायला पाहिजेत : शेळके

## वाचलेल्या पैशांना नाही तर पाय फुटतात

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** काही दिवसांवर लोकसभा, विधानसभेच्या निवडणूका येऊन ठेपलेल्या आहेत. त्यामुळे सर्वत्रच विकास कामांचे नारळ फोडुन शुभारंभ करण्यात येऊ लागलेले आहेत.लोणंद ता.खंडाळा येथे सुद्धा काही ठिकाणी विकास कामांना नेते मंडळींच्या हस्ते नारळ फोडुन सुरुवात करण्यात आलेली आहे.लोणंद शहरात विकास कामे होत आहेत. लोणंद करांच्या विकासात अगदी भर पाडणारी गोष्ट आहे.आपली कामे होत आहेत.म्हणून हे विकास कामांचे नारळ फुटल्याने हे लोणंदकर नागरिक सुद्धा समाधानी आहेत.परंतु ही कामे इस्टीमेट नुसार व्हायला पाहिजेत.ही काळजी घेतली पाहिजे.अशी अपेक्षा लोणंद येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश शेळके यांनी व्यक्त केलेली आहे.ज्या ज्या प्रभागातून ही विकास कामे होत आहेत. या कामांवर नागरिकांनी स्वतःहून लक्ष देणे अपेक्षित आहे. निलेश शेळके यांनी असे म्हटलेले आहे की,लोणंद नगर पंचायत कडून काही ठिकाणी विकास कामे चालू आहेत.तर काही ठिकाणी सुरू होणार आहेत. यासंदर्भात सर्व नागरिकांना विनंती आहे की तिथली कामे ही इस्टीमेट्स नुसारच व्हायला पाहिजेत.ही काळजी आपण नागरिक म्हणून घेणं गरजेचं आहे.याशिवाय कोणालाही काहीही शंका अथवा तक्रार असेल तर त्या संदर्भात लगेच नगर पंचायत प्रशासन यांच्याकडे संपर्क साधावा.आमची जिथे मदत लागेल तिथे नक्की आम्ही सुद्धा आमच्या पध्दतीने प्रयत्न करू.असा विश्वास सुद्धा व्यक्त केला आहे.ज्या ठिकाणी सिमेंट काँक्रिटचे रोड आहेत.त्या ठिकाणी व्हीएसआय सँड आणि टाकण्यात येणारे काँक्रिट लेयर्स तसेच स्टील, इत्यादी गोष्टीत आपण लक्ष द्यायला पाहिजे.तसेच डांबरी रस्त्यांच्या बाबत खडीचे साईज आणि प्रमाण इत्यादी गोष्टी पाहिल्या पाहिजेत. बऱ्याच ठिकाणी व्हायब्रेटरी रोलर फिरवत नाहीत.त्या ठिकाण स्टॅटिक रोलर फिरवले जातात.गटाराच्या चेंबरची झाकणे ही अंदाजे १४० कि.ग्रॅम इतकी असायला पाहिजेत.बऱ्याचदा ती नसतात. यातून वाचलेल्या पैशांना नाहीतर पाय फुटतात.असे सुद्धा त्यांनी म्हटलेले आहे. शिवाय ही होणारी कामे पुढची कमीत कमी २० वर्षे टिकावीत.तरच आपण बाकिचे विषय हाती घेऊ शकतो.अशी सुचना सुद्धा निलेश शेळके यांनी केलेली आहे.एखादया कामामध्ये आमच्या निदर्शनास काही गोष्टी आल्या बरोबर त्या संदर्भातल्या सूचना प्रशासनास दिल्या जातील.असे सुद्धा निलेश शेळके यांनी सांगितले आहे.

# सुषमा अंधारेंचा मोप येथील मूर्तिकारांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** शिवसेना पक्षाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या नेतृत्वात दिनांक 30 जानेवारीपासून निघालेली मातृत्व सिंदखेडराजा ते शिवतीर्थ मुक्त जनसंवाद यात्रा दिनांक 2 फेब्रुवारीला रिसोड तालुक्यातील मोप येथे पोहोचली असता, मोप येथील प्रसिद्ध असलेले पाथरवट समाजाची उद्योग अखंड दगडापासून विविध देवदेवतांच्या मूर्ती बनवणे विविध नक्षीकाम तयार करणे येथील कलाकाराशी प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी संवाद साधला. सदर संवाद शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख यांनी घडवून आणला.

मुर्त्यांविषयी व नक्षीकामाविषयी इथं भूत माहिती उत्कृष्ट मूर्तिकार भगवान पाथरवट यांनी दिली सदर पूर्ण मूर्ती बनवण्याची कला व केलेले त्यावर कोरीव नक्षीकाम याबाबत कुतूहाने विचार पूस सुषमाताई अंधारे यांनी केली. प्रसंगी मूर्ती करा करून भगवान शंकराची पिंड सुषमाताई यांना सप्रेम भेट दिली. यावेळी जिल्हाप्रमुख डॉक्टर सुधीर कव्हर, निवासी उपजिल्हाप्रमुख माणिकराव देशमुख, यात्रेचे समन्वयक उद्धव कदम, राहुल चव्हाण, रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, तालुकाप्रमुख नारायण आरु, तालुका समन्वय घनश्याम मापारी, मोपचे सरपंच भागवत नरवाडे, गजानन खंदारे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुक्यातील आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.



**सेक्स आणि आहार (भाग 3) : व्हाईट फिश - यांच्या सेवनामुळे शुक्राणूंची क्षमता वाढते, गुणवत्ता वाढते आणि शुक्राणूंचा आकारही वाढतो. क्लाम्स (CLAMS) (सी पिस्ता) याला समुद्री पिस्ता म्हणतात आणि यात व्हिटॅमिन बी१२ सर्वात जास्त असते. एल अर्जिनीनमुळे नायट्रिक ऑक्साईड ॲसिड वाढते. शरीर पिळदार होते. तुर्की ब्रेस्ट (TURKEY BREAST) यामध्ये प्रोटीन, अर्जिनीन हे ॲमिनो असिड्स असतात. या पक्षात DHA ARMEJA-3 ACID भरपूर असते. जे मेंदूचे काम, मूड आणि फॅट्स कमी करते. हेरिंग - (HERRING)- हा एक फिश आहे. ज्यामध्ये व्हिटॅमिन बी१२, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन डी असते. ब्लू मुसेलस्स - व्हिटॅमिन बी१२ आणि IRON, MAGNASIUM या चिली साऊंडिंग मोल्युस्क असतात. वॉलनट (आक्रोड) - पिस्ता, पनीर, वॉलनट यामध्ये एल अर्जिनीन असते. ऑयस्टर्स (शिंपले) - यामध्ये व्हिटॅमिन बी१२, झिंक, टेस्टोस्टेरॉन, डी, असपाररिक ॲसिड असते, जे शुक्राणू वाढवते. फॉर्टिफाईड सिरियल्स (FORTIFIED CEREAL) यामध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन बी१२ असते. दमियाना लीफ (DAMIANA LEAF) - यामुळे स्ट्रेस कमी होतो, रीलॅक्सपणा जाणवतो. तसेच मज्जासंस्थेला हे बूस्ट करत असते. याची पाने प्रोजेस्टिनयुक्त असतात. ग्रीक योगर्ट (GREAK YOGUART) यात व्हिटॅमिन बी१२ असते, के-पोटॅशियम असते. याच्या सेवनामुळे वजन कमी होते. गोजी बेरीज (GOJI BERRIES) याला व्हियाग्रा ऑफ चायना असं म्हटलं जातं. हे रक्त पुरवठा वाढवते.**

**यॉहिबीन बार्क एक्स्ट्रॅक्ट (YOHIMBEN BARK EXTRACT) - हे एक आफ्रिकन टी बार्क असून याच्या सेवनामुळे इंद्रियांचा रक्तपुरवठा वाढतो. पीनट्स (शेंगदाणे) यामध्ये एल अर्जिनीन असते जे नायट्रिक ऑक्साईडचे बिल्डिंग ब्लॉक असतात. TEFT (टेफ्ट) - थकवा दूर करते. यामध्ये मँगनीज आणि आयर्न असते तसेच ॲमिनो ॲसिडही असते. गार्लिक (लसूण) - यामुळे कोलेस्टेरॉल कमी होते तसेच हृदय आणि रक्तवाहिन्या तंदुरुस्त राहतात. ब्रोकोली (BROCCOLI) - पुरुषांत वय वाढले की इस्ट्रोजेन वाढते तर टेस्टेस्टेरॉन कमी होते. त्यामुळे ब्रोकोलीचे सेवन करावे. यामध्ये अँठीकॅन्सर इंडोल्स व टेस्टेस्टेरॉन असते. पीनट बटर यामध्ये नियासिन व व्हिटॅमिन ई असते. तसेच फोलेट जे शुक्राणू वाढवते. त्याचाही समावेश असतो.**

**अव्होकेडॉस (AVOCADOS)- याला 'अंडाशय' म्हणतात. कारण याचा आकार तसा असतो, यामध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन ई यांचा समावेश असतो आणि यामुळे उत्तेजना वाढते. यामधील कॅरेटीनॉईड्स ऊर्जानिर्मितीचं काम करतात. स्ट्रॉबेरीज - रक्त पुरवठा वाढवते, यामध्ये अॅन्थो सायानिनस असतात. यामध्ये व्हिटॅमिन सी असते जे शुक्राणू वाढवते. चिली पिपर्स - यामुळे हीट तयार होते. यामध्ये कॅपसिसिन असते जे टेस्टेस्टेरॉन वाढवते आणि फॅट बर्न करण्याचं काम करते आणि उत्तेजना वाढवते.**






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड
सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# विसरू नको श्रीरामा मला...

आधुनिक केसरी

**निर्माते-दिग्दर्शक वसंत जोगळेकर यांनी हिंदीत काही चित्रपट निर्माण केले; पण मराठीकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांनी १९७९ साली 'जानकी' हा चित्रपट दिग्दर्शित केला होता. त्यात डॉ. श्रीराम लागू आणि सीमा देव यांनी प्रमुख व्यक्तिरेखा साकारल्या होत्या. या चित्रपटाचे एक आकर्षण म्हणजे हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ व लोकप्रिय अभिनेते अशोक कुमार आणि ओम प्रकाश यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा हे होय.**




याशिवाय रमेश देव, राजा गोसावी, धुमाळ, उषा नाईक, प्रकाश इनामदार, सुमती जोगळेकर, लता अरुण, नयना आपटे, मधू आपटे आदी सहकलावंत होते. तसेच अशोक सराफ, कमलाकर सारंग आणि जयंत सावरकर यांच्याही भूमिका होत्या. या चित्रपटाची गीते प्रतिभावंत गीतकार सुधीर मोघे यांनी लिहिली होती आणि संगीताची बाजू नामवंत संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी सांभाळली होती.

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे अतिशय प्रामाणिक व मेहनती असलेला श्रीराम सावंत (डॉ. श्रीराम लागू) आपली पत्नी जानकी (सीमा देव), आई (सुमती जोगळेकर) आणि लहान कन्या उमा या परिवारासह गोव्यात राहात असतो. त्याला मेहनतीचे फळ बढतीने मिळते ; पण यामुळे त्याचा सहकारी कर्मचारी जनार्दन याला त्याचा मत्सर वाटू लागतो. त्यातून दोघांमधे भांडण होऊन त्याचे पर्यवसान श्रीरामच्या मृत्यूत होते. श्रीरामचे कुटुंब मुंबईला येते पण ज्या ठिकाणी ते राहणार असतात तिथे काहीच नसते. अशावेळी हवालदार तुकाराम (राजा गोसावी) त्यांना मदतीचा हात देऊन आपल्या घरी आसरा देतो. त्याच्या घराचा मालक धर्माप्पा (धुमाळ) याची जानकीवर वाईट नजर पडते ; पण ती त्याच्या प्रलोभनांना बळी पडत नाही. काही काळ जातो. उमा मोठी (उषा नाईक) होते. तिला तुकारामचा मुलगा महेशचे आकर्षण वाटू लागते. ती गाण्यात आणि नृत्यात तरबेज असते. आपल्या आजीच्या शस्त्रक्रियेसाठी ती या कलांद्वारे पैसे मिळविण्याचे ठरविते. एक धनाढ्य इसम तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न करतो; पण त्या इसमाचा मदतनीसच उमाला या संकटातून वाचवितो. तो दुसरा तिसरा कोणी नसून श्रीरामच असतो. श्रीराम हयातच असतो पण त्याने आपल्या मृत्यूची आवई उठविलेली असते. उमा आपलीच मुलगी आहे, हे त्याला समजते. त्याने मृत्यूची अफवा का पसरविलेली असते ? तो पुन्हा घरी परततो का ? या प्रश्नांची उत्तरे शेवटी मिळतात.

या चित्रपटातील "विसरू नको श्रीरामा मला" हे लता मंगेशकर यांनी गायिलेले अत्यंत मधुर गीत जानकी (सीमा देव) आणि श्रीराम (डॉ. श्रीराम लागू) यांच्यावर चित्रित झाले आहे. त्यात सुमती जोगळेकरही दिसतात. हे गीत चित्रपटाचे प्रमुख आकर्षण ठरले होते. हृदयनाथ मंगेशकर यांचे एक वैशिष्ट्य असे होते, की त्यांनी संगीतबद्ध केलेली अवघड चालींची गीते केवळ त्यांच्या थोरल्या भगिनी लता मंगेशकर आणि आशा भोसले याच गाऊ शकत असत; इतर कोणत्याही गायिकेचा ते अशा गीतांसाठी विचार करीत नसत. हे दर्जेदार गीत सुधीर मोघे यांनी रामायणातल्या पतिनिष्ठ सीतामाईला डोळ्यांपुढे ठेवून लिहिले आहे. ही आधुनिक युगातील जानकीही आपल्या पतीवर कसा जीव ओवाळून टाकते हे मोघे यांनी प्रत्येक ओळीत चपखलपणे मांडले आहे. हृदयनाथ मंगेशकर यांनी गीतात तबला, बासरी. कोंगो आदी वाद्यांचा वापर केला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

***विसरू नको श्रीरामा मला***
***मी तुझ्या पाऊली जीव वाहिला***
***किती जन्म झाले तुझी प्रेमिका मी***
***कितीदा नव्याने तुला भेटले मी***
***तुझी सावली झाले***
***घेऊनी हिंडले सतीचा वसा***
***तू सांब भोळा उमा पार्वती मी***
***तू कृष्ण काळा तुझी राधिका मी***
***युगायुगांचे नाते आपुले***
***वेगळे जुळे श्यामला***
***कसे दान आले रित्या ओंजळीत***
***तुझ्याविण झाले अभागी अनाथ***
***तुझ्या अंकुरासाठी सोसते***
***झेलते उन्हाच्या झळा***

# नव्याने रुजू झालेले सपोनि साबळे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे नव्याने रुजू झालेले सपोनि प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुरेश माळी, उपनिरीक्षक सुग्रीव चाटे फर्दापूर पोलिस स्टेशन यांनी सावळदबारा येथे परिसरात भेट दिली असता फर्दापूर व सावळदबारा मंदीरावर सपोनि प्रफुल्ल साबळे यांना गुरूवारी भगवान श्रीचक्रधर स्वामी मंदीरावर प्रा योगेश चोपडे मुख्याध्यापक,व ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर यांनी शाल श्रीफळ देऊन यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला याप्रसंगी गुलाबराव कोलते पाटील तालुका संघटक,प्रा. जीवन कोलते पाटील, पत्रकार रहीम खान पठाण यांनी शुद्धा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आगामी लोकसभा २०२४ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकिय बदली प्रक्रिया संबंध महाराष्ट्र राज्यात सुरू असून गेवराई येथे कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांनी आज दि.३१ रोजी फर्दापूर पोलिस स्टेशनचे नवे पोलिस निरिक्षक म्हणून प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुग्रीव चाटे, उपनिरीक्षक सुरेश माळी यांनी पदभार स्वीकारला आहे. फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भरत मोरे यांची प्रशासकीय बदली झाली. पोलिस निरीक्षक यांना दि २८ जानेवारी रोजी बदलीचे आदेश प्राप्त झाले आहेत. आता फर्दापूर येथे सपोनि प्रफुल्ल साबळे यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे यावेळी सत्कार करतेवेळी प्रा.योगेश चोपडे, मुख्याध्यापक,उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर, गणेश खैरे,पत्रकार रहीम खान पठाण, पो.पा. विल्लास कुल्ले, पो.पा.ज्ञानेश्वर पाटील, बिट जमादार मिरखॉ तडवी व पोलीस अंमलदार, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

थंडीच्या दिवसात शरीरास उष्णता देणाऱ्या, ऊर्जा निर्माण करणाऱ्या पदार्थांची खूप आवश्यकता असते. म्हणून तर बाजरीची भाकरी भोगी व संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे किंक्रांतीला आवर्जून केली जाते . पण मुलांना आणि काही जणाना ती आवडत नाही .म्हणून आज आपण खास बाजरीची खमंग मसालापुऱ्या बनवणार आहोत .ती टम्म फुगलेली ,खमंग पुरी पाहूनच तोंडाला पाणी सुटेल आणि पुन्हा पुन्हा नक्की मागून खाणार याची खात्रीच आहे. **साहित्य :** 2 वाट्या बाजरीचे पीठ, 2 चमचे बेसन , 8..10 लसूण पाकळ्या, 1 चमचा जिरे, 1 चमचा धणे, पाव चमचा हिंग ,1 चमचा हळद पावडर, 2 चमचे तीळ , लाल तिखट किंवा 7..8 हिरव्या मिरच्या आवडीनुसार कमी जास्ती घालाव्यात, अर्धी वाटी मेथी किंवा 1 चमचा कसुरी मेथी, आवडत नसेल तर कोथिंबीर, चवीनुसार मिठ, तेल.

**कृती :** प्रथम धणे ,जिरे छान भाजून ठेवावेत .मग मिक्सर मधून पावडर करावी व पुन्हा मिक्सर मधून लसूण ,मिरची वाटून ठेवावी . मेथी .. कोथिम्बिर धुवून बारीक चिरून घ्यावी. आता एका मोठ्या बाऊल मध्ये बाजरीचे पीठ ,बेसन ,तीळ , तिखट ..मिरची ,लसूण ठेचा , मेथी..कोथिंबीर किंवा कसुरी मेथी , हिंग हळद , चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित मिक्स करावे .नंतर त्यात 2 चमचे तेल घालावे व सर्व छान एकत्र करून थोडे थोडे पाणी घालत घट्ट मळावे. कारण बाजरीचे पीठ लवकर सैल पडते आणि त्यातून तिखट. .मिठामुळे जास्त लवकर पातळ होते . म्हणून भिजवल्यावर न थांबता लगेच पुऱ्या बनवण्यास सुरुवात करावी. पीठ मळताना तेल घातल्यामुळे तळताना कमी तेल लागते आणि पुऱ्या मस्त खुसखुशीत बनतात. पोळपाटावर प्लास्टिक पेपर ठेवून पुरीसाठी छोटा बॉल बनवून तेल लावून हातावर थोडासा चपटा बनवुन जाडसर लाटावा व पुरी बनवून घ्यावी . गॅसवर कढई मध्ये तेल चांगले गरम झाले की पुरी त्यात सोडून लगेंच गॅस मंद करावा व रंग थोडा बदलून खुसखुशीत होईपर्यंत पुऱ्या तळून मग चाळणीत काढून तेल पूर्ण निथळे पर्यंत ठेवाव्यात . मग गरम गरम पुऱ्या सॉससोबत खाण्यास द्याव्यात . थंड झाल्यावर तर या पुऱ्या जास्तच खुसखुशीत बनतात. **वैशिष्टय:** ही पुरी 7..8 दिवस छान राहते .त्यामुळे प्रवासासाठी ,मुलांच्या खाऊच्या डब्यासाठी तर छान पर्याय आहेच पण खूप खमंग आणि खुसखुशीत लागणाऱ्या पुऱ्या सर्वांना नक्कीच आवडतात .बाजरीचे पीठ ताजे वापरावे म्हणजे पुऱ्या कडवट होत नाहीत .आणि लाटताना कडा चिरे जाऊ नये म्हणून बेसन तर घालावेच पण एकेक पुरी लाटून वाटीने गोल व्यवस्थित कट करून तळावी. 3..4 पुऱ्या झाल्या की तळून घेत जाव्या म्हणजे सैल पडणार नाहीत. मंद आचेवर तळल्या की छान क्रिस्पी बनतात.





चंद्रपूर येथे सुरू असलेल्या जाणता राजा या महानाट्याच्या प्रयोगातील क्षणचित्रे टिपली आहेत आमचे विदर्भ समन्वयक शाम हेडाऊ यांनी.

## फर्दापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी प्रफुल्ल साबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे नव्याने रुजू झालेले सपोनि प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुरेश माळी, उपनिरीक्षक सुग्रीव चाटे फर्दापूर पोलिस स्टेशन यांनी सावळदबारा येथे परिसरात भेट दिली असता सावळदबारा पोलिस चौकीत सपोनि प्रफुल्ल साबळे यांना शाल श्रीफळ देऊन उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला याप्रसंगी प्रा जीवन कोलते पाटील, पत्रकार रहीम खान पठाण यांनी शुद्धा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आगामी लोकसभा २०२४ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकिय बदली प्रक्रिया संबंध महाराष्ट्र राज्यात सुरू असून गेवराई येथे कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांनी आज दि.३१ रोजी फर्दापूर पोलिस स्टेशनचे नवे पोलिस निरिक्षक म्हणून प्रफुल्ल साबळे, उपनिरीक्षक सुग्रीव चाटे, उपनिरीक्षक सुरेश माळी यांनी पदभार स्वीकारला आहे. आगामी निवडणूक तोंडावर असताना पोलीस दलात मोठ्या प्रमाणात फ रबदल सुरू झाले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील पोलिस दलातील निरीक्षक, सहायक निरीक्षक व उपनिरीक्षक यांच्या मोठ्या संख्येने बदल्या करण्यात आल्या आहेत. मंगळवारी रात्री हे बदली आदेश काढण्यात आले आहेत. त्यामध्ये फर्दापूर पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षकांचा



समावेश आहे. निवडणुकीच्या अनुशंघाने पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची शक्यता मागील काही दिवसांपासून वर्तवली जात होती. त्यासाठी पोलिस अधिक्षक व पोलिस आयुक्तालयात अधिकाऱ्यांच्या बैठकांचे देखील सत्र सुरु होते. तर काहींनी बदली थांबवण्यासाठी देखील प्रयत्न चालवल्याच्या चर्चा सुरु होत्या. अखेर मंगळवारी रात्री चर्चांना पूर्णविराम लावत पोलिस अधीक्षक यांनी बदली आदेश काढले. त्यामध्ये फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भरत मोरे यांची प्रशासकीय बदली झाली. पोलिस निरीक्षक यांना दि २८ जानेवारी रोजी बदलीचे आदेश प्राप्त झाले आहेत.आता फर्दापूर येथे सपोनि प्रफुल्ल साबळे यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे यावेळी सत्कार करतेवेळी प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते,प्रा.योगेश चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर, गणेश खैरे,उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, पत्रकार रहीम खान पठाण,पो.पा.विल्लास कुल्ले,पो.पा.ज्ञानेश्वर पाटील,बिट जमादार मिरखॉं तडवी व पोलीस अंमलदार, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्रामध्ये गुंडाराज सुरू : सुप्रिया सुळे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** उल्हासनगर येथील हिल लाईन पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या केबिनमध्येच भाजपा आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना नेते महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. या प्रकरणी पोलिसांनी आमदार गणपत गायकवाड यांच्यासह तिघांना अटक केली आहे.जमिनीचा वाद आणि आपसांतील वैमनस्य यातून हा प्रकार घडल्याची घटना समोर आली आहे. या घटनेवरून सध्या राजकीय आरोप प्रत्यारोप सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये पाहण्यास मिळत आहे. त्याच दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे या पुणे दौऱ्यावर होत्या. त्यावेळी सुप्रिया सुळे यांना उल्हासनगर येथील गोळीबार प्रकरणाबाबत विचारले असता त्या म्हणाल्या की, उल्हासनगर येथील पोलीस स्टेशनमधील घटना पाहिल्यावर एकच दिसून येते. ते म्हणजे भारतीय जनता पार्टीला सत्तेची आणि पैशाची मस्ती आली आहे. त्यांचे (भाजपचे) आमदार म्हणतात पोलिसांना मारा, आता तर त्यांचेच आमदार पोलिस स्टेशनमध्ये अधिकाऱ्यांसमोर गोळीबार करतात. महाराष्ट्राच्या इतिहासात अशी घटना कधीच घडली नाही. मागील वर्षी देखील गोळीबार झाल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणातील व्यक्तींना क्लिन चिट देण्याचं पाप या सरकारने केले आहे. आता तर थेट पोलीस स्टेशनमध्येच गोळीबार, त्यामुळे याला गँगवार म्हणावं लागेल. आजपर्यंत सिनेमात पाहत होतो. आता ते वास्तवात आणि रस्त्यावर सुरू झाले आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. आज आपापसात सुरू आहे. उद्या तुम्हाला आणि मला हे लोक गोळ्या मारतील. त्याच बरोबर राज्याच्या गृहमंत्र्यांचं हे अपयश असून महाराष्ट्रामध्ये गुंडाराज सुरू आहे. त्यामुळे आता आम्ही जायचं कोणाकडे असा प्रश्न सर्वांसमोर पडला आहे. त्या पार्श्वभूमीवर मी उल्हासनगर येथील गोळीबार प्रकरणा विरोधात दिल्लीत आवाज उठविणार असून राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघीणीसह दोन बछड्यांचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प हे अभयारण्य वाघासह इतर प्राण्यांसाठीसुद्धा प्रसिद्ध आहे. येथे पूर्वी वाघ दर्शन होईल या आशेने पर्यटक यायचे पण त्यांना हे दर्शन कधी काळीच व्हायचे. पण चंद्रपूर जिल्ह्यातून येथे दोन वाघ सोडल्यानंतर परिस्थिती बदलली आहे. सध्या या नवेगाव नागझिरा अभयारण्यात येथील विविध गेटवरून येणाऱ्या पर्यटकांना वाघाचे दर्शन होत असल्याने पर्यटकांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. तर अशातच पिटेझरी गेट वरून पर्यटकांनी काल २ फेब्रुवारी नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात टी १ वाघीण व तिचे दोन बछडे आपसामध्ये मस्ती करत असतानाचे दर्शन झाले. पर्यटकाने आपल्या मोबाईल मध्ये त्यांचे चित्रफीती काढली असून ती चित्रफीती सध्या समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाली आहे. त्यामुळे आता नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांना वाघाचे दर्शन होत असल्याने पर्यटकांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. नवेगाव नागझिरा अभयारण्यात भ्रमंती करत असताना इतर अभयारण्याप्रमाणे पर्यटकांना येथे मोबाईल बंदी नाही त्यामुळे येथे पर्यटक या अभयारण्यातील विविध देखावे आपल्या मोबाईलमध्ये टिपतात. अश्याच प्रकारे एक हौसी पर्यटक पवन सोनावणे यांना शुक्रवारी २ फेब्रुवारी ला आपल्या कुटुंबीय सोबत जिप्सी गाडी ने भ्रमंती करत असताना टी १ वाघीण आणि तिचे दोन छावे मस्ती करत असताना दिसून आले असता त्यांनी आपल्या मोबाईलमध्ये त्यांचे चित्रण टिपले आहे.

## बोडखा येथे एक सरपंच, दोन उपसरपंचांची निवड : एकच चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा येथे राज्य प्रमाणेच एक सरपंच दोन उपसरपंचाचा प्रयोग प्रक्रिया सुरू करण्यात आली असुण याबद्दल सर्वत्र एकच चर्चा सुरु आहे. आज दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत अधिनियमानुसार बिनविरोध उपसरपंच पदी द्वारकाबाई प्रकाश जाधव यांची निवड केली व सरपंच श्रीमति फरजाना रफीक पटेल यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा घेऊन त्याद्वारे दुसरें पद निर्माण करुन दुसऱ्या उपसरपंच पदी श्रीमती शबाना अक्रम पटेल यांची निवड करण्यात आली सदर निवड ही राज्यात व इतर राज्यात दोन किंवा तिन उपमुख्यमंत्रीपद यावर आधारीत असुन तसेच झाकरगाव ग्रामपंचायतच्या दोन उपसरपंच निवड आधारावर आहे.बोडखा ग्रामपंचायतीचा व्याप हा दोन गावे व एक वस्ती असा असल्याने कार्यभार हाताळण्या साठी यामुळें मदत होईल तसेच विकास कामाकरिता हातभार लागेल या उद्देशाने पद निर्माण करण्यात आले. यास अनुमोदक म्हणुन जाकीर ईमाम शहा संमती दर्शवली .शासनाने ग्रामपंचायत अधिनीयमात बदल करुन दोन उपसरपंच पद निर्माण करावे त्याकरीता जिल्हाधिकारी यांच्याद्वारे शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेलाआहे. यावेळी मा.पोलीस पाटील बालकृष्ण लोंढे,तंटामुक्ती अध्यक्ष शहा अरफात वजीर,बालकृष्ण लोंढे महाराज ,मुख्तार पटेल,अक्रम पटेल, शालेय समिती अध्यक्ष मुस्तफा पटेल,वसिम पटेल,चेअरमन काकासाहेब लोंढे,जब्बार पटेल,प्रकाश जाधव,अजिनाथ काटकर ,शेळके नाना,गुलाब नाके व इतर ग्रामस्थांनी यानिर्णयाचे स्वागत करत एकच जल्लोष केले .




# सीएसएमएसएस कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचा हिवाळी परीक्षेमध्ये अंतिम वर्षाचा ९७ टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) मुंबई तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा-२०२३ चे निकाल नुकतेच घोषित झाले. यामध्ये कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचा निकाल उत्कृष्ट लागला असून मागील १४ वर्षांपासूनची यशाची परंपरा कायम राखली आहे. सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातून अंतिम वर्षातील पवन लोखंडे ९३.३०%, आदिल पठाण ९२.९०%, ओंकार आढाव ९०.८०%,व्दितीय वर्षामधील ऋषिकेश बनकर ८३.६७%, परेश पाटील ८१.७८%, धनेश पाटील ७५.८९% प्रथम वर्षातील आदित्य हिवराळे ८५.०६%, कृष्णा देशमुख ८२.१२%, साक्षी थोरात ८१.२९% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग अंतिम वर्षातील कोमल पवार ९०.४४%, वरद वैद्य ९०.३३%, निरंजन पाटील ८९.७८%, व्दितीय वर्षामधील अभिजित जाधव ८८.४०%,ओम वर्मा ८७.६०%, प्रथमेश हाडोळे ८६.९३% व प्रथम वर्षातील क्रिश मेहता ९०.४७%, मुब्बाशिर पठाण ८५.१८%, किरण चापे ८४.८२%, स्वयंम कुलकर्णी ८४.८२%, देविदास शिंदे ८४.८२% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागातून अंतिम वर्षातील ओम बनकर ८८.१%. सुप्रित गावंडे ८५.०१%, शिवराज बाहेकर ८४.२%, व्दितीय वर्षामधील ओंकार नीळ ८१.२३%, वेदांत तायडे ७४.००%,नेहा राठोड ७३.२५% व प्रथम वर्षातील शंतनू बडगुजर ७९.६५%, उदय राऊत ७६.९४% सिद्धांत उबाळे ७५.४१% इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनीअरींग विभागातून अंतिम वर्षातील ऋषिकेश पराडकर ८९.१६%, सौरभ श्रीखंडे ८४.८४%,



दीपाली पुंड ७५.१६%, व्दितीय वर्षामधील ज्ञानेश्वरी पाटील ८०.५९%, राधिका साळुंके ७९.६५%, समृद्धी भाले ७७.४१% व प्रथम वर्षातील भक्ती भंडारे ८३.५३%, दीपिका नाईक ८३.२९%, जानव्ही पौळ ८१.८८%, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून अंतिम वर्षातील श्रुती कुलकर्णी ९२.६७%, स्नेहा सातपुते ८८. ७६%, गणेश राऊत ८४. ००% व्दितीय वर्षामधील मीनाक्षी राठोड ८२.९५%, मालवीक झोडगे ८२.५३%, सोपान राऊत ७८.११%, व प्रथम वर्षातील शेख मो. बिलाल ८८.००%, कृष्णा थोरबोले ८२.७१%, अमोल त्रिभुवन ७७.६५%, आर्टीफिसिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग व्दितीय वर्षामधील रिया काकडे ८२.८०%, प्रगती डगळे ८१.६%, शुभम डोळस ७९.३३% व प्रथम वर्षातील हरिओम शेंगुळे ८८.२४%, अक्षदा चव्हाण ८४.३५%, मनस्वी गावंडे ८२.७१% यांनी अनुक्रमे प्रथम व्दितीय व तृतीय येण्याचा मान मिळवला. तसेच अनेक विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले. या यशाचे गमक म्हणजे योग्य नियोजन, प्रभावी शिकवणी, पारदर्शी मूल्यमापन व विध्यार्थीभिमुख उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी होय. याचाच परिणाम म्हणून कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) मुंबईतर्फे उत्कृष्ट मानांकन देऊन गौरव करण्यात आला. भविष्यात सुध्दा हीच परंपरा कायम ठेऊन विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रात्यक्षिक ज्ञान देऊन सक्षम व कौशल्यपूर्ण बनविण्याचा प्रयत्न करू, असे प्राचार्य डॉ.गणेश डोंगरे यांनी सांगितले. या यशाबद्दल छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, उप-प्राचार्य प्रा.चंद्रशेखर राहणे, प्रा. कैलास तिडके, प्रा. महेश मोरे, प्रा. रुपाली पोफळे, प्रा. माधव नरंगले, प्रा. संदीप मदन, प्रा. सोनल बोराखडे, प्रा. सागर आव्हाळे, प्रा. गिरीश सहाणे, प्रा. धनंजय लांब, प्रा.भारत धनवडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मनसे पदाधिकाऱ्यांवरील खोटे गुन्हे तत्काळ मागे घ्या; मनसेच्या वतीने निवेदन सादर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** चिखली येथे शेतकर्यांना न्याय देण्यासाठी गेलेल्या मनसे पदाधिकाऱ्यांवर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्या व शेतकऱ्यांची लुटमार करीत असलेल्या बेकायदेशीर खाजगी अडत व्यापार्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत यासाठी जळगाव जामोद मनसेच्या वतीने जिल्हा पोलिस अधीक्षक, बुलडाणा यांना जळगाव जामोद ठाणेदार मार्फत निवेदन देण्यात आले.

बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथील एम.आय.डी.सी परिसरातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी आणत असतात. शेतकऱ्यांनी आणलेल्या शेतमालावर त्या ठिकाणी असलेले खाजगी अडत व्यापारी हे १% बटाव म्हणून शेतकर्यांची लुट करीत होते. शेतकऱ्यांनी त्यांना विरोध केला असता गेट बंद करून मारण्याच्या धमक्या हि अडत व्यापारी मंडळी देत होती. त्यामुळे त्रस्त शेतकऱ्यांनी हि बाब मनसे पदाधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून दिली. व ते शासकीय अधिकाऱ्यांसमक्ष



(एम.आय. डी.सी.) परिसरातील खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये गेले त्या ठिकाणी तिरुपती जिनींगचे गोविंद अशोक अग्रवाल यांनी १% बटवा हिच आमची कमाई आहे.तुम्हाला काय करायचे ते करून घ्या असे म्हणत त्या ठिकाणी कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांना घेऊन सहा. निबंधक घोंगे व शेतकऱ्यांना सर्वोच्च भाषेत बोलत पैसे परत करण्यास नकार दिला. त्या ठिकाणी आमचे पदाधिकार्यांनी त्यांना विरोध दर्शविला असता, त्या ठिकाणी कामावर असलेले परप्रांतीय बिहारी, यु.पी. चे कामगार यांनी त्यांचे अंगावर येत घाणेरड्या शिवीगाळ करीत मनसेचे राजेश परिहार व नारायण बाप्पु देशमुख त्यांच्यावर गोविंद अग्रवाल यांनी चिखली पोलिस तक्रार दिली व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. तरी राजकीय सुडापोटी दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात येऊन शेतकऱ्यांची लुटमार करीत असलेल्या खाजगी अडत व्यापार्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात येऊन शेतकर्यांना न्याय देण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने महाराष्ट्र भर तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा ठाणेदार पोलिस स्टेशन नांदुरा मार्फत जिल्हा पोलिस अधीक्षक बुलडाणा यांना निवेदनाद्वारे दिला आहे. सदर निवेदन देतेवेळी मनसे माथाडी कामगार सेनेचे तालुकाध्यक्ष राजू राऊत , शहराध्यक्ष नागेश भटकर, प्रमोद यऊल, ऋषिकेश पाटील, यासह मनसेचे पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक यावेळी उपस्थित होते.




# गोंडवाना विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागांतर्गत फिजिक्स सोसायटीची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठात, पदव्युत्तर शैक्षणिक भौतिकशास्त्र विभागाअंतर्गत फिजिक्स सोसायटीची स्थापना आज करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, डॉ. श्रीराम कावळे तसेच प्रमुख पाहुणे तथा उद्घाटक म्हणून प्राचार्य विद्या विकास महाविद्यालय समुद्रपूर वर्धा , डॉ. किशोर रेवतकर, विशेष अतिथी म्हणून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे, भौतिकशास्त्र विभागाचे समन्वयक, डॉ. सुनील बागडे उपस्थित होते.

फिजिक्स सोसायटीचे महत्व व जबाबदारी या बद्दल कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. किशोर रेवतकर यांनी मार्गदर्शन केले, तसेच फिजिक्स सोसायटी अंतर्गत विविध कार्यक्रम ,स्पर्धा, सेमिनार घेणे व आयोजित करण्यासंबंधित मार्गदर्शन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी केले.

भौतिकशास्त्र समन्वयक डॉ. सुनिलबागडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमामध्ये फिजिक्स सोसायटीचे पदाधिकारी यांचे स्वागत करून सोसायटी स्थापन करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स. प्रा. डॉ. नंदकिशोर मेश्राम यांनी तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय स. प्रा. डॉ. अपर्णा भाके, यानी करून दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु गायत्री सहारे व कु. प्रांजली नागरे यांनी तर आभार कु. आदिती ब्रम्हे यांनी केले.

सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता भौतिकशास्त्र विभागाचे स. प्रा.विकास पुनसे, डॉ. नंदकिशोर मेश्राम, डॉ. अपर्णा भाके, डॉ. प्रितेश जाधव यांनी परिश्रम घेतले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# विनोदकुमार पांडे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

## श्री गजानन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे समूर्तीचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** विल्हाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक विनोदकुमार विक्रम पांडे यांना श्री गजानन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेद्वारे देण्यात येणार कै. नारायणराव पाटील वाळके जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला असून बदनापूरचे आ.नारायण कुचे,दानकुवर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महेंद्रजी गुप्ता , मेस्कोचे प्रदेशाध्यक्ष गजानन पाटील वाळके यांच्या उपस्थितीत पांडे यांना स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी मंचावर मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तुळशीराम पाटील शेळके, मेस्कोचे राज्य उपाध्यक्ष सचिन जाधव, सरपंच राणी अंभोरे,परमेश्वर अंभोरे, माजी सरपंच सहदेव अंभोरे, दीपक अंभोरे,छावाचे मराठवाडा अध्यक्ष देवकर्ण पाटील वाघ, कृष्णा पाटील एखंडे ,भगवान पाटील मात्रे , पुरस्कार निवड समिती पदाधिकारी शंकर शेरे,मनीषा पाटील, बबनराव बोरुडे, प्रशांत नवगिरे, विष्णू सोनटक्के , ढाकणे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा व्हावी म्हणून विविध उपक्रमांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री गजानन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेद्वारे जालना जिल्ह्यातील शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी बदनापूर तालुक्यातील विल्हाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक विनोदकुमार पांडे यांची निवड करण्यात आली होती.आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पांडे यांचे शाळेतील शिक्षक, पालक, ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराच्यावतीने अभिनंदन करण्यात येत आहे.



# उपचारदरम्यान अखेर 'त्या' मुलीचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आजोबा सोबत शिवराई येथील साई मंदिरातून दर्शन घेऊन घरी निघालेल्या साक्षी मतसागर हिचा शिवराई शिवारात नागपूर मुंबई राष्ट्रीय महामार्ग या ठिकाणी ट्रक ने दुचाकीस धडक दिल्याने अपघात झाला होता. या अपघातात साक्षी गंभीर जखमी झाली होती करिता तिला छत्रपती संभाजीनगर येथील एम जी एम या खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. साक्षी विश्वनाथ मतसागर( वय 16, रा.जरूळ,ता.वैजापूर ) हीबोरसर येथे आपल्या मामा च्या घरी जिल्हा परिषद बोरसर या शाळेत इयत्ता दहावीचे शिक्षण घेत होती.साक्षी ही अत्यंत संस्कारी,शांत व अभ्यासू असा स्वभाव असणारी साक्षी या वर्षी बोरसर शाळेतील दहावीत टॉपर असणार होती अशी माहिती प्रगती करिअर अकॅडमी चे संचालक यांनी यावेळी दिली. तिच्या अपघाती जाण्याने बोरसर, जरूळ सह संपूर्ण तालुका हळहळला. भरधाव ट्रकच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या साक्षी हिचा मंगळवारी उपचारदरम्यान मृत्यू झाला असून बुधवारी जरूळ येथे तिच्यावर राहत्या घरी अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली शेतकरी आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर व सेलू तालुक्यातील शेतकयांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने पाठ फिरवल्यामुळे विविध मागण्या मंजूर करण्यासाठी विजयराव भांबळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली दि.०६ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रवादी जनसंपर्क कार्यालय येलदरी रोड जिंतूर येथून तहसील कार्यालय जिंतूर येथे "शेतकरी आक्रोश मोर्चा" काढण्यात येणार आहे. जिंतूर व सेलू तालुक्यात चालू वर्षात कमी पाऊस झाल्या मुळे शेतकरी राजा आडचणीत आला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही, झालेल्या शेतीपिकाची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही तसेच पिक विमा देखील मंजूर करण्यात आलेला नाही, सध्या जिल्ह्यातील कोरडा दुष्काळ पाहता पाणी टंचाई, चारा छावण्या, पुरेसी बीज ई. नियोजन करणे गरजेचे आहे त्याबाबत आम्ही वरील संदर्भीय विषयानुसार जिल्हाधिकारी परभणी यांना निवेदन दिलेले होते परंतु शासन व प्रशासनाची शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत उदासीन भूमिका दिसून येते. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत जिंतूर व सेलू तालुक्यात भीषण दुष्काळ असताना देखील शासनाने सौम्य दुष्काळ जाहीर केलेला आहे. दुष्काळाची परिस्थिती तरी सौम्य दुष्काळ नसून तीव्र दुष्काळ जाहीर करण्यात यावा व तीव्र दुष्काळाच्या सर्व आर्थिक मदती व दुष्काळ काळातील सर्व कामे युद्ध पातळीवर सुरु करण्यात यावे, सद्य परिस्थितीत चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे सोयाबीन व कापूस उत्पन्नाचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा या करिता शासनाने सोयाबीनला ८,०००/- रु व कापूस पिकास १२,०००/- रु दराने खरेदी करण्यासाठी आदेश काढावे किंवा शासकीय खरेदीकेंद्र चालू करण्यात यावेत. सन २०२१-२२ च्या ऑगष्ट महिन्यामधील सततच्या पावसाने नुकसान झाल्यामुळे शासनाकडून १३,६००/- स एवढी प्रति हे. अशी मदत जाहीर करण्यात आली होती. परंतु, जिंतूर तालुक्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्याची फसवणूक झालेली आहे त्यामुळे उर्वरित रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. मागील वर्षीचा व यावींचा सन २०२३ २४ चा पिक विमा शेतकऱ्यांना देण्यात आलेला नाही तो तात्काळ मंजूर करून शेतकयांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्यात यावा. जिंतूर व सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांनी इन्शुरन्स कंपनीकडे पिक विम्याच्या अनेक तक्रारी केल्या होत्या त्या कंपनीने 80% रद्द केले आहेत व त्यापैकी फक्त 20 % तक्रारी मंजूर केल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या सर्व 100% प्राप्त तक्रारी मंजूर करून त्यांना पीक विमा मंजूर करण्यात यावा व वाटप करण्यात यावा. जिंतूर तालुक्यात सोयाबीन, कापूस, तूर, हळद, फळबाग ई. पिक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतकरी आडचणीत आलेला आहे. त्यामुळे जिंतूर तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा व तसेच पिक विमा कंपनीने पंचनामे करून रक्कम अदा करण्यासाठी आदेशित करण्यात यावे तसेच शासनाकडून सुद्धा शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी. चालू वर्षांत पीकविमा कंपनीने अजून शेतकःयांना काहीच मदत केलेली नाही. यामध्ये शेतकयांना १००% आग्रीम मंजूर करण्यात यावा. महाराष्ट्रात तसेच परभणी जिल्ह्यातील जिंतूर व सेलू तालुक्यात शेतकयांचे कर्ज धकलेले आहेत. त्यामुळे शेतवल्यांना सरसगट कर्ज माफी देण्यात यावी. जिंतूर व सेलू तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात गावठाणचे डी.पी. ओव्हरलोड झाल्यामुळे ज्या ठिकाणी ६३ के.व्ही. चे डी.पी.आहेत त्या ठिकाणी १०० के.व्ही. चे डी.पी.बसवण्यात यावेत. तसेच काही भागात सिंगल फेस चे ट्रान्सफार्मर बसवलेले आहेत त्या ठिकाणी श्री फेसचे १०० चे ट्रान्सफार्मर मंजूर करण्यात यावेत. जिंतूर व सेलू तालुक्यात शेतकऱ्यांना २४ तास वीज पुरवठा करण्यात यावा व शेतकऱ्यांचे दुष्काळ परिस्थितीमुळे संपूर्ण वीज बिल माफ करण्यात यावे. मागील दोन वर्षापासून जिंतूर व सेलू तालुक्यातील बऱ्याचशा शेतकऱ्यांनी सिंचन विहिरीची कामे केलेली असून त्यांची कुशलची बिले अजून अदा करण्यात आलेली नाहीत ती तात्काळ अदा करण्यासाठी संबंधीतास आदेशित करण्यात यावे.

वरील प्रमाणे जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे व नागरिकांचे विविध गंभीर स्वरूपाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत परंतु वरील सर्व ज्वलंत प्रश्नाबाबत शासन व प्रशासन उदासीन भूमिकेत असल्यामुळे शासनाचा निषेध म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जनसंपर्क कार्यालय जिंतूर येथून तहसील कार्यालयावर दि.०६ रोजी दु १२ वा "शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असून आज तहसीलदार साहेब यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा बतीने तहसील कार्यालय जिंतूर याठिकाणी निवेदन देण्यात आले.



# डॉ. स्वाती शहा यांच्याकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट

## समस्त खरात हितकारी संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली एक महिन्या पासून लोणंद ता.खंडाळा येथील पंचशील बुद्ध विहारात समस्त खरात हितकारी संस्थेच्या वतीने लहान मुला मुलींसाठी मोफत इंग्रजी शिक्षण दिले जात आहे. दररोज सायंकाळी ७ ते ८ या वेळेत मुले मुली इंग्रजी शिक्षणाचे धडे गिरवू लागलेले आहेत.५० ते ६० जणांचा सहभाग पाहायला मिळत असतो.त्यामुळे या महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक सुद्धा होऊ लागले आहे.असे समस्त खरात हितकारी संस्थेचे अध्यक्ष दयाभाऊ खरात यांनी म्हटले आहे.

हा उपक्रम पाहून रविंद्र शहा आणि डॉ.स्वाती शहा यांना सुद्धा शैक्षणिक स्वरूपाची मदत करण्याची इच्छा झाली.एक वर्ष लागणारे साहित्य मुला मुलींना देण्याचे आश्वासन रवींद्र व डॉ स्वाती शहा यांनी केले होते.त्यानुसार सुरुवातीला त्यांनी फळा व वह्या व पेन्सीली हे दिल्या होत्या.तसेच पुस्तके, वह्या, पेन व पेन्सिली दिल्या आहेत. याबद्दल समस्त खरात हितकारी संस्थेच्या वतीने शहा दांपत्याने यांचे आभार मानण्यात आले. डॉ.स्वाती शहा यांनी सुद्धा या उपक्रमाचे कौतुक करताना मुला मुलींना शिकविणाऱ्या शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे या खुप सुंदर रीत्या शिकवत आहेत. मलामुलांचीही प्रगती छान आहे.अशा भावना व्यक्त केल्या आहेत.या प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष, समस्त खरात हितकारी संस्थेचे अध्यक्ष दयाभाऊ खरात, लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सिमा वैभव खरात, संस्थेचे मुख्य मार्गदर्शक नंदकुमार खरात शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे,डॉ.स्वाती शहा, रविंद्र शहा,संस्थेचे सचिव अमित उ.खरात,खजिनदार शशिकांत खरात, अतिष खरात, योगेश खरात,दुष्यंत खरात, वैभव (बंटी) खरात,सुनिल खरात,बाळासाहेब खरात आदी उपस्थित होते. दयाभाऊ खरात म्हणाले की,या इंग्रजी शिक्षण वर्गाचे उद्दिष्ट हे ग्रामीण भागातील मुले मुली इंग्रजी विषयात उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात जातातत्यावेळी ते इंग्रजीत बोलण्यात व लिहिण्यात कमी पडतात.त्यांच्यात ज्ञान व ते हुशार असताना देखील स्पर्धेत कमी पडतात. त्यांच्यात न्यूनगंड तयार होउन ते स्वतःस कमी लेखतात. या गोष्टीचा विचार करून ग्रामीण भागातील मुलांवर इंग्रजी या विषयाचा परिपूर्ण अभ्यास करून घेउन त्यांना घडविण्याचे कार्य ही संस्था करीत आहे.समस्त खरात हितकारी संस्थेचा नाविन्यपूर्ण,स्तुत्य उपक्रम पाहता लोणंद नगरीतील शिक्षण क्षेत्रात नेहमी उल्लेखनीय कार्य करणारे दाम्पत्य डॉ.स्वाती शहा व श्री.रविंद्र शहा यांनी या विद्यार्थ्यांसाठी लागणारे साहित्य एक वर्षासाठी स्वखर्चानी देण्याबाबत घोषित केले.साहित्य दिले याबद्दल दोघांचे अभिनंदन करतो, असे त्यांनी म्हटले.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद




# वाईन्स शॉपचा कायमस्वरुपी निकाल लावणार : आ. शाह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान बंद करण्यात यावे यासाठी आझाद समाज पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.आ.फारुख शाह यांनी उपोषणकर्ते आनंद लोंढे,भैय्यासाहेब वाघ आणि कार्यकर्त्यांची भेट घेतली व येत्या आठवड्यात मंत्रालयात राज्य उत्पादन शुल्क मंत्री ना.शंभुराज देसाई यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक घेवून विनोद वाईन्सचा कायम स्वरुपी निकाल लावणार असल्याचे प्रतिपादन आ.फारुख शाह यांनी केले.

आझाद समाज पार्टीच्या वतीने गेल्या दोन महिन्यांपासून धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान हटवावे यासाठी आंदोलन करण्यात येत आहे. दि.१ फेब्रुवारी पासून आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे.आज रोजी उपोषणस्थळी आ.फारुख शाह यांनी भेट देवून उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना पाठिंबा दिला. यावेळी आ.फारुख शाह यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क करून येत्या आठवड्यात मंत्रालयात विनोद वाईन्स च्या प्रश्नावर मंत्री महोदयांच्या दालनात बैठक आयोजित करणे बाबत सांगितले. त्यानुसार पुढील मंगळवारी किंवा बुधवारी मंत्रालयात ना.शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून आंबेडकरी जनतेच्या भावनेशी खेळणाऱ्या विनोद वाईन्सचा कायमचा निकाल लावण्यात येईल असे प्रतिपादन आ.फारुख शाह यांनी केले आहे. यावेळी राज चव्हाण, सतिष अमृतसागर, हारूण खाटीक, आसिफ शाह आदी उपस्थित होते.

# खुलताबाद तालुक्यात निकृष्ट दर्जाहीन कामाचा धडाका

## विभागांच्या शाखाभियंता, उपाभियंत्यांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यात ठिकठिकाणी विविध विभाग तथा विविध पक्षाच्या खासदार -आमदार यांच्या निधीतून विविध कामे सुरु आहे मात्र कामाचा दर्जा निकृष्ट दर्जाहिन असुण याकडे हेतुतः विभागांचे शाखाभियंता व उपाभियंता दुर्लक्ष करत असल्याने "भर अब्दुला गुड थैली मे" थातुरमातुर कामे करुन गडगंज कामाई करण्याचें सपाटा प्रकार घडत असल्याचे चित्र असुण ठिकठिकाणी गांवकरी व काम करणारी यंत्रणात तु तु मैं मैं वाद होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.तालुकास्तरी समिती नेमुन झालेल्या व होत असलेल्या कामांची पाहणी व चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. तालुक्यात सद्या विकास कामांना वेग आला असून सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,जल जीवन मिशन, तथा खासदार आमदार यांच्या निधीतून रस्ते,पुले,इमारती, सिमेंट रस्ते ,रस्ते खडीकरण, डांबरीकरण मजबुतीकरण कामे, सुशोभीकरण आदि मोठ्या प्रमाणावर कामे सुरु आहे.मात्र कामे ठिकठिकाणी निकृष्ट दर्जाचे दर्जाहीन थातुरमातुर होत असल्याचे तक्रारी आहे. खडीकरण करताना खोदाई न करता, वरच्या वर खडी,दबाई न करता मुरुम टाकणे, पाणी न टाकणे, साहित्य कमी वापरने काम करताना कामापुर्वी कामाचे फलक न लावणे जे ना करुन कामाची माहिती सार्वजनिक होऊ नये. बांधकामावर वाळु व दगडी चुरा ऐवजी पुर्ण दगडी चुरा वापरणे, बांधकामांवर पाणी न मारणे एक ना अनेक तक्रारी



समोर येत आहे.या संदर्भात ठिकठिकाणी नागरिक व काम करणारी यंत्रणात तु तु मैं मैं वाद होताना दिसत आहे.मात्र कामावर लक्ष देखरेख असणारी यंत्रणा दिसून येत नसल्याने "भर अब्दुला गुड थैली मे" थातुरमातुर कामे अटोपते घेत कमाई करण्याचे प्रकार तालुक्यात सुरू आहे.खासदार आमदार व विभागा अंतर्गत निधीतून मोठ्या प्रमाणात कामे सुरू असुण झालेल्या व होत असलेल्या विकास कामांची पाहणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांतुन होत आहे.

# सेवानिवृत्त शिक्षक वामनरावजी मोरे यांनी जिल्हा परिषद प्रशालेला दिले एक लाख रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक वामनरावजी मोरे सरांनी शाळेला एक लाख रुपये देणगी दिली. त्यांच्या या उपक्रमाला बोरीतील नागरिकांना सलाम केला आहे. एखाद्या सेवानिवृत्त शिक्षकाने शाळेला एवढी मोठी रक्कम देणगी देण्याची ही पहिलीच वेळ आहे. ही रक्कम फिक्स डिपॉझिट करून देण्यात आली.

या शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक वामनरावजी मोरे सर यांनी माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांचे मनोबल व प्रोत्साहित करण्यासाठी दहावी वर्गातून मुलांमध्ये पहिला दुसरा व मुलीमध्ये पहिली आणि दुसरी येणाऱ्या विद्यार्थ्यांना वामनरावजी मोरे व सुमनबाई वामनराव मोरे यांच्या नावाने शिष्यवृत्ती म्हणून एक लाखावरील व्याजाची रक्कम त्यांना देण्यात येईल अशी घोषणा केली.

फिक्स केलेले डिपॉझिट मधली रक्कम कोणालाही काढण्याचा अधिकार नसून या डिपॉझिटचे जे



> आजच्या काळात पोट भरण्याचे व पैसे मिळवायचे सोपे साधन म्हणून डीएड – बीएड करून शिक्षक होणारी शेकडो माणसं पाहिली ..रिटायर्ड होऊन मोठे घबाड बँकेत भरून गुपचूप घरी घेऊन येणारेही पाहिलेत.... परंतु आपल्या कमाईतील एवढी मोठी रक्कम शाळेला देणगी म्हणून देणारे श्री वामनराव मोरे सर खरे आदर्श शिक्षक म्हणावे लागतील . त्यांच्या या उदात्त व सेवाभावी कार्याचे कौतुक समाजाच्या सर्व स्तरातून व्हायला पाहिजे . – **शिवाजी कनकुटे**

व्याज येईल ते व्याज काढण्याचा अधिकार शाळेच्या मुख्याध्यापकालाच असेल, इतर कोणत्याही नातलगाला किंवा वंशाच्या माणसाला राहणार नाही. या एक लाख फिक्स डिपॉझिटचा चेक माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये दिनांक २९ जानेवारी रोजी मेळाव्यातील माजी विद्यार्थी आशाताई गायकवाड,शेख रफिक भाई, डॉ.अरुण चौधरी, विश्वनाथ गोरे व संतोष तायडे यांनी शाळेत जाऊन मुख्याध्यापक प्रवीण राजवन सर यांना दिला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख जावेद, उपाध्यक्ष श्रीहरी वजीर, सहशिक्षक शिरीष बोरोळे, अश्विन सोनवणे व इतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी आता रात्रंदिवस अभ्यास करून प्रथम येण्याचा बहुमान मिळवावा व हे बक्षीस हस्तगत करावे ,असे आवाहन जिल्हा परिषद प्रशाला बोरी च्या वतीने करण्यात आले आहे.

गतवर्षी मोरे सरांची कन्या प्रभा मोरे-खैरे या आपल्या भगिनी सोबत बोरी येथे आल्या होत्या. ग्रामीण भागात उत्कृष्ट सेवा देऊन मुलांना वाचनाची गोडी लागावी यासाठी विविध उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयास त्यांनी भेट दिली होती. त्यावेळी प्रभा मोरे यांनी पाच हजार रूपयाची रोख देणगी दिली होती. मोरे कुटुंबाची गावाप्रती असलेली आस्था ही अनुकरणीय अशीच आहे असे म्हटले तर वाघे ठरणार नाही.

# शिक्षकाअभावी मुलांचे नुकसान

## परीक्षा तोंडावर, तीन वर्गांसाठी एकच शिक्षक, गटविकास कार्यालयात भरवली शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** कसाबखेडा येथील जिल्हा परिषद उर्दु शाळेत गत चारपाच वर्षा पासून आठ ते दहा वर्गांसाठी एकच महिला शिक्षक असुण शिक्षक अभावी मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे तर परिक्षा तोंडावर असताना शिकवणीच नाही तर विद्यार्थी परक्षेत लिहीणार काय ?असी विचित्र स्थिती असल्याने दि.२ रोजी पंचायत समिती खुलताबाद येथे गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात शाळा भरवून आपल्या व्यथा मांडून तातडीने शिक्षक देण्याची मागणी केली.कसाबखेडा येथे जिल्हा परिषद अंतर्गत ऊर्दू आठ नऊ दहा वर्ग असुण या वर्गासाठी गत चारपाच वर्षा पासून एकच शिक्षिका शिकवणी करते या संदर्भात पालक व गावकऱ्यांनी वेळोवेळी निवेदने तक्रारी द्वारे प्रशासनाकडे शिक्षकांची मागणी केली परंतु सतत आश्वासन व चालढकल मुळे अद्याप पर्यंत प्रशासनाने शिक्षक उपलब्ध करून दिले नाही.त्यात परिक्षा तोंडावर आहे.शिकवणी नाही.मुले- मुली वाऱ्यावर आहे. परिक्षेत काय लिहिणार असा प्रश्न मुलांना पडला आहे. पालक व मुलांना शैक्षणिक नुकसान दिसून येत असल्याने त्यांनी दि.२ रोजी पंचायत समिती खुलताबाद येथे गटविकास अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालय गाठून शाळा भरवली व शिक्षकांची मागणी केली.याची दखल घेत पुन्हा १५ दिवसांत शिक्षक देण्याचे आश्वासन देण्यात आले.यात ऊर्दू शिक्षणासंदर्भात भेदभाव तर करण्यात येत नाही.ना? असी शंका पालक वर्ग पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.तातडीने शिक्षक न मिळाल्यास सिओ यांच्या कार्यालयात शाळा भरविण्याचे व वाटल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा यावेळी पालक तथा नागरिकांतून व्यक्त करण्यात आले.



# दरोडेखोरांची दाम्पत्याला बेदम मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** चिखली शहरात शनिवारी उत्तररात्री दरोडेखोरांच्या टोळीने हैदोस घातला! त्यांनी दाम्पत्याला मारहाण केली असून यात महिला गंभीर जखमी झाली आहे. चिखली शहरातील गजानन नगर परिसरातील गजानन नवले राहतात. आज उत्तररात्री त्यांच्या घरात ६ दरोडेखोरांनी मागचा दरवाजा तोडून प्रवेश केला. गजानन नवले आणि त्यांच्या पत्नी अलका नवले मागील बाजूला झोपलेल्या होत्या तर नवले यांचे भाऊ पप्पू नवले हे समोरच्या खोलीत झोपले होते. चार चाकी वाहनातून आलेल्या दरोडेखोरांनी पती पत्नीला उठवून सोने कुठे, पैसे कुठे याची विचारणा केली. यानंतर अलका नवले यांच्या हातावर ‘रॉड’ मारून हात मोडला आणि डोक्यावर देखील वार केले. गजानन नवले यांना देखील बेदम मारहाण केली. अलका नवले यांनी जोरात आरडाओरड केल्याने समोरच्या खोलीत झोपलेले पप्पू नवले धावत आले. शेजारी देखील जागी होऊन घराबाहेर पडले. त्यामुळे दरोडेखोरांनी चारचाकी वाहनातून पळ काढला. परिसरातील नागरिकांनी दरोडेखोरांचा पाठलाग करण्याचा असफल प्रयत्न केला. घटनास्थळी रात्रीच पोलीस दाखल झाले होते.



# कन्नड तहसीलवर सकल ओबीसी समाजाचा मोर्चा

## तहसिलदार विद्याचरण कडवकर यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुका सकल ओबीसी समाजाच्या वतीने तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. तत्पूर्वी सकल ओबीसी समाजाच्या वतीने भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. एकच पर्व ओबीसी सर्व, स्व. गोपीनाथराव मुंडे यांचा विजय असो, आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं, तुमची आमची एकच चळवळ छगन भुजबळ छगन भुजबळ, जो ओबीसी हित की बात करेगा वही देश पे राज करेगा, या शिंदे समितीचे करायचे काय खाली मुंडके वर पाय, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

तहसील कार्यालयाच्या गेटवर तहसिलदार विद्याचरण कडवकर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने एका समाजाच्या बेकायदेशीर मागणीला व आंदोलकांच्या दबावाला बळी पडून, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, विशेष मागासर्गीय, अनुसूचित जाती, जमातीसाठी बनविलेल्या जात प्रमाणपत्र देण्याचा प्रक्रियेचे उल्लंघन केले आहे. सर्व OBC/VJ/ NT /SBC/ SC /ST या मागास प्रवर्गात येत असुन, भारतीय संविधान अनुसार कलम ३४० अंतर्गत आम्ही सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गात येत आहोत. त्या अंतर्गत असलेल्या संविधानिक आयोगाची कसोटी पास करुन, आमचे मागासलेपण सिद्ध झालेले आहे. त्यामुळेच आम्हाला सवलती प्राप्त झाल्या आहेत. मात्र मराठा आरक्षण लढ्याचा शासनावर दबाव असून, मराठा समाजाकडून गेल्या अनेक वर्षांपासून ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी होत आहे. अशा प्रकारचे अनेक प्रयत्न या आधीही झाले आहेत. मात्र विविध आयोगांनी व न्यायलयाने मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण नाकारले आहे.

मराठा समाजाला वैधानिक आयोगाद्वारे, कायदेशीररीत्या ओबीसी मध्ये समावेश करने शक्य होत नसल्याने, मराठा समाजाने मागच्या दाराने कुणबीद्वारे ओबीसींचा लाभ घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. यास आमचा तीव्र आक्षेप आहे. राज्य सरकारने खत्री आयोगाच्या शिफारशींचा राजकीय दबावाखाली चुकीचा अर्थ लावून काढलेल्या अध्यादेशाच्या आधारे, संपुर्ण महाराष्ट्रात यंत्रणेला हाताशी धरून. व बनावट दस्तऐवज सादर करुन लाखो प्रमाणपत्र वितरीत करण्यात येत आहे त्यास आमचा तीव्र आक्षेप असुन मोर्चा काढण्यात आला.

याप्रसंगी कन्नड तालुक्यातील प्रत्येक गावातील सकल ओबीसी समाज बांधव प्रचंड संख्येने उपस्थित होते तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी निवेदन स्वीकारले व आपल्या भावना शासनापर्यंत पोहचविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह चोख बंदोबस्त ठेवला होता.



# फकिरा ब्रिगेडच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या खंडाचे मोफत वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याच्या आठ खंडाचे मोफत वाटप लातूर जिल्ह्याचे खा.सुधाकर शृंगारे,आ.रमेश कराड, समितीचे सदस्य सचिव प्रा.डॉ.संजय शिंदे, सदस्य प्राचार्य डॉ.माधव गादेकर यांच्या हस्ते भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात करण्यात आले महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रकाशित केलेले हे खंड फक्त मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय बुक डेपो मध्ये उपलब्ध होते.सदरील खंड इतर जिल्ह्यांत मिळत नाहीत अण्णाभाऊच्या साहित्याची समाजात खूप मोठी मागणी आहे त्यामुळे फकिरा ब्रिग्रेड या सामाजिक संघटनेच्या वतीने सदरील खंडाचे मोफत वितरण करण्यात आले.

या प्रसंगी प्रा. डॉ.संजय शिंदे यांनी अण्णा भाऊंच्या साहित्यातील मार्क्सवादी तत्वज्ञान आणि आंबेडकरी विचार सोदाहरण सांगून कम्युनिस्ट विचार आणि आंबेडकरी विचार प्रमाण मानून अण्णाभाऊंनी साहित्य निर्मिती केली असे मत व्यक्त केले.प्राचार्य डॉ.गादेकर यांनी अण्णा भाऊंच्या सर्व साहित्य, विचार, तत्वज्ञानाचे संशोधन ही समिती करीत असल्याचे सांगून अण्णा भाऊनी सामान्य माणसाच्या व्यथा, वेदना, त्यांचे जगणे, दुःख जगाच्या वेशीवर आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले,आ.रमेश कराड यांनी अण्णा भाऊचे समग्र साहित्य प्रकाशित करण्यासाठी शासनाला कितीही खर्च आला तरी तो करून अण्णाभाऊचे साहित्य समाजापर्यंत घेऊन जाऊ अशा विधायक कामासाठी मी नेहमी मदत करीन अशी ग्वाही दिली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी.खा.सुधाकर शृंगारे, हे होते अध्यक्षीय समारोपात शृंगारे म्हणाले की.महापुरूषांचे विचार समाजात घेऊन जाण्यासाठी सरकार लाखो रुपये खर्च करीत आहे महापुरुषांच्या विचारावरच सरकार काम करीत आहे.अण्णाभाऊ साठे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपापल्या ठिकाणी श्रेष्ठ आहेत त्यांची तुलना समाजाने करू नये मी वेळोवेळी समाजाला मदत करीत आलो आहे पुढेही करीत राहणार याची हमी देतो.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय विरूळे, सचिन शिंदे, सुदर्शन शिंदे, पांडुरंग मस्के, मुकेश लोंढे, बाळासाहेब वाघमारे, सूर्यकांत कदम, गोविंद धबडगे, उर्मिला नवगिरे, सुभाष गायकवाड यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र लोदगेकर यांनी मानले तर आभार श्रीरंग सरवदे यांनी मानले.

# महात्मा फुले विद्यालय चॅम्पियन्स ट्रॉफी विजेता

आधुनिक केसरी न्यूज

**बोरी :** जिंतूर तालूक्यातील वस्सा येथिल महात्मा फुले विद्यालयाने परभणी जिल्हा भारत स्काऊट आणि गाईडच्या जिल्हा मेळाव्यातील चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे. रत्नापूर ता मानवत येथे दि .28 जानेवारी ते दि.31 जानेवारी दरम्यान झालेल्या 42 व्या परभणी जिल्हा भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा मेळाव्यात वस्सा येथिल महात्मा फुले विद्यालयाच्या स्काऊट पथकाने,तंबु उभारणी, प्रथमोपचार,तंबू निरीक्षण,संचलन,मानवी मनोरे, बीनभांड्याचा स्वयंपाक, प्रदर्शन, बॅंड स्पर्धा आदि स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम क्रमांक पटकाऊन चॅम्पियन्स ट्रॉफी प्राप्त केली. याचे औचित्य साधून चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या स्काऊट पथकाचा व मार्गदर्शक स्काऊट मास्टर रामेश्वर नालमवार यांचा महात्मा फुले शिक्षणसंस्थेचे सचिव रामभाऊ राऊत, शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष प्रकाश राऊत, प्राचार्य लक्ष्मण बकरे, कृष्णा राऊत आदिच्या हस्ते विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बापूराव सोनवणे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवीदास नाईक यांनी केले तर तान्हाजी काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.





# मेहगाव येथे तंटामुक्त गाव समिती अध्यक्षपदी लक्ष्मण घुगे, उपाध्यक्ष रामेश्वर घुगे

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील मेहगांव येथे तंटामुक्तिगांव समिति अध्यक्षपदी लश्मण घुगे, उपाध्यक्ष रामेश्वर घुगे यांची सर्वानुमति निवड करण्याची माहिती देण्यात आली आहे,

या संदर्भात मेहगांव येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी सरपंच श्रीमती रेखा गणेश बोंगाने होत्या सर्वप्रथम तंटामुक्तिगांव समिति अध्यक्ष उपाध्यक्ष यांची निवड प्रक्रिया पार पाडन्यात आली, त्या नंतर विविध विकास कामाचा आढावा घेण्यात आला, तसेच विकास निधि कसा उपलब्ध होईल यावर चर्चा करण्यात आली त्यासोबत तंटामुक्तिगांव समिति अध्यक्ष उपाध्यक्ष जाहिर करण्यात आले या वेळी सरपंच रेखा बोंगाने,उपसरपंच विठ्ठल वाघ, ग्रा पं सदस्य मुकेश गायकवाड़, युवा नेते अंकुश घुगे,माजी सरपंच पांडुरंग घुगे,लक्ष्मीबाई घुगे, मनोहर वाघ, शरद घुगे,किशोर घुगे,बालू ताठे,किशोर घुगे,रामेश्वर घुगे,सुनील जैस्वाल यांच्या सोबत ग्रामस्त मोठ्या संखेने उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर